वर्ष ४६
अंक ८

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील
एकमेव मराठी मासिक

ऑगस्ट २०२६
आषाढ/श्रावण
शके १९४८


नमस्कार मंडळी,

आज १ ऑगस्ट — भारतीय असंतोषाचे जनक आणि महान स्वातंत्र्य सैनिक, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून या लेखाची सुरुवात करतो. बरोबर दोन वर्षांपूर्वी, १ ऑगस्ट २०२४ रोजी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर मी माझे पहिले अध्यक्षीय लिहिले होते. आज, दोन वर्षांनंतर, अध्यक्ष म्हणून हे माझे शेवटचे अध्यक्षीय लिहिताना मन अनेक आठवणींनी भारावून गेले आहे.



सर्वप्रथम माझी पत्नी सौ. निवी, तसेच माझी मुले नील आणि प्रिया यांचे मनःपूर्वक आभार. गेली दोन वर्षे त्यांनी प्रत्येक टप्प्यावर मला साथ दिली, प्रोत्साहन दिले आणि माझ्यावर असलेल्या जबाबदाऱ्या समजून घेतल्या. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष होणे हा केवळ माझ्यासाठी नव्हे, तर माझ्या कुटुंबासाठी, जगभरातील मित्रपरिवारासाठी आणि ऑस्टिन मराठी मंडळासाठी अभिमानाचा क्षण होता. या सर्वांनी दिलेल्या प्रेम, विश्वास आणि शुभेच्छांबद्दल मी सदैव ऋणी आहे. एक स्वप्न उराशी बाळगून मी या पदाचा स्वीकार केला होता. आज, दोन वर्षांनंतर, त्या स्वप्नांपैकी जवळजवळ सर्वच उद्दिष्टे पूर्ण झाल्याचे समाधान मनात आहे. त्यामुळेच अत्यंत आनंदाने आणि आत्मविश्वासाने ही जबाबदारी पुढील नेतृत्वाकडे सोपवत आहे. या प्रवासात माझ्या कार्यकारिणीतील प्रत्येक सदस्य, विश्वस्त मंडळ आणि असंख्य स्वयंसेवक यांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. आपण सर्वांनी मिळून केलेले कार्य हीच आपल्या यशाची खरी गुरुकिल्ली होती. प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार.

बृहन्महाराष्ट्र मंडळ ही आता ४५ वर्षांची समृद्ध परंपरा असलेली संस्था आहे. अनेक माजी अध्यक्ष, पदाधिकारी, विश्वस्त आणि स्वयंसेवकांनी या संस्थेची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्य आहे. गेल्या दोन वर्षांत अनेक उपक्रमांच्या माध्यमातून हजारो स्वयंसेवक संस्थेसाठी, मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी किती निःस्वार्थपणे कार्य करत आहेत, हे जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यांचा उत्साह पाहून नेहमीच अभिमान वाटला.

या कार्यकाळात मनोरंजनाबरोबरच समाजाभिमुख उपक्रमांना प्राधान्य देत "समाजरंग" हा नवा उपक्रम सुरू केला. या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांसाठी जवळपास $७५,००० इतका निधी उभारता आला. आरोग्यसंपदा, गुरुपीठ, अर्थमंथन, ज्योतिष, कीर्तन, अशा अनेक नवीन उपक्रमांची सुरुवात करून विविध वयोगटांपर्यंत BMM ची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला.

मराठी विद्यार्थ्यांना परदेशी भाषा (Foreign Language) क्रेडिट मिळावे यासाठी Avant संस्थेशी करार केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि पेशवे यांच्या इतिहासावरील अभ्यासक्रम व प्रमाणपत्र परीक्षा सुरू केल्या. BMM आणि रेशीमगाठी या दोन्ही संकेतस्थळांचे संपूर्ण नूतनीकरण केले. निवडणूक सुधारणा आणि काही घटनात्मक बदल संस्थेच्या घटनेनुसार यशस्वीपणे पूर्ण केले. भारतातील आपल्या सदस्यांना वैद्यकीय, पर्यटन, सरकारी कामे आणि इतर सेवांसाठी मदत मिळावी यासाठी BVG संस्थेशी भागीदारी केली.

मंडळांमधील परस्पर सहकार्य वाढावे, युवकांना नेतृत्वाच्या संधी मिळाव्यात आणि मराठी शाळांना अधिक बळ मिळावे यासाठी विविध आर्थिक प्रोत्साहन योजना सुरू केल्या. या सर्व उपक्रमांमुळे उत्तर अमेरिकेतील मराठी समाज अधिक जवळ आला, याचा आनंद आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्य आपल्या मंडळांपर्यंत पोहोचविणाऱ्या सर्व मंडळ अध्यक्षांचे, BMM प्रतिनिधींचे, तसेच प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झालेल्या सर्व सभासदांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. दर महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी नियमितपणे BMM वृत्त प्रकाशित करणाऱ्या माझ्या वृत्त समितीतील सर्व सहकाऱ्यांचे विशेष अभिनंदन आणि आभार.

आता एका आठवड्यात सुरु होणारे सिएटल अधिवेशन हे गेल्या दोन वर्षांच्या अथक परिश्रमांचे फलित आहे. अनेक आव्हाने, अडचणी आणि संकटांवर मात करून आज आम्ही आपल्या स्वागतासाठी सज्ज आहोत. सिएटलमधील तसेच जगभरातून कार्य करणारे सर्व स्वयंसेवक, प्रायोजक, देणगीदार आणि या अधिवेशनाला यशस्वी करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नव्याने निवडून येणाऱ्या कार्यकारिणीचे अभिनंदन आणि त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा.

सरतेशेवटी...गेली दोन वर्षे आपण सर्वांनी मला दिलेले प्रेम, विश्वास, सहकार्य मी आयुष्यभर विसरणार नाही. कळावे लोभ असावा.

आपणा सर्वांना भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा! तसेच येणाऱ्या नागपंचमी, नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! जय हिंद! जय महाराष्ट्र! आपला,

- प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ (२०२४ - २०२६)

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

अध्यक्षीय १
बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती २
२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल ३
बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांचे मनोगत ५
मागे वळून बघताना ७
निरोप ९
बृहन्महाराष्ट्र मंडळ गौरव गीत १०
(अमेरिकन) भारतीय स्वातंत्र्य दिन - पंधरा ऑगस्ट! १०
कविता: उदधि १२
अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख १२
एका संधीने घडलेले भविष्य १४
आनंदाचे देणे १५
कविता: प्रश्न... १७
ऋतू सोबतीने...! १८
कविता: त्सुनामी १९
वारी: महाराष्ट्रधर्माचा आत्मा १९
पाऊले चालती....! २१
कविता: वयस्कर तरुण का तरुण वयस्कर? २३
आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा २३
कविता: मधुर मिलन २५
विज्ञानाने कोणत्या गोष्टी सांगाव्या (आणि कोणत्या नाही)? २५
Ekalavya Foundation २७
स्नेहसंमेलनाची महती... २८
MANA Paintings २९
BMM Uttarrang ३०
सेवेचा प्रवास... संस्कारांची शिदोरी... ३०
मनोगत ३२
Balancesheet ३३
दिवाळी अंक आवाहन २०२६ ३५
जाहिरात ३६
२०२६ सिॲटल अधिवेशन विशेष ३७-७६

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Vrutta@Bmmonline.org

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल



‘बीएमएम वृत्त’च्या सर्व वाचकांना नमस्कार! उन्हाळ्याचे दिवस मुलांच्या सुट्ट्या, प्रवास, पर्यटन ह्यात अगदी मजेत जात असतील. येणाऱ्या भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

अगदी काही दिवसांतच आपण सर्वजण बीएमएम २०२६ अधिवेशनासाठी सिॲटल मध्ये भेटणार आहोत. या अंकानंतर वृत्तमधून बीएमएम २०२६ च्या तयारीविषयीचे अपडेट्स संपतील. गेली दोन वर्षे बीएमएम २०२६ टीमची प्रतिनिधी म्हणून वृत्तच्या माध्यमातून तुमच्याशी संवाद साधण्याची संधी मला मिळाली. अधिवेशनाच्या तयारीतील प्रत्येक टप्पा, नवीन उपक्रम आणि महत्त्वाच्या घडामोडी तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न होता. या प्रवासातील प्रत्येक क्षण पुन्हा अनुभवण्याची संधी मला या लेखांमुळे मिळाली, याचा विशेष आनंद आहे. आमच्या सर्व स्वयंसेवकांसाठी हा प्रवास अथक परिश्रमांचा होता; त्याचबरोबर नवीन काही शिकण्याचा, अनेक आव्हानांना सामोरे जाण्याचा, विविध अनुभवांनी समृद्ध होण्याचा आणि आनंदाचे, अभिमानाचे समाधान देणारे क्षण अनुभवण्याचाही होता. अनेक हात, एकच ध्येय आणि एकच भावना "जपूया संस्कृती, विणुया नाती" या ब्रीदवाक्याला साजेसा हा प्रवास आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.

**अंतिम तयारी पूर्णत्वाकडे:**

अनेक हात, एकच ध्येय आणि एकच भावना **"जपूया संस्कृती, विणुया नाती"** या ब्रीदवाक्याला साजेसा बीएमएम २०२६ च्या तयारीचा हा प्रवास आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शेवटची काही महत्त्वाची कामे वेगाने सुरू आहेत. सिॲटल टीम आपल्या सर्व पाहुण्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे.

जुलै महिन्यात बीएमएमचे अध्यक्ष **श्री. प्रसाद पानवळकर** हे



सौभाग्यवतींसह सदिच्छा भेटीसाठी सिॲटलला आले होते. त्यांच्या उपस्थितीत आमची All Hands Meeting पार पडली. अधिवेशनाच्या तयारीचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला आणि स्वयंसेवकांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

**तिकीट नोंदणी: अजूनही संधी आहे!**

उपस्थितांच्या आग्रहास्तव भोजनविरहित $350 चे तिकीट पूर्वीच्या दरातच उपलब्ध ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी जाहीर करण्यात आलेली दरवाढ मागे घेण्यात आली आहे.

तसेच, गुरुवार, ६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्नेहभोजन (banquet) कार्यक्रमासाठी स्वतंत्र तिकिटांचीही सोय करण्यात आली आहे.

**Banquet dinner + Program: $150**

**Banquet Program only (without dinner): $50**

अजून नोंदणी केली नसेल तर, ह्या संधीचा लाभ घ्या. स्नेहभोजन (Banquet) कार्यक्रमाचे तिकीट लवकरात लवकर निश्चित करा. नोंदणीसाठी आणि अधिक माहितीसाठी अधिवेशनाच्या वेबसाइटला अवश्य भेट द्या. www.bmmseattle2026.org

**Banquet कार्यक्रम:** Banquet च्या संगीतमय मैफलीत सुप्रसिद्ध गायक अजरामर गीतांचा सुरेल प्रवास आपल्यापुढे सादर करतील. साथीला आहेत श्री.प्रशांत दामले.

**कार्यक्रमपत्रिका आणि Tugoz Wallet App**

आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर आम्ही संपूर्ण कार्यक्रमपत्रिका जाहीर केली आहे. प्रत्येक कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि स्थळ याची माहिती आता वेबसाइटवर उपलब्ध आहे. आपले नियोजन आताच सुरू करा.

तसेच, Tugoz Wallet या अधिवेशनाच्या अधिकृत ॲपचा वापर करण्यास सुरुवात करा. हे ॲप Google Play Store (Android) आणि App Store (iOS) वर डाउनलोडसाठी उपलब्ध आहे. ॲप उघडल्यानंतर आपला नोंदणी क्रमांक टाकून लॉग-इन करणे आवश्यक आहे. इथे तुम्ही कार्यक्रमांचे वेळापत्रक, सूचना आणि इतर माहिती सहज पाहू शकता. शाळा-कॉलेजच्या मित्रमैत्रिणींचे Reunions, मित्रपरिवाराच्या भेटीगाठी किंवा इतर भेटींचे नियोजन करण्यासाठीही हे ॲप उपयुक्त ठरेल.

ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक्स खालीलप्रमाणे:

Apple App Store:
apps.apple.com/us/app/tugoz-wallet/id6753093079

Google Play Store:
play.google.com/store/apps/details?id=com.tugoz.tugoz_events

**सिॲटलच्या रस्त्यांवर मराठी संस्कृतीचा जल्लोष**

शनिवारी ८ ऑगस्ट सकाळी ७:३० वाजता होणार आहे भव्य मराठी सांस्कृतिक मिरवणूक! ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम, झांज, भगवे ध्वज घेऊन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवत सिॲटलच्या डाउनटाउनमधून प्रथमच निघणार आहे. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर मराठी अस्मितेचा हा अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे.

वृत्तमधून तुमच्याशी साधलेला हा संवाद इथे थांबेल; पण आपल्या भेटीची सुरुवात आता प्रत्यक्ष सिॲटलमध्ये होणार आहे. **६ ते ९ ऑगस्ट २०२६, Seattle Convention Center.** श्रीगणेशाच्या कृपेने या चार दिवसांच्या सांस्कृतिक पर्वाची सुरुवात होईल आणि हजारो मराठी मनांचे एक सुंदर कुटुंब पुन्हा एकदा एकत्र येईल.

चला, एकत्र येऊया, संस्कृती साजरी करूया, नवी मैत्री विणूया आणि बीएमएम २०२६चा हा अविस्मरणीय सोहळा मनापासून अनुभवूया. आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार 🙏

भेटूया सिॲटलमध्ये... #Seaya तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇

**संकेतस्थळ:** https://bmmseattle2026.org

**यूट्यूब:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE

**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle

फेसबुक ग्रुप: www.facebook.com/groups/bmm2026seattle

**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle

**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ - हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे. चला, जपूया संस्कृती, विणूया नाती !!! 🙏 🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम २०२६ समिती)



# बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार मंडळी,

म्हणता म्हणता दोन वर्षे कशी संपली हे कळलेच नाही. आता बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदाचा निरोप घेण्याची वेळ आली आहे. मागे वळून पाहताना मनात सर्वप्रथम येते ती कृतज्ञतेची भावना.

मी जे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून निवडणूक लढवली, जी आश्वासने आपल्या सर्वांना दिली, त्यांपैकी बहुतेक पूर्ण करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला आणि त्यात मोठ्या प्रमाणात यशही मिळाले. अर्थात अजूनही अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत. मात्र आता त्या नव्या नेतृत्वाच्या हातून घडतील, आणि एक सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांना मदत करण्यासाठी मी सदैव तयार असेन.

**आमचा प्रवास :** आमच्या समितीतील आठ सहकारी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीत निवडून आले. अध्यक्ष म्हणून प्रत्येकाच्या आवडी, क्षमता आणि अनुभव लक्षात घेऊन जबाबदाऱ्यांचे (खाते) वाटप केले. प्रत्येकाने त्या जबाबदारीला न्याय देत अत्यंत उत्साहाने आणि समर्पित भावनेने काम केले. आज जे काही साध्य झाले, ते संपूर्ण कार्यकारिणीच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच.

**शासकीय सहकार्य आणि मान्यवरांशी संवाद:** अध्यक्षपद स्वीकारल्यानंतरच्या पहिल्याच आठवड्यात महाराष्ट्र शासनासोबत झालेल्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी भारतात जाण्याची संधी मिळाली. मुंबईच्या राजभवनात महाराष्ट्राचे **राज्यपाल मा. सी. पी. राधाकृष्णन** आणि **शिक्षणमंत्री मा. दीपक केसरकर** यांच्या उपस्थितीत हा महत्त्वाचा सोहळा पार पडला. ही बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी अभिमानाची बाब होती.

पुढील काही काळात भारताचे पंतप्रधान **मा. नरेंद्रजी मोदी**, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री **मा. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच मंत्री मा. आशीषजी शेलार, मा. दीपकजी केसरकर** आणि **मा. उदयजी सामंत** अशा अनेक मान्यवर नेत्यांची भेट घेण्याची संधीही मला लाभली. या भेटींमुळे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्य, मराठी भाषा, शिक्षण, संस्कृती आणि समाजोपयोगी उपक्रम यांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवता आली, तसेच भविष्यातील सहकार्याचे नवे मार्गही खुले झाले.

**तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरण:** या दोन वर्षांत संस्थेच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर दिला.

- बृहन्महाराष्ट्र मंडळाचे संकेतस्थळ पूर्णपणे नव्याने विकसित केले: **"विद्यार्थी सहाय्यक समिती"**च्या "कमवा आणि शिका" योजनेतील विद्यार्थ्यांना ही संधी देऊन सामाजिक बांधिलकीही जपली.
- "रेशीमगाठी" संकेतस्थळाचे नूतनीकरण उत्तर अमेरिकेतील मराठी उद्योजकाकडून करून घेतले.
- बँकेतील सर्व आर्थिक व्यवहारांचे Automation करून आर्थिक व्यवस्थापन अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि कार्यक्षम केले.
- "बृहन्महाराष्ट्र मंडळ वृत्त"चे Digitization पूर्ण केले, तसेच दिवाळी अंक भारतातील अनेक ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून दिले.

**नवीन उपक्रम:** या दोन वर्षांत अनेक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले.

- समाजरंग
- आरोग्य संपदा
- अर्थमंथन
- गुरुपीठ
- ज्योतिषशास्त्र
- कीर्तन
- लक्ष्यवेधी
- बालक-पालक (मराठी शाळा)

यासोबतच उत्तररंग, तत्त्वज्ञान, पौरोहित्य, ध्यान, संगीत यांसारखे लोकप्रिय उपक्रमही यशस्वीपणे सुरू राहिले.

**समाजरंग - समाजाशी नाळ जोडणारा उपक्रम:** "समाजरंग" हा माझ्या मनाजवळचा उपक्रम. मनोरंजनाबरोबर समाजकारणही व्हावे, हा त्यामागचा हेतू. यासाठी अनेक सेवाभावी संस्थांशी भागीदारी केली.

गेल्या वर्षी मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी निधी संकलन करून **$६३,०००** महाराष्ट्रात पाठविण्यात आले. यावर्षी ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांसाठी स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती, तपासणी आणि उपचारांसाठी सुमारे **$१२,०००** निधी पाठविला. एकूण जवळपास **$७५,०००** महाराष्ट्रातील सामाजिक कार्यासाठी उभे राहिले. ही यशोगाथा अनेक मंडळांच्या सहकार्यामुळे शक्य झाली.

**मराठी शिक्षणासाठी मोठी पावले:** मराठी शाळांनी अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले.

- Avant सोबत करार करून Foreign Language Credit उपलब्ध झाले.
- शिवाजी महाराज आणि पेशवे यांवरील अभ्यासक्रम विकसित केले.
- नवीन पाठ्यपुस्तके आणि सुधारित आवृत्त्या प्रकाशित केल्या.
- शिक्षकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार केल्या.
- शिक्षकांसाठी "नवरत्न शिक्षक प्रशिक्षण माला" सुरू केली.
- उत्तर अमेरिकेबाहेर युरोप, मध्यपूर्व आणि पूर्व आशियात मराठी शाळांचा विस्तार झाला.
- पहिल्यांदाच शाळांना जवळपास $३०,००० अनुदान म्हणून देण्यात आले.

**युवा - भविष्याची गुंतवणूक:** युवांसाठी अनेक नवीन संधी निर्माण करण्यात आल्या.

- Summer Mentorship
- Internship in India
- Leadership Programs

प्रत्येक मंडळाला युवा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आर्थिक सहाय्य जाहीर करण्यात आले.

**आरोग्य, व्यवसाय आणि करिअर:** "आरोग्य संपदा" या उपक्रमाद्वारे विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध झाले.

"B-Connect" मार्फत विद्यार्थ्यांना Internship, करिअर, व्हिसा, आणि व्यवसाय विषयक मार्गदर्शन मिळाले.

**उत्तर अमेरिकेतील कलाकारांना प्रोत्साहन, तसेच भारतीय कार्यक्रम:** आपल्या स्थानिक कलाकारांना अधिक संधी मिळाव्यात म्हणून North America Program Support Fund सुरू करून आर्थिक सहाय्य देण्यात आले. तसेच Dallas आणि Cleveland येथे मैत्री मेळावे आयोजित केले. सुप्रसिद्ध अभिनेते **प्रशांत दामले** यांच्या **"शिकायला गेलो एक"** या नाटकाचे विक्रमी १७ प्रयोग उत्तर अमेरिकेत झाले. तसेच अनेक दर्जेदार मराठी चित्रपट मंडळांपर्यंत पोहोचविण्यात आले.

**प्रशासकीय सुधारणा:** या कार्यकाळातील सर्वात महत्त्वाच्या कामांपैकी एक म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाची **घटना दुरुस्ती आणि निवडणूक सुधारणा.** स्वतंत्र समिती, विश्वस्त आणि सदस्यांच्या सविस्तर चर्चेनंतर विशेष सर्वसाधारण सभेत जवळपास **३५ घटनात्मक आणि निवडणूक सुधारणा** मंजूर करण्यात आल्या.

तसेच पुढील अधिवेशनासाठी यजमान मंडळ निवडण्याची प्रक्रिया पूर्णपणे स्वतंत्र समिती मार्फत पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली.

**सिॲटल् अधिवेशन:** गेल्या दोन वर्षांतील सर्वात मोठे काम म्हणजे सिॲटल् अधिवेशनाची तयारी. करार, निधी संकलन, सरकारी निमंत्रणे, प्रायोजक, बैठकांचे नियोजन... अनेक आव्हाने आली. कधी कधी परिस्थिती अत्यंत कठीण झाली. पण संपूर्ण टीमच्या अथक परिश्रमामुळे आज आपण एका भव्य अधिवेशनाच्या उंबरठ्यावर उभे आहोत.

**माझी भूमिका:** या संपूर्ण प्रवासात मी फक्त तीन गोष्टी जपण्याचा प्रयत्न केला - पारदर्शकता, सर्वसमावेशकता, आणि संवाद. त्याच प्रमाणे विश्वस्त, कार्यकारिणी, मंडळे, स्वयंसेवक - सर्वांना सोबत घेऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न केला. या प्रवासात उत्तर अमेरिकेतील असंख्य मंडळांना भेटण्याची संधी मिळाली. माणसे जोडली. नाती जपली. हीच माझी खरी कमाई आहे.

**कृतज्ञता:** या प्रवासात साथ देणाऱ्या माझ्या कार्यकारिणीतील प्रत्येक सहकाऱ्याचा, विश्वस्तांचा, स्वयंसेवकांचा, सर्व मंडळांचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक सदस्याचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

विशेषतः माझी पत्नी **निवी**, माझी मुले **नील** आणि **प्रिया**, तसेच माझे संपूर्ण कुटुंब... गेल्या दोन वर्षांत त्यांनी माझ्यासोबत वेळ घालवण्याचा अनेकदा त्याग केला. मी त्यांच्यासाठी अपेक्षित तेवढा उपलब्ध राहू शकलो नाही. त्याबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. पण त्यांनीच मला समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण करण्याची प्रेरणा आणि ताकद दिली.

**शेवट...**

आज अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपत असला, तरी समाजसेवेचा माझा प्रवास इथे थांबणार नाही. मी उद्याही तुमच्यातलाच एक कार्यकर्ता असेन. परमेश्वराने अशीच सेवा करण्याची संधी आयुष्यभर देत राहो, हीच प्रार्थना. आपण दिलेल्या प्रेमासाठी, विश्वासासाठी आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

कळावे, लोभ असावा.

आपला,

- **प्रसाद पानवळकर**, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ (२०२४–२०२६)

# मागे वळून बघताना

***बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या गेल्या दोन वर्षातील प्रवासाचा मागोवा!***

"मराठी तितुका मेळवावा" हे ब्रीदवाक्य अंगीकारत बृहन्महाराष्ट्र वृत्ताची वाटचाल गेली सेहेचाळीस वर्षे अविरत चालू आहे. दर महिन्याच्या पहिल्या तारखेला न चुकता बृहन्महाराष्ट्र मंडळाचे हे मुखपत्र आपल्यासाठी मंडळाच्या त्या त्या महिन्यातील घडामोडींचा आढावा घेऊन येतं. इतकंच नाही तर उत्तर अमेरिकेतील सिद्धहस्त लेखकांचे अनमोल साहित्यही!

**सौ. जयश्रीताई हुपरीकर** ह्यांच्या हस्ताक्षरात प्रकाशित होणारे हे मासिक नंतर छापील आणि आता डिजिटल तसेच ऑडिओ माध्यमांतून आपल्यापर्यंत पोहोचत आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कामाचा विस्तार जसा वाढत आहे तसाच वृत्ताचा आकारही! सुरुवातीचे ८-१२ पानांचे वृत्त गेल्या महिन्यात ५० पानांवर येऊन पोहोचले आहे.

मंडळाच्या अठ्ठावीसहून अधिक उपक्रमांची आणि त्यांच्यासाठी अहोरात्र कष्ट घेणाऱ्या स्वयंसेवकांची ओळख आपल्या वाचकांना करून देणे, हे गेल्या दोन वर्षांतले आमचे प्रमुख ध्येय आम्ही उत्तम रित्या साध्य केले. BMMचा प्रत्येक उपक्रम समाजातील एका खास गरजेशी संबंधित आहे. त्या उपक्रमांत सहभागी झालेल्या लोकांच्या मुलाखती घेताना आम्ही खरोखरंच भारावून गेलो. बृहन्महाराष्ट्र मंडळाने समाजरंग उपक्रमाद्वारे भारतात तसेच अमेरिकेत आलेल्या नैसर्गिक आपत्तींनंतर भरभरून मदत केली. त्याविषयीची बातमी आणि उध्वस्त झालेल्या स्थळांची पुनर्बांधणी आम्हीही प्रत्यक्ष अनुभवली. वृत्ताने आपल्या उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवाना हाक दिली आणि त्यांनीही आपुलकीने मदत केली. ध्यान उपक्रमासाठी मुलाखत घेतानाचीही अशीच एक हृद्य आठवण आहे. **सायलीताई** सांगत होत्या की त्यांच्या श्रोतेवर्गापैकी काही एकटे आहेत आणि ते या कार्यक्रमाची वाट पाहत असतात. हा कार्यक्रम म्हणजे बाहेरच्या जगातील माणसांना जोडणारा दुवाच जणू! ही मुलाखत घेण्याच्या काही तास आधी अंथरुणाला खिळून असलेल्या माझ्या सासूबाईनी अखेरचा श्वास घेतला होता. हृदयात एक कळ उठली. BMM च्या शाळा विभागाने घेतलेल्या विविध स्पर्धांचे निकाल आणि त्यांतील विजेत्यांचे सादरीकरण तसेच उत्तररंग या उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी सादर केलेले आपले लेख आम्ही वृत्तात प्रकाशित केले. "लै अव्घड उमगया बाप रे" या उत्तररंगीयांनी लिहिलेल्या आपल्या वडिलांच्या आठवणी डोळ्यांच्या कडा भिजवून गेल्या.

याचबरोबर आम्ही BMMशी संलग्न असणाऱ्या महाराष्ट्र मंडळांची माहिती आमच्या वाचकांपर्यंत पोहोचवली. प्रत्येक मंडळाचा इतिहास वेगळा, जडणघडण वेगळी, सभासदांची संख्या नि वयेही वेगळी. पण प्रत्येक मंडळ आपल्या मायभूमीचा ऋणानुबंध जपून आहे. आपली संस्कृती, कला आणि भाषा साभिमान आपल्या पुढच्या पिढीकडे सोपवण्याची त्यांची धडपड प्रशंसनीय आहे; तसेच अमेरिकन सामाजिक कार्यात त्यांनी केलेले योगदान वाखाणण्यासारखे आहे. महाराष्ट्र मंडळ बे एरियाने नव्याने सुरु केलेल्या वासंतिक आणि शारदीय कला महोत्सवांचे तर्कशुद्ध विश्लेषण आणि फिलाडेल्फिया मराठी मंडळाने अनेक सामाजिक उपक्रमांसाठी केलेली निधी-उभारणी माझ्या खास लक्षात राहील.

प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सणांवर आणि खास दिवसांवर प्रकाशझोत टाकण्याचा आमचा प्रयत्न राहिला; जसे की, अमेरिकन आणि भारतीय स्वातंत्र्यदिन, ब्लॅक हिस्टरी मंथ, प्रेसिडेंट्स डे, आषाढ-श्रावण-भाद्रपद या महिन्यातील आपले सण, पंढरीची वारी, गुरुपौर्णिमा, शिवजयंती, मातृ आणि पितृदिन इत्यादी. या महत्त्वाच्या दिनविशेषांकडे बघण्याचा एक नवीन दृष्टिकोन आमच्या लेखकांच्या लिखाणातून जाणवला. गेली काही वर्षे वृत्तासाठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देणारी कविता लिहिण्याचे सौभाग्य मला मिळाले आहे.

आपल्या छोट्या बालमित्रांसाठी आम्ही अर्णव हे "कार्टून" सादर केले. **गौतम पंगू, विनिता वेल्हाळ** आणि **शीतल रांगणेकर** ह्यांनी ते अतिशय रंजक आणि वाचनीय पद्धतीने सादर केले. आपल्या युवांसाठी आम्ही "अभ्यासाव्यतिरिक्त ओळख" ही एक लेखमाला सुरु केली. **उत्तरा भालेराव** आणि आमच्या संपादक समितीचे सभासद यांनी मिळून, महाराष्ट्रीयन अमेरिकन तरुणाईने (वय वर्षे १६ ते २६) अभ्यासाची आणि करिअरची एक ठराविक चौकट मोडून इतर अनेक क्षेत्रात जी गरुड भरारी मारली आहे, तिचा परामर्श घेतला. किती प्रेरणादायी आहे या मुलांचा प्रवास! तसेच आम्ही आपल्या आजीवन तरुण असलेल्या आणि रुमानी व्यक्तिमत्त्वाच्या कवी-कवयित्रींसाठी प्रेमकवितांची स्पर्धा घेतली. या कवितांमध्ये परमेश्वरापासून ते आई-लेकरांचे प्रेम आणि तारुण्यसुलभ भावनेपासून ते देशप्रेमापर्यन्त प्रेमाच्या विविध रूपांची झलक वाचून आम्ही थक्क झालो. आपल्याकडे किती प्रतिभावंत लेखक आहेत याचा सार्थ अभिमानही वाटला. **नितीन जोशी**, **शैलेश पोद्दार** आणि आमच्या **विदुला कोल्हटकरने** परीक्षक म्हणून काम केले.

गेली दोन वर्षे **सद्गुरू प्रल्हाददादा पै** हे सातत्याने जीवनविद्येचे तत्वज्ञान आपल्यापर्यंत पोहोचवत आहेत. तसेच, अजयजी तनखीवाले राशिभविष्य पाठवत आहेत. त्यांचे अनेक आभार! त्याचप्रमाणे

अमेरिकेत साजरे होणाऱ्या श्री गजानन महाराज प्रकट दिन आणि श्री स्वामी समर्थ प्रकट दिन अशा धार्मिक कार्यक्रमांची माहिती आपण वाचकांना दिली. याचबरोबर, **आशिष महाबळ** यांनी सातत्याने विज्ञाननिष्ठ लेखनातून आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन दिला. वृत्तात प्रकाशित झालेली देश-विदेशची प्रवासवर्णने आपल्या माहितीत नेहमीच भर घालतात. निवृत्तीनंतर भेट द्यायच्या पर्यटन स्थळांची माझी "बकेट लिस्ट" तयार आहे. मुलाखती हा तर आमचा केंद्रबिंदू! प्रतिभावंत वक्त्या **धनश्री लेले**, **कीर्तनकार चारुदत्त आफळे**, **क्रिकेटपटू सौरभ नेत्रावळकर**, PNG Jewellers चे **आशुतोष जोशी** यांच्या मुलाखती लक्षवेधी होत्या. तसेच तरुणांनी तरुणांच्या घेतलेल्या मुलाखती अफलातून होत्या. भारतीय गायक **शुभंकर कुलकर्णी** याची अमेरिकेतील शास्त्रीय गायक **ऋग्वेद बर्वे** याने घेतलेली मुलाखत भारत आणि अमेरिका या दोन जगांतील भिन्न संगीतक्षेत्रातला एक सामान धागा दाखवून गेली. या सगळ्या प्रतिभावंत साहित्यिकांमुळे आम्ही सातत्याने दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण अंक आमच्या वाचकांपर्यंत पोहोचवू शकलो.

वृत्ताचा दिवाळी अंक नेहमीच देखणा असतो. कथा, कविता, लेख, प्रवासवर्णने, शब्दकोडे, मुलाखती यांची रेलचेल असलेला हा अंक बुकगंगा या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, इंदूर, वडोदरा, रत्नागिरी येथील वाचनालयातही उपलब्ध आहे. आम्ही दिवाळी अंकांच्या स्पर्धांमधून भाग घेतला. मुखपृष्ठावरील कमळाचे रेखाटन आमची खास ओळख आहे.

आपण सगळेच दर दोन वर्षांनी भरणाऱ्या BMM अधिवेशनाची वाट पाहत असतो. प्रत्येक वृत्तातील तिसरे पान अधिवेशनासाठी राखीव असते. तसेच संमेलन जवळ आले की विविध तिकीट-योजना, कार्यक्रम, आकर्षणे यांची रंगीबेरंगी जंत्री वृत्तात असते. यावेळी BMM वृत्ताने उत्तर अमेरिकेतील कार्यक्रमात आपली नोंदणी पाठवली आणि येत्या ७ ऑगस्टला प्रथमच BMM वृत्त आपला स्वत:चा स्वतंत्र कार्यक्रम मुख्य अधिवेशनात सादर करणार आहे. नाव अर्थातच: **"मराठी तितुका मेळवावा"!** यात नृत्य, नाट्य, कीर्तन, गायन, स्टॅन्ड अप, रील, कोडी, ध्यान अशा अनेक माध्यमांतून BMM च्या विविध उपक्रमांची माहिती दिली जाईल! जरूर या! BMM वृत्ताने बृहन्महाराष्ट्र मंडळाचे गौरव गीतही प्रकाशित केले आहे. ते http://bmmonline.org/about/bmm-gaurav-geet/ इथे उपलब्ध आहे. त्याचाही जरूर आनंद घ्या.

या सगळ्या प्रवासातील सगळ्यात आनंददायी बाब म्हणजे आमची समिती. सात जणांच्या आमच्या चमूने वेगवेगळ्या जबाबदाऱ्या अगदी लीलया पार पाडल्या. **विदुलाने** प्रूफ रिडींगचे (मुद्रितशोधनाचे) काम आमच्या सगळ्यांकडून नेटाने करून घेतले. **नीताताईंनी** पत्रव्यवहार चोख सांभाळला. **शीतलने** वृत्ताची सुंदर आखणी केली. कधीही कामाला तयार, अशी आमची शीतल! **शुभदाने** अनेक मुलाखती समोरच्या व्यक्तीला बोलते करून घेतल्या तर **कोमलमुळे** आमचा अंक ऑडिओ स्वरूपात निघू शकला. **अपर्णाने** वेब पेज आणि तांत्रिक बाबींची जबाबदारी उत्तम पार पाडली. विद्यार्थी सहाय्यक समितीचे **ओमकार, जय,** आणि **शुभम** यांनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला वृत्त वेबपेजवर प्रदर्शित केले. त्यांचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच आहे. BMM चे अध्यक्ष, **प्रसाद पानवळकर**, खजिनदार, **संतोष साळवी** आणि कार्यकारणी सभासद, **गौरव पटवर्धन** यांच्या पाठिंब्यामुळे आम्ही ही प्रगती करू शकलो. माझ्यासाठी हे सगळे आयुष्यभराचे दोस्त झाले. माझे वाचन वाढले आणि भाषा समृद्ध झाली. आणखी काय पाहिजे? "याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा"

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपला वाचक वर्ग. तुमच्या अखंडित प्रोत्साहनामुळेच आम्ही ही मजल मारू शकलो. आपला सगळ्यांचा लोभ आहेच तो असाच वाढू दे! पुढल्या समितीच्या पाठीशी तुम्ही असेच उभे राहाल ही माझी खात्री आहे! खूप खूप आभार!

- **अनिता म. कांत**, मुख्य संपादिका, बृहन्महाराष्ट्र वृत्त

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



# निरोप

चार वर्षांपूर्वी सहज प्रयत्न करुन बृ. म. मं. वृत्ताच्या संपादकीय समितीत सामील झाले तेव्हा ह्या कामाचं कुतूहल आणि उत्सुकता खूप होती. मात्र पूर्ववत अनुभव नसल्याने थोडी आत्मविश्वासाची कमतरता जाणवली. पण लवकरच समजले की मी काही ह्याबाबतीत एकटी नाही माझ्यासारख्या इतरही नवशिक्या आहेत. हो आम्ही सात बायका एकत्र काम करायला लागलो. एक-दोघींच्या आधीच्या अनुभवाचा पाया घालून, एकमेकांकडून तंत्रज्ञानाचे धडे घेऊन नवीन वृत्ताची पहिली आवृत्ती सप्टेंबर २०२२ च्या महिन्यात, **सौ. शुभदा सावरगावकरच्या** नेतृत्वाखाली प्रकाशित झाली सुद्धा! सेप्टेंबर २०२२ च्या अंकाची काया, बृ. म. मं. च्या नवीन अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली समिती-केंद्रित निर्णय व कामाच्या विभागणीतून जन्मलेला नवीन वृत्त, हळूहळू आपला रंग रुपरेषा आणि मजकूर विकसित करू लागला. साती समिती सदस्यांचे स्वभाव छान जुळले. कुठलाही रुसवा फुगवा मधे न आणता, निव्वळ काम व्यवस्थित पूर्ण करणे हेच ध्येय समोर ठेवले आणि म्हणता म्हणता दोन वर्षे उलटून पण गेली.



संपादकीय समितीचे दोन वर्षे काम करुन पोट भरले नव्हते. आम्हा साती जणींचा चमू अजिबात न बदलता आम्ही परत बृ. म. मं. च्या नवीन अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली काम रुजू ठेवले व Executive Committee ने मान्य केले. **सौ. अनिता कांतच्या** नेतृत्वाचा जोश सगळ्यांमध्ये उतरू लागला. नवीन उमेद, नवीन आकांक्षा व नवीन तंत्रज्ञान या तिघांचा संगम होऊन वृत्ताची आता उत्क्रांती व्हायला लागली. अंक ५० पानापर्यंत पोचला. आता तुम्हाला (वाचकांना) बृ. म. मं. चे सगळे उपक्रम व त्यांच्या चालकांच्या मुलाखतीमुळे झालेले ओळखीचे चेहरे दिसू लागले. वेगवेगळ्या प्रांतातल्या मराठी मंडळांनी बसवलेली विशेष नाटके, सणासुदीचे सोहळे तसेच त्या मंडळाचा इतिहासही छापून आला. दिवाळीचा विशेषांक - स्पर्धेमध्ये भाग घ्यायच्या पातळी वर आला. लेखांमध्ये विविधता इतकी आली - तंत्रज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान, खगोलशास्त्र, वास्तुकला, पाकशास्त्र, कर्करोगावरील चर्चा, वित्त व्यस्था असे एक ना अनेक पैलूंचे आढावे वृत्ताने घेतले. त्यासाठी खऱ्या अर्थाने पत्रकाराची भूमिका आम्ही बजावली. वृत्ताची प्रसिध्दी गावो गावी पसरून साता समुद्रापलीकडे पोचली. डिजिटल प्रत तर जगाच्या कानाकोपऱ्यात वाचायला मिळू लागली. अधिवेशनाची तयारी अत:पासून इती:पर्यंत प्रकाशित झाली शिवाय बृ. म. मं. ची आर्थिक संरचना जनतेच्या डोळ्यासमोर आली.

अध्यक्षीय, कविता स्पर्धा, वडील आणि नातवंडांबद्दल निवडक विशेष लेख..... युवकांच्या शौर्य गाथा व त्यांचे स्वहस्ते इंग्लिशमध्ये लिहिलेले वाङ्मय वाचून आमच्या माना ताठ झाल्या. आपल्या समाजाला एखादी फुलाची पाकळी अर्पण करता आली ह्यातच आमचे समाधान. सप्टेंबरपासून नवीन समितीचे काम सुरु होईल, त्यांना मनापासून शुभेच्छा व **संपादकीय समिती २०२२ - २०२६** चा त्यांना कायम पाठिंबा!!

- **नीता धोपेश्वरकर**, पारसीपनी, न्यू जर्सी



## बृहन्महाराष्ट्र मंडळ गौरव गीत

आपण मराठी माणसं साता समुद्रापार उत्तर अमेरिकेत आलो; इथे प्रस्थापित झालो, इथल्या मातीत रुजलो. या आपल्या प्रवासात बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) सतत आपल्या बरोबर होतं आणि आहे. एखाद्या कुटुंबाप्रमाणे, BMM आपल्या २८हुन अधिक उपक्रमांद्वारे आपल्या गरजेच्या क्षणी आपल्या पाठीशी उभं राहिलं.

या उपक्रमातील सर्व स्वयंसेवकांना सादर अभिवादन.

**बृहन्महाराष्ट्र मंडळ**

मराठी तितुका मेळविण्याची अहोरात्र चळवळ
परदेशातील कुटुंब अपुले महाराष्ट्र मंडळ,
बृहन्महाराष्ट्र मंडळ IIधृII

जमुनी रमती उत्तररंगी नागरिक ज्येष्ठ
मुलांस शिकवू मायबोली जी सुधेहून श्रेष्ठ
आरोग्याचा सल्ला मिळतो जैसे गंगाजळ II१II

नृत्य नाट्य संगीत कलांचा सुंदर आविष्कार
देशी-विदेशी कलाकार ते करती त्यां साकार
मनापासूनी करती कौतुक प्रेक्षक चोखंदळ II२II

उद्योगाची मिळे प्रेरणा, अर्थाचे मंथन
रेशीमगाठी कुणी बांधती मनास मिळता मन
ध्यानधारणा, पूजा शमविती मनातला गोंधळ II३II

अज्ञाताचा शोध घेतसे ज्योतिष, तत्त्वज्ञान
लक्ष्यवेध करण्यास सज्ज हो सैन्यातील जवान
मायदेशीही मदत पाठवी भरभरूनी ओंजळ II४II

युवा पिढीला देऊ वारसा होवो संस्कारी
वृत्तासंगे जाई वार्ता दिशांतून चारी
करू उन्नती सगळे मिळुनी हीच एक तळमळ II५I

**शब्द: अनिता म. कांत संगीत: मंजुषा जोशी**
**स्वर: चिन्मय जोग आणि मयुरी कुडाळकर**
**Chorus: हृषीकेश केळकर, अमित जोशी, संजना पाटणकर, मानसी दिक्षित**
**रेकॉर्डिंग: संदीप पाटणकर (Gracenote Studio)**
**विशेष साहाय्य्य: पंढरीनाथ माने**
**निर्मिती: बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मासिक वृत्त**

**Audio Link**:
https://bmmonline.org/about/bmm-gaurav-geet/

## (अमेरिकन) भारतीय स्वातंत्र्य दिन - पंधरा ऑगस्ट!

अलीकडे चार जुलैला आमच्या कर्मभूमीचा, अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन आम्ही साजरा केला. पाठोपाठ आमच्या जन्मभूमीचा, भारताचा स्वातंत्र्य दिन पंधरा ऑगस्टला येतो आहे. आम्ही कायमस्वरूपी स्थलांतरित लोक आता कागदोपत्री भारतीय नसलो तरी पंधरा ऑगस्टचं महत्व आमच्या मनातून जराही कमी झालेलं नाही. उलट जसजसं आम्ही जास्त जास्त जग पाहिलं आणि अनुभवलं तसतसं आम्हाला पंधरा ऑगस्टचं महत्व अधिकच प्रकर्षाने जाणवायला लागलेलं आहे. स्वातंत्र्य गमावण्याचा आणि ते पुन्हा परत मिळवण्याचा भारतीय संघर्षाचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. वेदकाळात जगाच्या अनेक योजने पुढे असलेला भारत देश मध्ययुगात परकीयांच्या सततच्या आक्रमणांमुळे स्वातंत्र्य गमावून बसला आणि मग पुढच्या अनेक शतकांचा निकराचा संघर्ष करून पुन्हा स्वतंत्र झाला! ही अंतिम विजयगाथा लिहिण्यासाठी त्यांनी रक्त, घाम आणि अश्रूंचं भारंभार मोल दिलेलं आहे. स्वातंत्र्याची खरी किंमत काय आहे ते भारतीयांपेक्षा जास्त जगातल्या दुसऱ्या कोणत्या लोकांना कळणार?

काही वर्षांपूर्वी मी 'स्वातंत्र्याच्या प्रकाशवाटा' हे नाटक लिहिलं होतं जे व्हर्जिनिया, वॉशिंग्टन डीसी, पिट्स्बर्ग अशा मराठी मंडळांत आणि बीएमएम उत्तररंगमध्ये सादर झालं होतं. ह्या नाटकात सादर झालेलं स्वातंत्र्य फक्त राजकीय नव्हतं तर सामाजिक स्वातंत्र्य होतं, व्यक्ती स्वातंत्र्य होतं, आर्थिक स्वातंत्र्य होतं, मत स्वातंत्र्य होतं - स्वातंत्र्याच्या विविध अंगांचा परिचय करून देणारं होतं. ह्या नाटकामध्ये अशा सर्वांगिण स्वातंत्र्यासाठी स्वतःचं बलिदान केलेल्या क्रांतिकारकांच्या आणि समाज सुधारकांच्या गोष्टी नाट्यमय रीतीने दाखवलेल्या होत्या. स्वतंत्रतेच्या वाटेवरच्या निबिड अरण्यातले भयंकर काटे त्यांनी अंगावर झेलले - रक्तबंबाळ करणारे काटे, जिव्हारी टोचणारे, पाय जाग्यावर खिळवून ठेवणारे. पण तरी अनेक लोकांनी अशा काटेवनात स्वतःला झोकून दिलं. जिवाच्या कराराने त्यातून ते मार्ग शोधत राहिले. पुरुषांना तुरुंगात छळ सोसावे लागले, कुटुंबापासून दूर राहावे लागले, जागोजागी मानहानी सहन करावी लागली, तर कधी जीव गमवावे लागले. स्त्रियांचे तरुणपणीच सौभाग्य उजाडले, त्यांना मुलांना घेऊन बेघर व्हावे लागले, उपाशी-अर्धपोटी राहावे लागले, शारिरिक अत्याचार सहन करावे लागले - हे सारे कष्ट त्या स्त्रियांनी धीराने पचविले. का म्हणून ह्या स्त्री-पुरुषांनी स्वतःचा जीव खुशीखुशी

दुःखात घातला? प्रसंगी जिवाचं बलिदान करून अत्युच्च त्याग केला - कशासाठी? कुणासाठी? किती काळ? मागचा पुढचा कसलाही विचार न करता ते पुढे जातच राहिले. त्यांच्या अंतिम ध्येयापर्यंत - आणि ते ध्येय होतं - स्वातंत्र्य! देशाचं आणि भूमीचं स्वातंत्र्य आणि त्याच बरोबर एक माणूस म्हणून मानाने जगण्याचं, वागण्याचं, बोलण्याचं आणि शिकण्याचं स्वातंत्र्य. स्वतःच्या आयुष्याच्या मशाली पेटवून स्वातंत्र्याच्या वाटा निर्माण करणाऱ्या ध्येयवेड्या लोकांनी उजळलेल्या ह्या स्वातंत्र्याच्या प्रकाशवाटा ह्या पंधरा ऑगस्टच्या निमित्ताने आपण त्यांना कृतज्ञता दाखवत, त्यांना मानवंदना देत साजऱ्या करणार आहोत!

ह्या स्वातंत्र्याचं एक साधं उदाहरण घ्यायचं तर स्त्रीस्वातंत्र्याचं घेता येईल. भारतात आणि महाराष्ट्रात १८५०च्या काळात स्त्रियांची अवस्था जवळजवळ गुलामीची, मुक्या जनावरांची होती. त्यावेळी ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले ह्या दाम्पत्याने स्त्रीशिक्षणासाठी समाज जागर चालवला. सावित्रीबाईंच्या शाळेतल्या एका मुलीनं - मुक्ताबाईनं एक निबंध लिहिला होता. ती लहानगी मुलगी त्यात म्हणत होती," मंदिराच्या पायात आम्हाला जिवंत पुरत असत आणि त्या देवाचं दर्शनही आमच्या समाजाला मिळत नाही. आम्हाला शिकायचा, लिहा-वाचायचा अधिकार नाही. पण ज्योतिराव आणि सावित्रीबाईंना देवाने पाठवले आणि आम्हाला शिक्षण मिळाले - आता कोणी आम्हाला त्रास देणार नाही. कोणी आम्हाला फासावर चढवणार नाही. कोणी आम्हाला जिवंत पुरणार नाही." त्या काळी ती म्हणत होती ते खरं होतं - स्त्रीला त्या समाजात काहीच अधिकार नव्हता. ना धड शिक्षण, ना संपत्ती, ना कसला अधिकार, ना स्वातंत्र्य, ना तिच्या मताला काही किंमत. पशूहून वाईट दशा होती तिची. हुंडा देऊ न शकणारा एखादा अगतिक बाप सात-आठ वर्षांच्या त्याच्या पोरीला साठ-सत्तर वर्षांच्या एखाद्या वृद्धाच्या गळ्यात बांधून मोकळा होत असे आणि त्या मुलीचा टाहो ज्योतिरावांच्या काव्यातून उमटत असे-

का हो अण्णा मी तुमची लाडकी
का हो करीता मला अशी बोडकी

पण त्याचा उपयोग काही नव्हता. बायकांचे आक्रोश कोण ऐकतो? मग अशा अकाली विधवा झालेल्या स्त्रिया घराच्या सांदी-कोपऱ्यात फुटक्या कपाळाला दोष देत उरलेलं सगळं आयुष्य अश्रू गाळत काढायच्या. ज्योतिबा कळवळून उठले आणि म्हणाले," समाजाला दिसत नाही का हे? का डोळ्यांवर कातडं चढवता तुमच्या? का मुलींचे बालविवाह करता? का कोवळ्या जीवांना संसाराच्या घाण्याला जुंपता? का विधवांचे केस कापून त्यांना विद्रुप करता? म्हाताऱ्यांशी लग्न झाल्यामुळे त्या तरुणपणी विधवा झाल्या हा का त्यांचा दोष आहे? का त्यांना विद्येपासून वंचित करता? का त्यांना घरांत कोंडून ठेवता? का? का? का?" स्वातंत्र्याची सुरुवात अशा एका ठिणगीने होते.

ह्या सामाजिक अन्यायाचेच पडसाद आजच्या काळातही अमेरिकेत उठत आहेत - "ब्लॅक लाईव्ज मॅटर! आय कँट ब्रीद! आय कँट ब्रीद! मी टू! मी टू!" किती आक्रोश चाललाय सगळीकडे. आपल्याला वाटतं अमेरिका स्वतंत्र झाली - बरोबर आहे - ब्रिटिशांच्या सत्तेपासून स्वतंत्र झाली पण सर्व दृष्टीने स्वतंत्र झाली का? सगळा समाज अनिष्ट रूढी आणि परंपरांपासून स्वतंत्र झाला का? सगळ्या लोकांना समान हक्क मिळायला लागले का? सगळ्यांना समान संधी मिळायला लागल्या का? सगळयांना सारखाच मान मिळायला लागला का? समान कामाचं समान वेतन सगळ्यांना मिळतं का? एका तरी प्रश्नाचं छातीठोकपणे 'हो' असं उत्तर आहे का? आज अधिकाराच्या ठिकाणी स्त्रीला मागे रेटण्यात येतं. तिला पुरुषाइतका पगार मिळत नाही आणि वर तिच्यावर भावनिक, लैंगिक अत्याचार होतात. झाली आहे अमेरिकन स्त्री स्वतंत्र? एकेकाळी अमेरिकेत स्त्रीला मतदानाचा अधिकार नव्हता, शिक्षणाचा अधिकार नव्हता, मिलिटरीत भरती होण्याचा, युद्धावर जाऊन लढाई करण्याचा, फायटर विमान चालवण्याचा, प्रॉपर्टी खरेदी करण्याचा अधिकार नव्हता, घरकाम आणि मातृत्व ह्या दोनच गोष्टीकडे लक्ष केंद्रित न करता इतर विषयांवर बोलायचा अधिकारही नव्हता. इतकंच काय तर स्वतःचा पगार स्वतःकडे ठेवण्याचा अधिकार सुद्धा स्त्रीला नव्हता! सध्याच्या काळात अमेरिकेत मोठ्या कष्टाने मिळवलेले हे स्त्रियांचे अधिकार परत काढून घेतले जातील की काय अशी शंका येते! मध्यपूर्वेत परिस्थिती काही वेगळी नाही. तिथे काही देशात अजूनही स्त्रियांना एकट्याने घराबाहेर फिरायला जायची परवानगी नाही - त्यांच्या बरोबर वडील, नवरा, भाऊ, मुलगा अशी कोणीतरी पुरुष व्यक्ती बरोबर असायला लागते - नाहीतर तो कायदेशीर गुन्हा ठरतो. त्यांना वाहन चालवायचे अधिकार नाहीत. शिक्षणाचेसुद्धा अधिकार नाहीत. आणि ध्यानात घ्या हा ज्योतिबा फुलेंचा १८५०चा कालखंड नाही - हा २०२६चा सध्याचा चालू कालखंड आहे! म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा जागर चालू ठेवायला हवा - त्याची नितांत गरज आहे.

आज अमेरिकेत गावोगावची भारतीय मंडळे पंधरा ऑगस्ट मोठ्या उत्साहाने साजरा करतील आणि त्यांनी तो सण साजरा केलाच पाहिजे! तुमचं नागरिकत्व कोणतंही असो पण स्वातंत्र्याच्या प्रकाशज्योती भारत, अमेरिकेतच काय पण साऱ्या जगात मोठ्या दिमाखात झळकत राहिल्या पाहिजेत! स्वातंत्र्यासाठी ना पारपत्राची गरज आहे, ना जाती-धर्म-भाषेची, आणि ना लैंगिक ओळखीची.

कुठलंही अन्यायकारक, अनाठायी, अनावश्यक, कृत्रिम बंधन नसणे हाच एकमेव जागतिक स्वातंत्र्याचा धर्म आहे आणि तो जागृत ठेवणं हेच सगळ्यांचं कर्म आहे!

- **डॉ. प्रियदर्शन मनोहर**, पिट्सबर्ग, पीए

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## उदधि

संथ निळ्या लहरींवरती,
प्रभा सोनेरी चमचमती
फेसाळत जलधि अवनीवरती,
कणकणांत उजळून रेती
नाद-निनाद सभोवताली,
जलतरंग उठती विरती
साद घालत मधुर गुंजारव,
स्वच्छंद विहंग गगनी रमती
वाऱ्यासंगे डोल डोलती,
गलबतं क्षितिजावरती
शीड पेलतो विशाल सागर,
निवांत तट सोबती
कवेत घेऊनि नील नभासी,
समाधिस्थ अथांग उदधि
नील छटा रंगात रंगूनि,
चित्र अस्मानी एक अवधी

- **चैत्राली काटे - यादव**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



शालेय जीवनापासून पिस्तूल नेमबाजीची आवड जोपासणाऱ्या **अंकिताने** अल्पावधीतच राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये १५ सुवर्ण, ६ रौप्य आणि ४ कांस्य पदके जिंकून तिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप पाडली आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही तिने जिद्द, चिकाटी आणि शिस्तीच्या बळावर प्रेरणादायी यश मिळवले आहे. तिच्या या प्रेरणादायी प्रवासाबद्दल जाणून घेऊ या.

**तुझ्याबद्दल आम्हाला सांगशील कां ?**

मी **अंकिता अमोल देवकुळे, लुट्झ, फ्लोरिडा** येथे राहते. सध्या मी The Ohio State University मध्ये बायोकेमिस्ट्री (ऑनर्स)च्या दुसऱ्या वर्षात प्री-मेडिकल ट्रॅकवर शिक्षण घेत आहे. पिस्तूल नेमबाजीतील कामगिरीमुळे मला Ohio University कडून Division-A मध्ये प्रवेश मिळाला आहे.

अभ्यासाबरोबरच मला संगीताचीही आवड असून मी ७ वर्षे व्हायोलिन शिकले आहे. तसेच पियानो आणि गिटार वाजवण्याचीही आवड आहे. मी Steinbrenner High School (2021–2025) मधून ५८५ विद्यार्थ्यांच्या वर्गात १५वा क्रमांक मिळवत पदवी प्राप्त केली. शालेय शिक्षणादरम्यान ७ वर्षे ऑर्केस्ट्रामध्ये सहभाग, Hillsborough All County Orchestra तसेच सोलो परफॉर्मन्समध्ये सहभाग घेतला. याशिवाय १२ AP आणि ११ Dual Enrollment अभ्यासक्रम पूर्ण करून AP Capstone Diploma मिळवला.

**तुला पिस्तूल नेमबाजीची आवड कशी निर्माण झाली, हा खेळ तुला कां निवडावासा वाटला?**

खरं सांगायचं तर, पिस्तूल शूटिंग हा एक खेळ आहे, हे मला आधी माहीत नव्हतं. माझे वडील एअर रायफल शूटिंगमध्ये राष्ट्रीय स्तरावर खेळले होते. कोविडच्या काळात त्यांनी पुन्हा शूटिंग सुरू केलं आणि मला व माझ्या बहिणीला, अंजलीला, रेंजवर नेलं. पहिल्याच प्रयत्नात मला हा खेळ आवडला आणि २०२१ पासून माझा पिस्तूल शूटिंगचा प्रवास सुरू झाला.

**तुझ सराव कसा असतो तसेच Training Session कसे असते?**

माझ्या पहिल्या प्रशिक्षण सत्रात नेमबाजीची मूलभूत तत्त्वे, रेंजवरील सुरक्षा नियम आणि १० मीटर पिस्तूल प्रकाराची ओळख झाली. विद्यापीठातील प्रशिक्षण शिस्तबद्ध असून सोमवार ते शुक्रवार दररोज ३ तास सराव आणि आठवड्यातून २ - ३ वेळा जिममध्ये ताकद व तंदुरुस्तीवर भर दिला जातो. श्वास व मानसिक नियंत्रणाचाही नियमित सराव केला जातो. याशिवाय, वेळ मिळेल तेव्हा मी आठवड्याला ५ - १० तास अतिरिक्त सराव करून माझे कौशल्य अधिक विकसित करण्याचा प्रयत्न करते.

**स्पर्धात्मक पिस्तूल नेमबाजीमध्ये कोणती कौशल्ये सर्वात महत्त्वाची असतात, तुझी पहिली स्पर्धा कशी होती आणि स्पर्धेचे स्वरुप कसे असते?**

नक्कीच, एकाग्रता खूप महत्त्वाची असते. स्पर्धेच्या ठिकाणी खूप लोक असतात. त्यातील अनेकजण नेमबाजी करत असतात. आजूबाजूला अनेक प्रकारचे विचलित करणारे घटक असतात. अशा परिस्थितीत एखादा शॉट अपेक्षेप्रमाणे गेला नाही, तरी स्वतःचे लक्ष विचलित होऊ न देता, "पुढचा शॉट अजून बाकी आहे," असे स्वतःला सांगत पुन्हा पूर्ण एकाग्रतेने खेळावे लागते.

डिसेंबर २०२१ मध्ये, नेमबाजी सुरू केल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच मी विंटर एअर गन राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले. त्या स्पर्धेत नियम अतिशय कडक होते, त्यामुळे मला स्पर्धेतील शिस्त आणि नियमांची चांगली ओळख झाली. सरावाच्या तुलनेत माझी कामगिरी अधिक चांगली झाली आणि १५ वर्षांखालील गटात मी सुवर्णपदक जिंकले.

**मी दोन प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेते:**

1. १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धा– या स्पर्धेत ६० शॉट्स मारावे लागतात. एकूण ६०० गुणांसाठी हे ६० शॉट्स ७५ मिनिटांत पूर्ण करावे लागतात. त्यानंतर सर्वोत्तम ८ शॉट्स पुढील फेरीसाठी पात्र ठरतात. अंतिम फेरीत २४ शॉट्स असतात.
2. २५ मीटर स्पोर्ट पिस्तूल स्पर्धा– ही स्पर्धा दोन टप्प्यांत होते. पहिल्या टप्प्यात ३० शॉट्स संथ आणि अचूक पद्धतीने मारावे लागतात. त्यानंतरच्या टप्प्यात ३० शॉट्स जलद गतीने मारावे लागतात.

   हे सगळे सिंगल शॉट्स असतात, प्रत्येक शॉट्स नंतर परत पिस्तूल भरुन नेम धरावा लागतो. त्यात साधारणत: १० ते १५ सेकंद जाऊ शकतात.

१० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत १० गुणांच्या वर्तुळाचा व्यास केवळ ११.५ मिमी असतो. सुमारे ३३ फूट अंतरावरून इतक्या लहान लक्ष्यावर सातत्याने अचूक नेम साधण्यासाठी अत्यंत स्थिरता, एकाग्रता आणि उत्कृष्ट नियंत्रण आवश्यक असते.



त्याचप्रमाणे, २५ मीटर स्पोर्ट पिस्तूल स्पर्धेत १० गुणांच्या वर्तुळाचा व्यास ५० मिमी असतो. मात्र हे लक्ष्य सुमारे ८२ फूट अंतरावरून भेदायचे असल्याने अत्यंत अचूक नेमबाजीची आवश्यकता असते

**या खेळातल्या अडचणी तू कश्या हाताळल्या, आतापर्यंतची तुझी सर्वात मोठी कामगिरी कोणती आहे?**

माझ्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत (दक्षिण कोरिया) विशाल मंच पाहून क्षणभर दडपण आले, पण शांत राहून सरावावर विश्वास ठेवला. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा अभिमान वाटला. महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षी NCAA स्पर्धेत सहभाग घेतल्यानंतर, २०२६ मध्ये अमेरिकेच्या संघात निवड होऊन म्युनिक येथे झालेल्या Open World Cup मध्ये खेळण्याची संधी मिळाली. जगातील सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करणे हा माझ्या आयुष्यातील अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय अनुभव ठरला.

**तुझ्या शिक्षकांना आणि मित्रांना तुझ्या खेळाबद्दल काय वाटते?**

सुरुवातीला काही संमिश्र प्रतिक्रिया आल्या, पण त्या लोकांना समजावून सांगितल्यानंतर सर्वांचा प्रतिसाद सकारात्मक होता. हायस्कूल आणि कॉलेजमधील शिक्षकांनी नेहमीच मला सहकार्य केले. स्पर्धांमुळे अनुपस्थित राहावे लागल्यास त्यांनी अभ्यास, असाइनमेंट आणि उपस्थितीबाबत आवश्यक सवलती दिल्या. त्यामुळे मला शिक्षण आणि स्पर्धा या दोन्ही गोष्टी प्रभावीपणे सांभाळता आल्या.

**तुला शाळेतले कोणते विषय आवडतात?**

मला विज्ञान आणि गणित विषय आवडतात. गणितात विशेषतः कॅल्क्युलस आवडते आणि मी नुकतेच कॅल्क्युलस ३ पूर्ण केले आहे. तसेच, मी माझ्या महाविद्यालयीन शिक्षणाची सुरुवात बायोकेमिस्ट्री विषयातून केली आहे.

**तुझ्या प्रगतीत कोणत्या कोचने मोठा बदल घडवला आहे का?**

माझे पहिले प्रशिक्षक माझे वडील, अमोल देवकुळे (Certified प्रशिक्षक) होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या नेमबाजीचा भक्कम पाया रचला गेला. त्यानंतर बॉब ग्राइम्स यांनी रेंज फॅसिलिटी आणि इलेक्ट्रॉनिक टार्गेट्सचा प्रभावी वापर शिकवला. सध्या महाविद्यालयात एमिल मिलेव यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्या मानसिक व शारीरिक क्षमतांमध्ये  मोठी सुधारणा झाली आहे. सहा वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या आणि १९९६ अटलांटा ऑलिम्पिकचे रौप्यपदक विजेते एमिल मिलेव यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**स्पर्धात्मक पिस्तूल शूटिंगमधून तुम्ही सुरक्षितता आणि जबाबदारीबद्दल काय शिकलात?**

पिस्तूल स्पर्धा आंतरराष्ट्रीय शूटिंग स्पोर्ट फेडरेशन (ISSF)  च्या सुरक्षा व तांत्रिक नियमांनुसार घेतल्या जातात. नेमबाजाने पिस्तूल नेहमी लक्ष्याच्या दिशेने ठेवावे, वापरात नसताना बोअर इंडिकेटर (सेफ्टी फ्लॅग)  लावावा आणि लक्ष्यावर नेम धरण्यापूर्वी ट्रिगरवर बोट ठेवू नये.

**तुझे भविष्यात काय करायचा विचार आहे ?**

आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये टीम यूएसएचे प्रतिनिधित्व करत राहणे, महाविद्यालयीन नेमबाजीच्या सर्वोच्च स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणे आणि अखेरीस २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळवणे.

**तुला बाकीच्यांना काय सांगावेसे वाटते ?**

तुम्ही जे काही कराल त्याच्या शिस्तीचे पालन करा, त्याच्या तपशीलांवर लक्ष केंद्रित ठेवा. दररोजच्या सरावातून शिकण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा सुधारण्यासाठी उपयोग करा. चिकाटी, वेळेचे व्यवस्थापन आणि जरी अपयश आले तरी पुढील संधी शोधा, ती तुम्हाला यशाकडे घेऊन जाईल.

- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा




## एका संधीने घडलेले भविष्य

या वेळेच्या पुण्याच्या ट्रीपमध्ये बरेच काही करायचे असे योजूनच ट्रीप आखली होती. येऊन तसे एक दोनच दिवस झाले होते. घर आवरत असताना घरातील प्रत्येक वस्तू जणू भूतकाळाचे दार उघडत होती. प्रत्येक गोष्टीत आई-वडिलांच्या आठवणी दडल्या होत्या आणि त्यांची सतत जाणीव करून देत होत्या. एकदम फोनच्या आवाजाने भानावर आले. सुनीताताई आईला मदत करायच्या त्यांचा फोन होता, विचारत होत्या, “कधी आलीस ? आहेस का आज घरी? आज मी भेटायला येते तुला”. मी विचारात पडले, काय काम असेल यांचा काहीच अंदाज येत नव्हता. मग त्याच विचारात परत आवरायला लागले. ठरल्याप्रमाणे सुनीताबाई त्यांच्या मुलीबरोबर भेटायला आल्या, आल्यासरशी त्यांनी हातावर पेढा ठेवला, म्हणत की माझी मुलगी आज ग्रेजुएट झाली. सगळी तुमच्या आईंची कृपा. मला तर काहीच समजत नव्हते. काय हे, कसली कृपा. माझ्या आईचा ह्यात कोणता सहभाग आहे.

मी सुनीताताई आणि त्यांच्या मुलीला बसायला सांगितले आणि त्यांना म्हणाले मला सगळे सविस्तर सांगता का? त्यासरशी सुनिताबाई म्हणाल्या की मी जेव्हा तुमच्याकडे कामाला होते तेव्हा तुमची आई मला या ना त्या प्रकारे नेहमीच मदत करायच्या. तेव्हा एक दिवस माझा पडलेला चेहरा पाहून आईंनी विचारले होते की काय झाले. तेव्हा मी म्हणाले होते, माझी मुलगी १२ वी पास झाली आणि तिला Nurse चे शिक्षण घ्यायची इच्छा आहे. पण इतकी फी कशी भरायची, कसे झेपायचे सगळे. आमच्या परिस्थितीमुळे मुलीला तिच्या मनाप्रमाणे शिकायला जमणार नाही म्हणून वाईट वाटत आहे. त्याक्षणी आईंनी एक क्षण पण न दवडता मला म्हणाल्या की तिला फार्म भरायला सांग, फीचे आपण बघू. त्यानंतर तुमच्या आईंनी काही पैसे दिले, तसेच एका संस्थेच्या अध्यक्षांची ओळख करून दिली. मग त्या संस्थेतर्फे माझ्या मुलीला शिष्यवृत्ती मिळाली. आई होत्या तोपर्यंत त्या नेहमी मला आणि माझ्या मुलीला मदत करायच्या. तिचा गणवेश, तिची पुस्तके आणि शिक्षणासाठी लागणाऱ्या इतर सर्व गोष्टींची त्या मनापासून काळजी घ्यायच्या. आता निलिमा ग्रॅजुऐट झाली हे पाहायला त्या पाहिजे होत्या, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघायला मुकलो आपण. हे सगळे मला नवीन होते. आई सगळ्यांना मदत करायची हे माहिती होते. एका मुलीचे आयुष्य घडवले आणि ते पण कसलाच गाजावाजा न करता. अगदी आम्हाला पण काही बोलली

नव्हती. आमचीच आई आम्हाला नव्याने कळत होती. शिक्षणाची मदत देऊन तिने केवळ एका मुलीला शिक्षणाची संधी दिली नाही तर तिला आत्मविश्वास, स्वावलंबन आणि उज्वल भविष्यासाठी नवी दिशा दिली होती.

हा उपक्रम मला यावर्षीच्या 'विमेन्स इक्वॅलिटी डे' (२६ ऑगस्ट'२६) च्या संकल्पनेशी सुसंगत वाटला. 'Leading the Change: Women Shaping a Sustainable Future' ही संकल्पना महिलांच्या नेतृत्वातून समाजात सकारात्मक आणि दीर्घकालीन बदल घडवून आणण्यावर भर देते. घरातील काम करणाऱ्या महिलेच्या मुलीला शिक्षणासाठी मदत करून या संकल्पनेचे उत्कृष्ट उदाहरण घालून देण्यात आले आहे.

समाजात अनेकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना शिक्षणाच्या संधी कमी मिळतात. परंतु या उपक्रमातून तिची सामाजिक किंवा आर्थिक पार्श्वभूमी न पाहता तिला शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली.

ही कृती समानतेच्या तत्त्वाचे प्रतीक आहे, कारण प्रत्येक मुलीला शिकण्याचा आणि स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याचा समान अधिकार आहे. शिक्षणामुळे त्या मुलीला आत्मविश्वास, ज्ञान आणि कौशल्ये मिळतील. ती भविष्यात स्वावलंबी होऊन स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावू शकेल. शिक्षित महिला केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीलाही चालना देते. अशा प्रकारे एका मुलीच्या शिक्षणात केलेली गुंतवणूक अनेक पिढ्यांसाठी सकारात्मक परिणाम घडवते. म्हणूनच ही मदत केवळ एक सामाजिक कार्य नसून समानता, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत भविष्य घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशा कृतींमधूनच महिला बदलाचे नेतृत्व करतात आणि अधिक न्याय्य, समावेशक व शाश्वत समाजाची निर्मिती करतात.

या उपक्रमामुळे त्या मुलीच्या आयुष्यातील अडथळे कमी झाले. ही केवळ आर्थिक मदत नव्हती, तर तिला स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी होती. अशा प्रकारे समानतेचा अर्थ प्रत्यक्ष कृतीतून साकार झाला. महिलांच्या प्रगतीसाठी महिलांनीच एकमेकींना साथ देणे आवश्यक आहे. हा बदल घरापासून सुरू होऊन समाजापर्यंत पोहोचतो. आज शिक्षण मिळालेली मुलगी उद्या आपल्या मुलांनाही शिक्षणाचे महत्त्व सांगेल. त्यामुळे एका मुलीला दिलेली मदत अनेक पिढ्यांच्या विकासाचे कारण बनते. अशी मदत करणाऱ्या अनेक व्यक्ती प्रसिद्ध नसतात, परंतु त्यांच्या एका निर्णयामुळे एखाद्या मुलीच्या आयुष्याला नवी दिशा मिळते. अशा असंख्य अदृश्य नायिका समाजात शांतपणे परिवर्तन घडवत असतात. शाश्वत भविष्य केवळ झाडे लावून किंवा संसाधने (resources) वाचवून घडत नाही.

प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांना शिक्षण, समान संधी आणि सन्मान मिळेल असा समाज घडवणे हा शाश्वत विकासाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्याकडे सहानुभूतीच्या नजरेने न पाहता त्यांच्या क्षमतेवर आणि सामर्थ्यावर पूर्ण विश्वास ठेवणे हाच दृष्टिकोन खऱ्या समानतेचा आणि सर्वसमावेशक समाजाचा पाया आहे. 'सन्मानाची संस्कृती' (Culture of Dignity) म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वाचा, क्षमतेचा आणि मानवी मूल्यांचा आदर करणे. अशी संस्कृतीच समाजात समानता, आत्मविश्वास आणि परस्पर आदराची भावना रुजवते.

माझ्या आईच्या एका संवेदनशील निर्णयाने एका मुलीच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. प्रसिद्धीपेक्षा परिवर्तनाला महत्त्व देणारी माझी आई माझ्यासाठी खरी प्रेरणा आहे. एका आईच्या करुणेने दुसऱ्या आईच्या मुलीच्या भविष्याला उजाळा दिला. यापेक्षा मोठे सामाजिक योगदान दुसरे कोणते असू शकते ?

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा

## आनंदाचे देणे



आनंदाचे देणे या लेखमालेत मागील काही लेखांमधून आपण आपल्या वाट्याला आलेल्या कामातून आनंद घेण्यासाठी आणि इतरांना आनंद देण्यासाठी नेमके काय करायचे? याबाबत जाणून घेत आहोत. आपल्या वाट्याला आलेले काम उत्तम पद्धतीने करीत उत्कर्ष साधण्याबाबत काही गोष्टी आपण मागील लेखात जाणून घेतल्या आहेत. या लेखात आपण आणखी एका महत्त्वाच्या विषयावर चिंतन करणार आहोत.

माणसाच्या आयुष्यात अनेक आनंदाच्या घटना घडत असतात. जेव्हा एखाद्याला पहिल्या जॉबसाठी 'अपॉईंटमेंट लेटर' मिळते तेव्हा तो त्याच्यासाठी तो आनंदाचा एक अत्युच्च क्षण असतो. अपॉईंटमेंट लेटर पाहून त्याचा आनंद गगनात मावत नाही. तो नोकरी

मिळाल्याची बातमी सर्वांना आनंदाने सांगू लागतो. नोकरीचा पहिला दिवस कधी येतो याची आतुरतेने वाट पाहतो. नोकरीचा पहिला दिवस, नवे ऑफिस, नवीन सहकारी, नवे वातावरण याचा उत्साह त्याच्या वागण्या-बोलण्यातून सतत जाणवत असतो. पहिला पगार होतो तेव्हा तर त्याचे मन कृतज्ञतेने भरून येते. नव्या नोकरीसाठी तो देवाचे, त्याला मदत करणाऱ्या लोकांचे मनापासून आभार मानतो. पण पुढे काय होतं? आयुष्यभर त्याच्या मनात हीच भावना कायम राहते का? काही दिवसांमध्येच त्याचा कामामधला उत्साह कमी होतो. त्याचे ऑफिसला जाणे नेहमीचे होते. सकाळी लवकर उठून ऑफिसला जाण्याचा, नेहमीचे काम करण्याचा त्याला कंटाळा येतो. सहकाऱ्यांसोबत तो स्वतःची तुलना करू लागतो. त्याच्या मनात बॉस आपल्यापेक्षा इतरांना जास्त श्रेय देत असल्याची भावना निर्माण होते. इतरांना प्रमोशन मिळाले की आपल्या ऑफिसमध्ये राजकारण सुरु आहे असे त्याला वाटू लागते. कंपनीतील सोयसुविधांची तो इतर कंपनीतील सोयसुविधांशी तुलना करू लागतो. ज्यामुळे त्याचा स्वतःच्या कामामधील रस कमी होतो. हाती असलेली नोकरी सोडून इतर ठिकाणी नोकरी शोधण्याचे प्रयत्न तो सुरू करतो. काही लोक तर नोकरीच्या ठिकाणी झालेल्या छोट्या-मोठ्या मतभेदांमुळे तडकाफडकी नोकरीदेखील सोडतात. नंतर मात्र त्यांना त्यांच्या या कृतीचा पश्चाताप होतो.

या किंवा अशाच काही घटना कामाच्या ठिकाणी सतत घडत असतात. हे सर्व पाहिल्यावर मनात प्रश्न निर्माण होतो की, नोकरीच्या पहिल्या दिवशी ज्या व्यक्तीचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याला काहीच दिवसांमध्ये त्याच्या नोकरीचा, कंपनीचा, बॉसचा, सहकाऱ्यांचा कंटाळा का आला ? नोकरी मिळाल्याचा आनंद अचानक कुठे हरवला?

नोकरीच्या पहिल्या दिवशी झालेला आनंद माणूस हरवून बसतो कारण तो 'आहे' त्याबद्दल 'कृतज्ञ' राहत नाही. कृतज्ञता ही माणसाला यशाच्या शिखराकडे नेणारी एक महत्त्वाची पायरी आहे. कृतज्ञता हा मानवी जीवनाचा पाया आहे. जो माणूस त्याच्याकडे 'जे आहे' त्याबद्दल कृतज्ञ असतो त्याला निसर्ग त्याच्याकडे नसलेल्या गोष्टीदेखील भरभरून देतो. पण आज माणसाला 'आहे' त्याबद्दल कृतज्ञता वाटत नाही हीच मोठी खंत आहे.

आजवर मी अनेक लोकांचे समुपदेशन केले आहे. निरनिराळी माणसे त्यांच्या निरनिराळ्या समस्या घेऊन माझ्याकडे येतात. कधी कोणाकडे चांगला जॉब नसतो, कधी कोणाला हातात असलेल्या जॉबचा कंटाळा आलेला असतो, कोणाला नवीन जॉब हवा असतो पण तशी संधी मिळत नसते, कोणाला प्रमोशन किंवा पगारवाढ मिळत नसते. प्रत्येकजण त्याच्याकडे 'काय नाही' याबद्दल तक्रार करीत असतो. पण त्यांच्याकडे 'काय आहे' याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मला कोणी दिसत नाही. या लोकांकडे पाहून मला एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे हाती असलेल्या कामाचा कंटाळा, सहकारी किंवा बॉसबद्दल तक्रारी, कंपनीबाबत तक्रारी म्हणजे या लोकांच्या मनात कृतज्ञतेचा अभाव आहे. जिथे कृतज्ञता नाही तिथे आनंद असू शकत नाही.

मी जेव्हा लोकांना कृतज्ञता व्यक्त करायला सांगतो तेव्हा काही लोक मला सांगतात की, आम्ही जे काम करतो त्याचे पैसे कंपनी आम्हाला देते मग आम्ही कंपनीची, बॉसची, सहकाऱ्यांची कृतज्ञता कशाला व्यक्त करायची?

बरोबर आहे! तुम्ही केलेल्या कामाचा मोबदला कंपनी तुम्हाला पगार किंवा प्रमोशनद्वारे देत असते. पण तुम्ही कधी हा विचार केला आहे का? तुमच्या कपंनीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त जी साधनसामुग्री आहे. जी अत्यंत महागडी आहे. सर्वसामान्य माणसे ही साधनसामुग्री विकत देखील घेऊ शकत नाहीत. तुमची कंपनी तुम्हाला ती सहज उपलब्ध करून देत असते. एवढंच नाही तर तुम्ही सतत अपग्रेड राहण्यासाठी कंपनी ती साधनसामुग्री अपडेट ठेवत असते. ही साधनसामुग्री वापरण्यासाठी कंपनी कर्मचाऱ्यांना रीतसर प्रशिक्षण देते. अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचा खर्च कंपनी तुमच्यासाठी करत असते. त्या प्रशिक्षणातून आणि साधनसामुग्रीच्या वापरातून तुम्हाला विनामूल्य ज्ञान आणि अनुभव मिळतो. या ज्ञानातून तुमची कौशल्ये वाढतात. शिवाय हे ज्ञान तुम्हाला पुढे आयुष्यभर उपयोगी पडते. वर कंपनी तुम्हाला पगार देते, तुमची पदोन्नती करते. कामाच्या नवनवीन संधी उपलब्ध करुन देते. या आणि अशा अनेक गोष्टींसाठी प्रत्येकाने आपल्या कंपनीबद्दल कृतज्ञ असायला हवे.

लोक कंपनीच्या या उपकारांची जाण तर ठेवत नाहीतच शिवाय ती कंपनी सोडून नव्या ठिकाणी जॉब मिळविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा जुन्या कंपनीला नावे ठेवतात, नवीन ठिकाणी जाताना जुन्या कंपनीतील नोटीस पिरिएड पूर्ण करीत नाहीत, आपल्या हातातील जबाबदाऱ्या नोकरी सोडण्यापूर्वी इतरांना व्यवस्थित हस्तांतरित करीत नाहीत. माझ्यामते ही सर्वात मोठी कृतघ्नता आहे. असे कृतघ्नपणे वागून माणसाचा उत्कर्ष कसा होणार? याचा अर्थ तुम्ही नवी नोकरी शोधू नका, प्रमोशनची इच्छा करू नका किंवा जास्त पगाराची अपेक्षा न ठेवता काम करा असे मला म्हणायचे नाही. मला तुम्हाला एवढेच सांगायचे आहे की, आपल्या वाट्याला आलेले काम

प्रामाणिकपणे करून आपल्या कामातून आपण इतरांना आनंद देण्याचा प्रयत्न करायला हवा. कंपनी, वरिष्ठ आणि सहकाऱ्यांबद्दल सदैव कृतज्ञ असायला हवे. कारण त्यांच्या सहकार्यामुळेच तुमची प्रगती होत असते. कंपनीची प्रगती झाली की तुमची प्रगती आपोआप होते. कृतज्ञ राहण्यासोबत प्रत्येकाने बॉस आणि सहकाऱ्यांशी सलोख्याचे संबंध राखायला हवेत. सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली की आपोआप हे संबंध चांगले होतात. कारण कृतज्ञता हे शुभचिंतन आहे. जेव्हा तुम्ही कृतज्ञतेतून हे शुभचिंतन करता तेव्हा तुमचे इतरांशी असलेले नातेसंबंध सुधारतात. माणूस कोणतेही काम एकटा करीत नसतो. कंपनीमध्ये टीमवर्क गरजेचे असते.

याबाबत मी माझेच एक उदाहरण सांगतो. मी मुंबईत एका नामांकित कंपनीमध्ये काम करीत होतो. त्या दरम्यान आम्ही दादरला राहत होतो. काही दिवसांनी आम्ही दादरहून बोरीवलीला शिफ्ट झालो. साहजिकच मला बोरीवलीहून माझ्या कंपनीत जाण्यासाठी खूप प्रवास करावा लागत असे. नेहमीचा प्रवास टाळण्यासाठी मी दुसऱ्या कंपनीमध्ये जॉब शोधला. सुदैवाने मला माझ्या घराजवळ एका चांगल्या कंपनीतून ऑफर मिळाली. मी माझ्या जुन्या कंपनीतील वरिष्ठांना याची कल्पना दिली. पण माझ्या वरिष्ठांना मी ती नोकरी सोडावी असे वाटत नव्हते. पण मी त्यांना माझी प्रवासाची अडचण समजावून सांगितल्यावर ते तयार झाले. मी त्यांना हेदेखील सांगितले की, "माझ्या जागी येणारी नवीन व्यक्ती पूर्ण प्रशिक्षित होईपर्यंत मी माझ्या सुट्टीच्या दिवशी आपल्या कंपनीत येऊन सर्वप्रकारे मदत करीन." कारण माझ्यासाठी 'There was a no conflict of interest' होता. माझी ही वृत्ती माझ्या वरिष्ठांना खूप आवडली. माझ्या जुन्या कंपनीत जेव्हा माझा निरोप समारंभ झाला. तेव्हा माझ्या वरिष्ठांनी माझ्याबद्दल बोलताना खास उद्गार काढले होते की, "You are a Gem of a person. We will miss you." ही गोष्ट इथे सांगण्यामागचा एकच उद्देश आहे. की आपण आपल्या कंपनीबद्दल, कामाबद्दल, वरिष्ठांबद्दल, सहकाऱ्यांबद्दल मनापासून कृतज्ञ असायला हवे. कारण कृतज्ञता हा एकमेकांना जोडणारा एक गोंद आहे.

- **प्रल्हाद वामनराव पै**, आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## प्रश्न...

रिमझिम झरणाऱ्या पावसानी
कुठलीशी गाठ सहज उकलली
खिडकी बाहेरच्या पावसाची जागा
मनातल्या पावसानी घेतली

पागोळ्यांच्या टपटप थेंबांना पाहताना
डोळ्यातल्या पावसासवे मन वाहू लागलं
रितं रितं होतानाही कळत नकळत
निराळ्याच पावसात चिंब चिंब भिजू गेलं

समोरच्या पावसानं सारं धुसर झालं
अनंत धारांच्या पटलांनी आभाळ कोंदाटलं
कोणता धागा कोठे जोडला?
मन फक्त स्तिमित होऊन पाहू लागलं

पाऊस होतोच ना कधी असा जीवघेणा?
सरींवर सरी नुसत्या बरसवणारा
बरसणं त्याचं की माझ्या मनाचं?
अतर्क्य प्रश्न की कधीच न संपणारा?

- **शिल्पा कुलकर्णी**, लुईव्हील, केंटकी



## ऋतू सोबतीने...!

अमेरिकेतील माझ्या वास्तव्यास आता काही वर्षांचा काळ उलटून गेला आहे. अमेरिकेच्या पूर्वेकडील मेरीलँड राज्यात राहात असताना येथील निसर्गाचे ऋतुचक्र मला अगदी जवळून अनुभवता आले. अमेरिका हा देश पृथ्वीच्या उत्तर गोलार्धात असून आकाराने प्रचंड मोठ्ठा असल्यामुळे साहजिकच निसर्गाच्या ऋतूमानातील वैविध्य येथे दिसून येते.

ऋतूंचा राजा म्हणून ओळख असणाऱ्या "वसंतऋतू" अर्थात येथील "स्प्रिंग" सिझनचे मार्च महिन्यात आगमन होते. मार्च महिन्यापासून मे महिन्यापर्यंतचा काळ वसंतऋतूचा असतो. जशी या ऋतूची चाहूल लागते, निसर्ग त्याच्या सौंदर्याने जणू आपल्याला मोहीत करण्यास सज्ज होऊ लागतो. हळूहळू आल्हाददायक होत जाणारी हवा, आपल्याला आणि निसर्गातील झाडे-झुडूपे, प्राणी, पक्षी या सगळ्यांनाच नवचैतन्य बहाल करते. झाडांना पालवी फुटून ती हळूहळू बहरू लागतात. पक्षी कधी त्यांच्या कोमल तर कधी आर्त स्वरात एकमेकांशी संवाद साधत आकाशात भिरभिरू लागतात. काही प्राणी देखील धरतीवर मुक्तपणे बागडण्याचा आनंद घेताना दिसू लागतात. हळूहळू मोठ्ठा होत जाणारा दिवस आणि दिवसागणिक बहरत जाणारा निसर्ग आपल्या मनाला उल्हसित करतात.!

मे महिना जसजसा संपत येतो तसा हवेतील उष्मा हळूहळू वाढायला सुरुवात होते; आणि जून महिन्यात "उन्हाळा", ज्यालाच इकडे "समर" सिझन म्हंटले जाते,तो येऊन ठेपतो. जून महिन्यापासून ऑगस्ट महिन्यापर्यंतचा हा काळ असतो. झाडांवरील नाजूक कोवळ्या पानांचे रूपांतर होऊन आता मोठ्ठी गर्द हिरवीगार पाने झाडांवर वाऱ्यासंगे सळसळू लागतात. मनाला भुरळ घालणाऱ्या रंगसंगतीत नटलेल्या विविध जातींच्या पक्षांची झाडांवरील वर्दळ वाढू लागते. निसर्ग हिरव्या रंगात जणू न्हाऊन निघालेला असतो. या हिरव्या रंगातून डोकावणारी फुलझाडांवरील विविधरंगी आकर्षक फुले आपले लक्ष वेधून घेतात. हवेतील वाढत जाणाऱ्या उष्णतेमुळे, अधूनमधून बरसणारा पाऊस तापलेल्या धरणीला सुखद गारवा देतो; आणि आपल्याला उकाड्यापासून थोडा वेळ का होईना दिलासा देऊन जातो. मोठे होत जाणारे दिवस आणि त्यामुळे जास्त वेळ मिळणारा सूर्यप्रकाश तसेच अधूनमधून येणारा पाऊस, विविध प्रकारच्या झाडाझुडपांचे रोपण करुन घराची परसबाग फुलवण्यासाठी आपल्याला प्रवृत्त करतात. जून महिन्यातच वर्षातील सर्वात मोठ्ठा दिवस हजेरी लावतो; आणि त्यानंतर दिवस हळूहळू लहान होऊ लागतात. निसर्गाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी सहज करावीशी वाटणारी भटकंती असो किंवा सहलींचा खास बेत आखून बाहेर फिरण्यासाठी असो, वसंतऋतू(स्प्रिंग) आणि उन्हाळा(समर) हे दोन्ही ऋतू आपण निसर्गाशी अधिक एकरूप होऊन जगावे यासाठी आपल्याला प्रोत्साहित करत असतात.!

ऑगस्ट महिन्याच्या शेवटी मात्र उकाडा कमी व्हायला सुरुवात होऊन सप्टेंबर महिन्यात हळूहळू हवेत गारवा जाणवू लागतो आणि "शरदऋतू" ज्याला इकडे "ऑटम किंवा फॉल" सिझन असं म्हणतात, त्याचा आरंभ होतो. हा ऋतू सप्टेंबर महिन्यापासून नोव्हेंबर महिन्यापर्यंत असतो. तुलनेनं आणखी लहान होत जाणारा दिवस आणि त्यामुळे कमी मिळणारा सूर्यप्रकाश तसेच वाढत जाणारी थंडी, यामुळे साधारणपणे सप्टेंबर महिन्याच्या शेवटी झाडांवरील पानांचा गर्द हिरवा रंग आता हळूहळू पिवळसर नारिंगी आणि लाल रंगांच्या छटांमध्ये परिवर्तित होऊ लागतो. या मनमोहक रंगछटांचा नवीन पेहराव धारण केलेल्या पानांमुळे निसर्गाचे एक वेगळे आणि देखणे रुप आपल्याला ऑक्टोबर महिना संपेपर्यंत दिसत राहाते; ज्यालाच इकडे "फॉल फॉलीएज" किंवा "फॉल कलर्स" असं म्हंटल जाते. निसर्गाने केलेली ही रंगांची उधळण नजरेत साठवत त्याचा आनंद घेण्यासाठी या महिन्यामध्ये काही ठराविक ठिकाणी पर्यटकांची गर्दी देखील दिसून येते. मात्र नोव्हेंबर महिना जसा सुरु होतो तशी थंडी आणखी तीव्र होऊ लागते आणि रंगांचा साज चढवलेली झाडांवरील पाने हळूहळू गळून पडायला सुरुवात होते. नोव्हेंबर महिना संपेपर्यंत ही पानगळ चालू राहते.

डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून, ख्रिसमस ट्री वगळता इतर बहुतांश झाडांवरील फांद्या पानगळ झाल्यामुळे एकाकीपण अनुभवू लागतात. या महिन्यात कडाक्याच्या थंडीची सुरुवात होऊन "हिवाळा ऋतू" म्हणजेच येथील "विंटर सिझन" दाखल होतो. डिसेंबर महिन्यापासून फेब्रुवारी महिन्यापर्यंत हा ऋतू मुक्कामी असतो. ऑक्टोबर महिन्यापर्यंत विविध रंगरुपात बहरलेला निसर्ग आता थोडी विश्रांती घेऊ लागतो. लहान झालेले दिवस संध्याकाळी ५ च्या सुमारास काळोखाला आपलसं करु लागतात. डिसेंबर महिन्यातच वर्षातील सर्वात लहान दिवस आपल्या भेटीला येतो. या महिन्यांमध्ये वाढत जाणाऱ्या कडाक्याच्या थंडीत शून्य अंश सेल्सियसच्या खाली घसरणारे उणे तापमान अधूनमधून हिमवृष्टी देते; तेव्हा निसर्ग भूमीवर जणू शुभ्र बर्फाच्या रांगोळीने अनोखी नक्षी रेखाटतो आणि एकाकीपणाचा अनुभव घेणाऱ्या झाडाझुडपांच्या फांद्या जणू शुभ्र

हिमकणांचे अलंकार धारण करून सजायला लागतात. फेब्रुवारी महिना संपेपर्यंत निसर्गाचे हे काहीसे शांत पण तितकेच नयनरम्य रुप आपल्याला दिसते.

मार्च महिना उजाडतो तशी पुन्हा वसंतऋतूची चाहूल लागते आणि निसर्गाचे हे ऋतुचक्र पुनश्च सुरु होते. निसर्गाच्या या ऋतुचक्राप्रमाणेच आपल्या आयुष्यातही वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मनातील भावभावनांचे ऋतू बदलत असतात. वसंतऋतूतील झाडांवर फुटलेल्या पालवी प्रमाणे, कोवळे, निरागस भाव असणारे मन आपल्या बालवयाचे द्योतक असते. कडक उन्हाळ्यात उन्हाच्या झळा सोसून पावसाची वाट पाहात तग धरून जोमाने वाढणाऱ्या झाडांप्रमाणे, नवा उत्साह, नवी उमेद आणि जिद्दीने भारावलेले मन तारुण्याची खरी ओळख असते. शरदऋतूतील पानांच्या सहजपणे बदलणाऱ्या विविध रंगछटांप्रमाणे, आयुष्यातील अनेक बाबतीत कित्येक लहान-मोठ्या बदलांना सामोरे जात त्यांच्याशी जुळवून घेण्याची भावना जपणारे अनुकूलनक्षम आणि परिपक्व मन आपल्या मध्यम वयात महत्वपूर्ण भूमिका बजावत असते. हिवाळ्यात निसर्गाचा विविधरंगी बहर ओसरल्यानंतर हिमवर्षावात शुभ्र दुलई पांघरून शांतपणे विश्रांती घेणाऱ्या भूमीप्रमाणे, आयुष्यातील उमेदीचा काळ सरल्यानंतर देखील शांत, सकारात्मक आणि आहे त्या स्थितीत समाधान मानण्याची वृत्ती जोपासणारे मन आपल्या उतारवयातील आयुष्य अधिक सुकर करत असते.!

निसर्गातील या ऋतूंच्या रुपात एक खरा सोबती नेहमी आपल्याबरोबर असतो; ज्याची प्रत्येक कृती आपल्या भावविश्वाला आकार देत आपले आयुष्य घडवत असते...!

- **शुभदा जोशी-पारखी**, कोलंबिया,मेरीलँड



## त्सुनामी

फ़िरून येवो एक त्सुनामी
प्रलंयकारी लाट दानवी
ओंकाराचे नृत्य तांडवी
भिंत जळाची गर्जत यावी
बुडून जाव्या कक्षा सगळ्या
परंपरेच्या दिशा आंधळ्या
सत्तांधांच्या इमले माड्या
त्या लाटेने सहज गिळाव्या
बुडून जाव्या जाती पाती
भ्रष्ट जगाच्या रीती भाती
ओसरताना उरो मागुती
शांति क्षमेची मऊसर रेती
त्या लाटेसह यावा प्रेषित
निष्क्रियतेला करित कर्मरत
सुप्त मानसी विचार मंथित
नव्या मनुचे नव उद्घोषित
फ़िरून येवो अशी त्सुनामी
फ़िरून यावा ऎसा प्रेषित

- **रजनी शेंदुरे**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## वारी: महाराष्ट्रधर्माचा आत्मा

२१ मे २०२३ रोजी लिंडहर्स्ट न्यू जर्सी येथे विठ्ठल रखुमाईची प्रतिष्ठापना झाली आणि दोनच आठवड्यात पंढरपूरची वारी सुरु झाली. आम्हाला वारी आयोजित करण्याचा अनुभव नव्हता पण इच्छा सच्ची होती असे म्हणा, माउलींनी चित्रा भावे आणि राजश्री कुलकर्णी ह्या दोघींना आमच्याकडे पाठवले. दोघींनी आळंदी पंढरपूर संपूर्ण वारी चालत केलेली. त्या दोघी कामाला लागल्या आणि पाहता पाहता ४५० वारकरी न्यू जर्सीत हरिपाठ म्हणत चालू लागले. अमेरिकेत रस्त्यावर मोठ्या समूहाने चालणे सोपे नाही व अगदी प्रत्येकाला पूर्ण १६१ मैल चालत येईल असेही नाही म्हणून छोट्या दिंड्या करून सर्वांनी मिळून ते

अंतर पूर्ण करण्याची कल्पना मांडली. ज्यांना अधिक चालता येत होते त्यांनी जास्त चालायचे, ज्यांना कमी शक्य होते त्यांनी कमी. मैलांच्या हिशोबापेक्षाही सर्वांनी मिळून वारी अनुभवायची ही मुख्य संकल्पना!

जसे लोक येऊ लागले तशा अनेक गोष्टी समजू लागल्या. कोणाच्या घराण्यात दीडशे वर्षे जुने ज्ञानेश्वर मंदिर, कोणाच्या माहेरी शंभर वर्ष जुने राममंदिर; कोणी संत एकनाथांचे वंशज तर कोणी तुकाराम महाराजांच्या घराण्यातील; कोणाचे आजोबा चाळीस वर्षे वारी करणारे तर कोणाची आई कीर्तनकार. अमेरिकेत स्थायिक झालेल्या या पिढीला जणू स्वतःच्या मुळांचा पुन्हा स्पर्श झाला. गोल रिंगणात किंवा मंदिरात उभे असताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. "मी विठ्ठलापासून दूर आलो; पण विठ्ठलच माझ्यापर्यंत आला." ही भावना परत परत पाहायला मिळत होती.

अमेरिकेत जन्मलेल्या मुलांनी मराठीत किंवा इंग्रजीत संतांचा परिचय करून द्यायला सुरुवात केली.



पंढरपूरच्या वाटेवरचे गोल रिंगण अद्वितीय आहे, ते दुसरीकडे उभे करणे अशक्य. पण असे काहीतरी असते हे माहित होण्यासाठी आम्ही एका मोठ्या सार्वजनिक उद्यानात गोल रिंगण आयोजित केले. पाहता पाहता ८०० भक्त जमा झाले. आणि मग घडली एक अनपेक्षित गोष्ट. जल्लोष ढोल-ताशा पथक सहभागी झाले. संयोजकांनी सांगितले होते की एवढे मोठे वाद्य सांभाळून साधारण पंधरा-वीस मिनिटेच वाजविता येते. पण शेकडो वारकर्यांनी रिंगण धरले आणि सगळेच असे नादखुळे झाले की ढोल-ताशा थांबेचना. चालण्याचा नाच कधी झाला ते न वाजवणाऱ्याला कळले ना नाचणाऱ्याला!



स्त्रिया नऊवारी नेसून, डोक्यावर तुळस घेऊन चालू लागल्या, पुरुष फेटे बांधून सहभागी झाले; लहान मुले पारंपरिक वेषात भगवा फडकवत खेळू लागली. लेझीम, पावली, फुगड्या सुरु झाले.

आषाढी एकादशीला लिंडहर्स्ट म्युनिसिपल पार्कपासून विठ्ठल मंदिरापर्यंत तुकाराम महाराजांच्या पादुकांची पालखी निघाली. अमेरिकेच्या रस्त्यांवर "ग्यानबा-तुकाराम"चा गजर दुमदुमला आणि क्षणभर न्यू जर्सी व पंढरपूर यांच्यातले अंतर विरघळून गेले.

ईश्वरनिष्ठांची मांदियाळी वाढली. हा अनुभव आनंददायक खराच पण एक प्रश्नही मनात उभा राहायचा. इतक्या पिढ्या, इतके मोठे भौगोलिक स्थलांतर, संपूर्णपणे वेगळी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती अशा सगळ्यांत वारी लोकांच्या मनाला अशी का भिडते? आठशे वर्षात महाराष्ट्राने केवढी स्थित्यंतरे पाहिली, परकीय आक्रमणे, मूर्तिभंजन हे त्यांचे धर्म-कर्तव्य मानणारे परकीय, हिंदवी स्वराज्याचा अस्त, ह्या सर्व अडचणीत आठशे वर्षे लाखो लोकांना एवढ्या खडतर पदयात्रेसाठी प्रेरणा कुठून मिळत असावी?

हळूहळू कळू लागले वारी म्हणजे केवळ पंढरपूरपर्यंत चालत जाणे नव्हे, तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्माच.

ज्ञानेश्वर माउलींच्या आधीपासून विठ्ठल हे दैवतही होते आणि वारी ही उपासना पद्धतीही होती. माउलींनी ज्ञानेश्वरीरूपाने प्रमाणग्रंथ दिला आणि वारीचा वारकरी पंथ झाला.

माउलींची ज्ञानेश्वरी म्हणजे समाजसुधारणेची तुतारीच - संस्कृतमध्ये असलेली शास्त्रे अभ्यास करायची ना शूद्रांना परवानगी होती ना स्त्रियांना. पण भावार्थ दीपिकेने, अर्थात ज्ञानेश्वरीने, या दोघांना ह्या अभ्यासाचा मार्ग खुला करून दिला आणि आज ८०० वर्षांनंतर आपण पाहत आहोत पंढरीच्या वारीत पुरुष आणि स्त्री जवळ जवळ सारख्या प्रमाणात भाग घेतात. जेव्हा वारकरी रस्त्यात समोरच्या वारकऱ्याला फक्त 'माउली' म्हणून संबोधतो आणि वाकून नमस्कार करतो तेव्हा सवर्ण कोण आणि शूद्र कोण? ८ वर्षांच्या मुलीपासून ८० वर्षांच्या वृद्धेपर्यंत सर्वांनाच माउली म्हणून नमस्कार केल्यावर वासनेची दृष्टी राहिलीच कुठे? जेव्हा आपल्या गावात रात्रीच्या मुक्कामाला थांबलेल्या वारकऱ्यांचे गावकरी पाय चेपतात तेव्हा कोण मोठा आणि कोण छोटा?

पण हे वारकरी आहेत तरी कोण? तर महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील शेतकरी. पाऊसाची पहिली फेरी झालेली असते, पेरणी करायची आणि निघायचे विठुरायाकडे. आणि जायचे कसे तर नाचत, गात, खेळत खेळत - का बरे? कारण विठ्ठलाकडे काही गाऱ्हाणी मांडायला किंवा नवस करायला जायचेच नसते. किंवा 'तू

मला हे दे, मी तुला हे देतो' असा व्यवहार करायलाही जायचे नसते. जायचे ते फक्त विठ्ठलाला सांगायला की बाबा, फार मोठी कृपा आहे तुझी हे जीवन दिले आहेस, मी आलो आहे तुला भेटायला, तुला गळामिठी द्यायला.

आणि ह्या १५ लाख वारकऱ्यांना एवढी खडतर वाट चालल्यानंतर मंदिरातल्या विठ्ठलाच्या दर्शनाचीही गरज वाटत नाही. मंदिराच्या शिखरावरचा ध्वज बघायचा आणि परत फिरायचे. कारण त्यांनी रस्त्यात १५ लाख विठ्ठल आणि रखुमाई पाहिलेलेच असतात.

थोर विचारवंत डॉ. सदानंद मोरे म्हणतात कर्म हीच वारकऱ्यांची भक्ती! मग ते शेतीचे कर्म असो वा १६० मैल चालण्याचे.

एवढी शतके वारी चालून महाराष्ट्राने काय साधले ? तर प्रत्येक वारकऱ्याला महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातील माणूस दिसला आणि कळला. तो आणि आपण एकच आहोत हे कळले. दिसलेल्या प्रत्येक स्त्रीला माउली म्हणायचे हे कळले, माउलींचा हरिपाठ गळ्यातून आत उतरला व लोभ, राग, मत्सर ह्यावर नियंत्रण आले, वारीच्या रस्त्यावरील गावकरी त्यांची कशी सेवा करतात ते कळले, परधर्मी राजवटी असताना तलवारी आणि बंदुका घेऊन वारीला जायचे व वारकरी असतानाच 'वार करी' पण होता आले पाहिजे हे कळले, कर्म आणि धर्माचा समतोल कळला, आणि 'धर्मो रक्षति रक्षिता:' असे मोठे शब्द न वापरता हे सगळे - महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले शेतकरी, माता, भगिनी - जगले तरच आपण जगू हे कळले. हाच महाराष्ट्रधर्म!

परमपूज्य गोविंददेवगिरी महाराज म्हणतात की शिवाजी जन्माला येणासाठी आधी जमीन तयार करावी लागते. चारशे वर्षे, अतिशय कठीण परिस्थितीत संतांनी स्वधर्म, दया, समानता, सहकार, राष्ट्रभक्ती अशा मूल्यांचे सिंचन करून हा महाराष्ट्रधर्म वाढविला आणि त्याला जे अमृतफळ आले त्याचे नाव छत्रपती शिवाजी.

चारशे वर्षे त्या मातीत घाम गाळता गाळता ती मूल्ये मातीतून ज्याच्या रक्तात भिनली तो शेतकरी वेळ आली तेव्हा मावळा झाला व त्याने बलाढ्य औरंगझेबाला त्याच मातीत गाडले. कोण होते ते लाखो मावळे ज्यांनी ह्या मातीसाठी आणि ह्या समाजासाठी प्राण देणेही पत्करले? हे तेच वारकरी ज्यांना स्वधर्म कळला, आई-बहिणीच्या अब्रूसाठी आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राण देणे कळले.

अर्वाचीन काळात सुद्धा हे पाहायला मिळते - स्वातंत्र्यानंतर देशात सहकारी चळवळीचे वारे वाहू लागले. सर्वप्रथम ते वारे वाहिले महाराष्ट्रात. महाराष्ट्राचे सहकारी साखर कारखाने, खादी, दूध, फळे, मध आदींचे उत्पादन व विक्री करणाऱ्या सहकारी संस्था संपूर्ण भारतासाठी आदर्श म्हणून उभ्या राहिल्या.

मुंबईचा जगप्रसिद्ध डबेवाला - ज्यांच्या संघटना, निष्ठा आणि शिस्तीचे हार्वर्डमध्ये केस स्टडी झाले, ते कोण आहेत? आपले वारकरी!

हल्ली आपण नेटवर्किंग फार महत्वाचे आहे असे म्हणतो, मराठी माणूस त्यात फार मागे आहे म्हणतो पण पहिला नेटवर्किंगचा संदेश दिला तुकाराम महाराजांनी 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'. आपण कदाचित तो थोडा विसरलो असू एवढेच, तो परत श्रद्धेने अंगिकारला आणि महाराष्ट्रधर्माचे वारकरी झालो तर काय अशक्य आहे आपल्याला? यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्टी सर्वांचे मंगल ह्यातच आहे. जय हरी विठ्ठल!!



**- भाऊ कुलकर्णी**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## पाऊले चालती....!

ग्यानबा तुकाराम । ग्यानबा तुकाराम।
टाळी वाजवावी । गुढी उभारावी।
वाट ही चालावी । पंढरीची ।
ग्यानोबा माऊली। तुकाराम।।

या व अशा घोषणांच्या गजरात देहभान विसरून मुखी विठ्ठलाचे नाव घेत, त्या पंढरीच्या विठुरायाच्या चरणी समर्पित व्हायला निघालेला लाखोंचा मेळा म्हणजे वारी!

वारी म्हणजे गेली सात-आठशे वर्षे अखंडित चालू असलेली महाराष्ट्राची उज्वल परंपरा! भक्तीचा अनोखा सोहळा! महाराष्ट्राचे अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभव! अतूट भक्ती, दृढ निश्चय आणि चिकाटी यांचा अनोखा संगम!

आणि या वारीत चालणार वारकरी म्हणजे भक्तीच्या अथांग सागरात समरसून गेलेला जणू एखादा थेंबच.

अशा ह्या वारीचे आपल्या सगळ्यांनाच कुतूहल वाटत असते. आपले काम धंदे बाजूला ठेवून पाऊस-पाण्याचे हे वारकरी मैलोन्मैल कसे चालत असतील? त्यांच्या काय प्रेरणा असतील? कसे राहत असतील ? काय खात पीत असतील?

आणि मग जस जशा वारीच्या बातम्या यायला लागतात, तस आपणही एकदातरी असा एखादा अनुभव घ्यावा ही सुप्त इच्छा जागी होते.

ही पंढरीची वारी मराठी माणसाच्या मनात खोलवर रुजून आहे. अगदी तो देशाबाहेर गेला तरीही.

म्हणजे मराठी माणूस संधीच्या शोधात महाराष्ट्रापासून दूर परदेशात स्थित झाला तो आपली संस्कृती, मूल्य, परंपरा घेऊनच. ती मनात जपलेली संस्कृती पुढच्या पिढीकडे सुपूर्द करावी ही अगदी स्वाभाविक मानवी भावना.

त्या भावनेतूनच परदेशातही मोठ्या उत्साहात साजरे होणारे अनेक उत्सव - गणपती, होळी, किंवा दिवाळी!

पण त्याच्याही पलीकडे जाऊन चार वर्षांपूर्वी बे एरियामध्ये महाराष्ट्र मंडळाने (MMBA) विठोबा वारी सुरू केली. गेल्या चार वर्षांत या वारीबरोबर जोडल्या गेलेल्या भक्तांची संख्या वर्षागणिक वाढतेच आहे आणि त्याबरोबर उत्साहही!

खरं तर भारतात इतके वर्ष राहताना हा वारीचा सोहळा प्रत्यक्षात कधीच अनुभवला नव्हता. पण लहानपणी टीव्हीवर पंढरपूरच्या वारीतील भक्तीचा महापूर बघून खूप कुतूहल वाटलं होत.
त्यामुळे जेव्हा बे एरियात वारी होणार हे कळलं तेव्हाच त्या निमित्ताने वारीची एक छोटीशी झलक अनुभवायला मिळणार याचा आनंद झाला होता.

गेली चार वर्ष या वारीत सामील होत आहे. दरवर्षी त्याचं वाढत चाललेलं स्वरूप, लक्षणीय रित्या वाढत चाललेला तरुणांचा सहभाग, जुन्या जाणत्या मंडळींकडून होणारे मार्गदर्शन, आणि अर्थात सोशल मिडीयावर ( किंवा सोशल मिडियामुळे ) वाढणारा प्रभाव हे सगळं जवळून अनुभवते आहे.

ही स्थानिक वारी पंढरीच्या वारी पुढे तशी तर कितीतरी पटीने छोटी - अगदी अंतर, भक्तांची संख्या, किंवा एकंदर स्वरूप बघता आणि अगदी सुटसुटीत. पण तसं असलं तरी इथेही तोच भक्तीभाव आढळतो. आपली कामं -धामं सांभाळून, नेहेमीचे व्याप बाजूला ठेवून विठ्ठलाचे नाव घेत चार पावलं चालतात तेव्हा तो आसमंत आपोआप पवित्र वाटतो. ती वारी मन प्रसन्न करून जाते. दरवर्षी फ्लायर बघितलं की नकळत तिकडे आपल्याला ओढून नेते.

बे एरियातील त्या पहिल्या वाहिल्या वारीच्या सुखद आठवणी अजूनही मनात तशाच ताज्या आहेत. तो आठवणीपट तुमच्यासमोर उलगडताना खूप आनंद होत आहे.

**** **स्मरणचित्रे : विठोबा वारी , बे एरिया, २०२३** ***

आज शेवटचा दिवस, हो नाही करता करता रात्री उशिरा ठरवले, कसंही करुन उद्या जायचंच.

सकाळी सात वाजता रिव्हर व्ह्यू पार्कला पोहोचले.
अपेक्षेप्रमाणे तिकडे मेळा जमला होता.

लांबूनच दिसणारे उंचावलेले भगवे, पारंपरिक पोशाखातील स्त्री-पुरुष, ऐकू येणारी झांजांची किणकिण, आसमंतात पसरलेला उत्साह येणाऱ्याला लगेच आपल्यात सामावून घेत होता.

त्यातच स्वागताला लावलेल्या चंदनाच्या टिळ्याने पुढील ३-४ तासांची नांदीच मिळाली.

ही सगळी मंडळी निघाली तरी कुठे? अहो वारीला!

ह्या वर्षी प्रथमच बे एरियामध्ये जून महिन्यातल्या चारही शनिवारी आणि रविवारी सकाळी बरोबर सातला ह्या मार्गावर वारी आयोजित केली होती. फेसबुकवर इतके सारे फोटो बघून कधी एकदा आपणही हा अनुभव घेतोय असे झालेले कारण फोटो आणि व्हिडिओ बघून प्रत्यक्ष अनुभूती काही मिळत नाही.

तीनेक मैलाचा पार्कमधून गेलेला रस्ता आणि बालाजी मंदिरात सांगता. अर्थात त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून रीतसर परवानगी घेतलेली.

रस्त्याच्या एका बाजूने दोघा दोघांच्या रांगेत चालणारे वारकरी! तर रस्त्याची दुसरी बाजू इतर वाटसरूंसाठी पूर्णपणे मोकळी ठेवलेली. सगळं कसं अगदी पद्धतशीर आणि शिस्तीत!

वयस्कर मंडळी, त्यांना सावकाश घेऊन जाणारी त्यांची पुढची पिढी, स्ट्रोलरमध्ये किंवा पाठुंगळी लेकरांना घेऊन पायी निघालेले लेकुरवाळे आईबाप, जोशात मार्गक्रमण करणारी तरुणाई, आणि सगळ्यांना जोडणारा एकच धागा, त्या पांडुरंगाच्या भक्तीचा!

सुरुवातीला कोणीच ओळखीचं नाही म्हणून वाटणारं अवघडलेपण, विठू नामाच्या गजरात सहकाऱ्यांबरोबर काही पाऊले चालताच कुठच्या कुठे पळून गेले. आणि सकाळच्या गारव्यात, टाळांच्या गजरात, विठूमाऊलीच्या, ग्यानबा-तुकारामच्या जयघोषात, बालाजी मंदिर हां हां म्हणता आलेसुद्धा.

देवळाच्या प्रवेशद्वाराशी छानशी रांगोळी काढली होती. भाविकांनी आपापल्या बागेतील बरीच तुळशी-फुलं आणली होती. आम्ही दोघी-चौघीनी बसून त्याचे विठ्ठल रखुमाईसाठी दोन हार ओवले.

खर तर ही किती साधीशी गोष्ट, पण ते हार विणताना त्या दहा पंधरा मिनिटांत, लहानपणी सुट्टीत गावाला ओवलेल्या त्या लांबच लांब बकुळीच्या माळा, आजीबरोबर बसून केलेले तगरीचे-जास्वंदीचे भरगच्च हार, अंगणातल्या प्राजक्ताचा तो शुभ्र सडा सगळं सगळं सर्रकन डोळ्यापुढून गेलं.

बाहेर अंगणातल्या तुळशीवृंदावनासमोर रखमाई विठोबाच्या साजिऱ्या मूर्तींची पूजा करून त्याभोवती रिंगण केले गेले. त्या दिवशी आमच्या वारीला पंढरपूरची वारी केलेले एक वारकरी आजोबा होते. त्यांनी रिंगणाच्या वेळी म्हणायची खास ढंगातली भजनं, गाणी मोठ्या ठसक्यात गाऊन आम्हा सर्वांना भक्तीरसात न्हाऊन टाकले. त्यानंतर मग झिम्मा-फुगड्या झाल्या. आणि अर्थातच नवीन युगाच्या रीतीप्रमाणे खूप सारे फोटो आणि व्हिडिओ शूटिंगही झाले!

मग सर्व जण आत देवळात गेलो. गाभाऱ्यात अनेक सुंदर भजन म्हटली. विशेष उल्लेख करायचा तर, इथेच लहानाचं मोठं झालेल्या, म्हणजे खरतर अजूनही प्राथमिक शाळेतच जाणाऱ्या, दहा वर्षाच्या शार्दुलने इतकं गोड, सुस्पष्ट, आणि अस्खलित भजन म्हणून आश्चर्याचा सुखद धक्काच दिला. त्यावर कडी म्हणून एका अगदी छोट्या तीन-चार वर्षाच्या बाळाने "जय हरी विठ्ठल" म्हणत इतका सुंदर ठेका धरला की त्याच्या रूपाने जणू बाल विठ्ठलाचेच दर्शन झाले. पसायदानाच्या सामूहिक पठणाने पूर्ण वातावरण भारावून गेले. त्यानंतर झालेल्या यथासांग आरत्या, घालीन लोटांगण, आणि मंत्रपुष्पांजलीने सगळा गाभारा अगदी दुमदुमुन गेला.

तोपर्यंत अकरा वाजून गेलेले, अगदी पाय काढवत नसतानाही प्रसाद घेऊन निघाले, ते आषाढी एकादशीला परत विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ घेऊनच.

**रुपी जडले लोचन । पायी स्थिरावले मन || १ ||**
**देह भाव हरपला । तुझ पाहता विठ्ठला || २ ||**
**काळो नये सुखदु:ख । तहान हरपली भूक || ३ ||**
**तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शने मागुती || ४ ||**
**-संत तुकाराम**

**- प्रेरणा कुलकर्णी**, सॅन होजे , कॅलिफोर्निया



## वयस्कर तरुण का तरुण वयस्कर?

वयस्कर तरुण पाहून तरुण वयस्कर गडबडले
तारुण्याचे कारंजे म्हणे कुठून कसे उद्भवले?
दुध, तूप होते का जेवण्यात यांच्या पौष्टीक?
का आईची होती माया, मुरली वाढल्या गोष्टीत?
हिरवीगार होती का वनश्री भोवती सृष्टीत?
प्रसन्नता नांदायची मनात का ती पाहून दृष्टीत?
गुंग होते कच्चे बच्चे टीव्हीवरच्या सैतानात
का रमत होती मुले, खेळात बाहेर मैदानात?
दंग होत्या मुली नटून थटून सजण्यात
का मदतीत होत्या आईच्या पाट्यावती वाटण्यात?
जरी नव्हती घरोघरी आजच्यासारखी समृद्धी
खोल मनात रुजली होती समाधानी प्रवृत्ती
नेटवर्किंग नी फोनने लाख जरी आता प्रसिद्धी
येताजाता,अवतीभवती खऱ्या मित्रांची हवी आवृत्ती

**- रवि गाडगीळ,** नॉर्थ एडीसन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा

श्वसनाला त्रास, चालताना थकवा व वाढत गेलेल्या खोकल्याचे, प्रायमरी डॉक्टरने केलेले निदान, ब्रॉन्कायटिस निमोनिया अशा ठोकताळ्यातून विकोपाला गेल्यावर शेवटी माझ्या प्रायमरी डॉक्टरने हात वर केले व फुफ्फुसतज्ञावर माझी केस सोपवून (स्वत:) मोकळा श्वास घेतला.

एक वेळ देव भेटेल (नाही तर यमदूत) पण अमेरिकेत कोणताही तज्ञ ताबडतोब मिळाला तर शपथ.

मी सरळ फुफ्फस अतिदक्षता केंद्राकडेचं धाव घेतली जिथे पुर्वपरवानगीची गरज नसते. फुफ्फुसाच्या व रक्ताच्या सर्व तपासण्या केल्यावर जेव्हा काही निदान न झाल्याने तज्ञ(?) आणि मी बुचकळ्यात पडलो. घरी ऑक्सिजनची व्यवस्था लावून व अनेक रक्त तपासणी सांगून पुढील महीन्याची तारीख दिली.

दरम्यान काही हितचिंतकांचे (?) फोन व भेटी झाल्या.

“निमोनिया अजून बरा झाला नाही? माझ्या मावस बहिणीला पण तसं झालं होतं. मग काय? “ आकाशाकडे बोट करत ती गेली असे त्यांनी खुणावले.

“अहो ह्या अमेरिकेतल्या डॉक्टरांना काही कळत नाही. माझ्या एका मैत्रिणींचं पण असचं झालं हो. गेलीऽऽऽऽ ती! भारतातले डॉक्टर बरे. ताबडतोब स्टिरॉइड देऊन मोकळे होतात. २४/७ दवाखाने उपलब्ध असतात बाई भारतात. “

दुसऱ्या दिवशीच मला जेव्हा खोकल्यातून रक्त दिसले आणि मी मनात म्हणालो, “देवाजीचे आमंत्रण दिसतेय. “

मग  बायकोला म्हणालो, “आता ER ला फोन लावला पाहिजे”.  मी ताबडतोब ९११ ला कॅाल केला. तातडीने दोन पॅरामेडीक अवतरले. पण माझी बायको, त्यांना यमदूत समजत, सति सावित्री सारखी आडवी आली.

एक यमदूत म्हणाला “तुम्हाला रुग्णरथात बसता येणार नाही. तुमच्या गाडीने यावे लागेल”.

सावित्री प्रमाणे क्लुप्ति लढवत बायको खोटं बोलली; “मला गाडी चालवता येत नाही”.

तेव्हा कुठे तिला चालका सोबत बसण्याची परवानगी मिळाली.

रुग्णरथाच्या मागच्या खिडकीतून हळूवार दूर जाणारे माझे घर मला दिसत होते. One way ticket to the heaven ह्या गाण्याचा अर्थ मला तेव्हा कळला.

इस्पितळांच्या गेट मधून आत जाताना वरच्या मोठ्या कमानीवर लिहीले दिसले “सेंट पीटर्स हॉस्पिटल”! अरे वा हेचं का ते पर्ली गेट जिथे सेंट पीटर भेटतो? अमेरिकेत आहे म्हणजे चित्रगूप्त नक्कीचं भेटणार नाही.

मग काय अनेक तपासण्याची यादी घेऊन माझा फुफ्फुसतज्ञ सेंट पीटरच्या रूपात आला होता. सर्व तपासण्या केल्या नंतरचं स्वर्ग की नरक की पृथ्वीवर परत पाठवायचे हे ठरणार होते.

एक नर्सोबा आला त्याने मग अतिशय जबाबदारीने व काटेकोरपणे सर्व अनावश्यक प्रश्न विचारले.

प्रश्नः तुम्हाला कधी आत्महत्या करावीशी वाटली का?

मीः नाही ( का वाटावी?)

प्रश्नः घरी तुम्हाला टाकून बोलतं का?

मीः बायको सोडून कोणी नाही टाकून बोलतं. (माझ्यातली विनोदबुध्दी जागी झाली).

मग तो पण हसला “माझ्या घरी काही वेगळी परिस्थिती नाही आहे”

प्रश्नांचा भडिमार चालूच राहिला.

दारू पिता का? सिगरेट ओढतां का? अमली पदार्थ घेता का? शरीरसंबंध किती जणांशी आला?

मीः (अर्थात मनात) इच्छा आहे पण कधी हिम्मत नाही झाली.

वीजबिल, किराणा, घरभाडे, औषधी, वैद्यकीय उपचार हे पैशा अभावी उपलब्ध होऊ शकले नाही असे कधी झाले का?

हे सर्व प्रश्न ऐकून मी सुन्न झालो. जगातील एक नंबरच्या देशात हे सर्व चालू आहे तर? अमेरिकेच्या भविष्याची मला चाहूल लागली.  पण त्या भविष्यासाठी निदान ५० वर्ष आहेत त्यामुळे मी पुन्हा वर्तमानात परतलो.

सर्व तपासण्या व इतर डॅाक्टरांशी विचार विमर्ष करून माझ्या फुफ्फुसतज्ञाने मला स्टिरॉईड चढवले व पुढील दोन तीन महिन्यांची औषधी सांगितली आणि घरी पाठवले.

हळूहळू सर्व आप्तजनापर्यंत ही बातमी पोहोचली व प्रत्येकाने आपल्या परीने सल्ले दिले.

ॲलोपॅथी सोडा होमिओपॅथीनेचं तुम्ही बरे व्हाल.

प्राणायाम, अनुलोम-विलोम, कपालभाती करा.

विठ्ठल विठ्ठल म्हणा.

तुमच्यासाठी हा गंडा आणला आहे आणि हा अंगारा लावा. मग तीन दिवसांनी मला सांगा.

मी सांगते, ह्यांना काही झाले नाही, फक्त दृष्ट लागली आहे.

कोणी देवीचं व्रत ठेवलं. संतांची पोथी पुराणे केली.

ह्या सर्व सल्ल्यामागे/ करण्यामागे त्यांचं प्रेम होतं काळजी होती.

औषधी, सल्ले, श्रद्धा, आशिर्वाद आणि शुभेच्छा ह्यांचा एकत्रित परिणाम हळूहळू दिसू लागला. प्रथम मनाला उभारी आली.  तसं तसं ऑक्सिजनची गरज कमी होत फक्त सावधानते पुरती उरली आहे.

कदाचित म्हणूनच मानसोपचारतज्ज्ञ Viktor Frankl यांनी लिहिलं होतं - "He who has a why to live can bear almost any how."

मात्र मृत्यूच्या दाढेतून चोरलेल्या त्या दोन क्षणात मनाची तयारी झाली. आयुष्याचे, नात्यांचे व व्यवहाराचे धागे दोरे सुरळीत झाले.

एकदा का मृत्यू ची तालीम झाली की भयाची जागा कुतुहल घेते व अनासक्त जीवनाची सुरुवात होते.

जेव्हा मृत्यूशी दोन हात करण्याची संधी मिळते तेव्हाच जगण्यातील लज्जत सुद्धा वाढते.

- **प्रवीण कारंजकर,** ऑल्बनी, न्यू यॉर्क

## मधुर मिलन

रम्य अशा एकांत स्थळी
वाट पहाटे तुझीच सकाळी
पाण्यावर नाचत होती रवी किरणे होऊनी तल्लीन
मन विचारी मनाला कसे असेल मधुर मिलन ||१||
तेथे वाहत होता मंद वारा
प्रसन्न त्या सरोवरतिरी, मोर ही फुलवी मनोहर पिसारा
कसा असेल तो, कोठे भेटेल तो, ज्याच्यामध्ये व्हावे वाटे लीन
मन विचारी मनाला कसे असेल मधुर मिलन ||२||
ह्या प्रियाचा प्रियेश, मधुराचा मधू
त्याला कोठे कैसी ढुंढु
सांग ना रे कुठे बसलास लपून
मन विचारी मनाला कसे असेल मधुर मिलन ||३||
तो शिव मी त्याची शक्ती
तो हरी मी त्याची लक्ष्मी
जीवा शिवाचे मिलन होता, द्वैताचे अद्वैत होईल
असे असेल मधुर मिलन |||४||

- **सुलक्षणा कुलकर्णी,** शिकागो, इलिनॉय

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## विज्ञानाने कोणत्या गोष्टी सांगाव्या (आणि कोणत्या नाही)?

आज माझ्या भारतातून कॅलटेकमध्ये आलेल्या चार उन्हाळी इंटर्न्सचा शेवटचा दिवस होता. संशोधन संपलं. परत जायची तयारी सुरू झाली. मग दरवर्षी प्रमाणे त्यांना JPL फिरवायला घेऊन गेलो.

मिशन कंट्रोलमध्ये गेल्यावर मला नेहमीच थोडं भारावल्यासारखं होतं. तिथून मंगळावरच्या रोव्हर्सशी संपर्क ठेवला जातो. सौरमालेत दूरवर असणाऱ्या यानांकडून आलेली माहिती इथे पोहोचते. व्हॉएजर तर आता जवळजवळ २४ प्रकाशतास दूर आहे, म्हणजे त्या यानाने पाठवलेले संदेश आपल्यापर्यंत पोहोचायला तब्बल एक दिवस लागतो. कुठे कोणतं यान आहे, कोणत्या ग्रहाभोवती फिरत आहे, कोणत्या मोहिमेचं पुढचं पाऊल काय, हे सगळं दाखवणाऱ्या स्क्रीन्स, नकाशे, माहिती...

भोवताली दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे अनेक वर्षांचं संशोधन दडलं आहे. एखाद्या मोहिमेचं नियोजन दशकभर किंवा जास्तच चाललेलं असतं. हजारो लोकांनी केलेल्या असंख्य गणना, चाचण्या, अपयश, सुधारणा आणि पुन्हा चाचण्या, यांचा तो परिपाक असतो. "रॉकेट सायन्स" हा शब्दप्रयोग अवघड गोष्टींसाठी होतो, याची जाणीव अशा ठिकाणी पुन्हा एकदा होते.




इमारतीत शिरता शिरताच दिसते एका काचेच्या पेटीत ठेवलेली एक शेंगदाण्यांची बरणी. या बरणीची गोष्टही आवर्जून सांगितली जाते. गोष्ट आहे १९६४ सालची. रेंजर मोहिमेतल्या सलग सहा अपयशांनंतर, रेंजर ७ या मोहिमेच्या वेळी मिशन कंट्रोलमध्ये कोणीतरी शेंगदाणे वाटले. ती मोहीम यशस्वी ठरली. पहिल्यांदाच यान चंद्रावर आदळण्यापूर्वी स्पष्ट छायाचित्रं मिळाली. कोणाच्या तरी मनात आलं की शेंगदाणे पथ्यावर पडले. झालं. त्यातून सुरू झाली मोहिमांपूर्वी शेंगदाणे खाण्याची परंपरा. आत एका पडद्यावर ती बरणी हातात धरलेल्या अनेक प्रसिद्ध पाहुण्यांची छायाचित्रं एका मागून एक दिसत असतात.

त्या छायाचित्रांकडे पाहताना आणखी एक गोष्ट जाणवली. हे लॉस एंजेलिस आहे. परसात हॉलीवूड असणारं. त्यामुळे सिनेकलाकार, लोकप्रिय मालिकांमधले अभिनेते, अंतराळवीर, राजकारणी, शास्त्रज्ञ, अनेक प्रसिद्ध व्यक्ती इथे येतात. बिग बॅंग थिअरी, स्टार ट्रेक. जे म्हणाल ते. त्यांच्यापैकी अनेकांच्या हातात तीच शेंगदाण्यांची बरणी. प्रसिद्ध व्यक्तींची छायाचित्रं पाहणाऱ्यांच्या मनावर वेगळाच परिणाम करतात. एखाद्या मुलाला ऑर्बिटल मेकॅनिक्स आठवणार नाही; पण "अमुक अभिनेत्यानेही हीच बरणी हातात घेतली होती" हे मात्र कदाचित लक्षात राहील.

घरी येताना मला एकच प्रश्न सतावत होता. इतकं विज्ञान दाखवूनही, या इथे येणाऱ्या शाळकरी मुलांच्या लक्षात सर्वांत जास्त काय राहिलं असेल? गोष्टी सर्वांना आवडतात. लहानांपासून मोठ्यांना. आकडे, समीकरणं, पडद्यामागचं कष्टाचं काम यापेक्षा एखादी छोटीशी गोष्ट मनात पटकन घर करते.

**रॉकेट विज्ञानामुळे उडतं. पण आठवणीत बरणी राहते.**

मला त्या बरणीपेक्षा तिची गोष्ट जास्त महत्त्वाची वाटली. कारण बरणी काचेत ठेवलेली असते; गोष्ट मात्र प्रत्येक टूरमध्ये पुन्हा जन्माला येते. मुलं आणि मोठी माणसं दोघंही अधिकृतपणे सांगितलेल्या गोष्टींवर सहज विश्वास ठेवतात. "ही आमची परंपरा आहे" एवढं वाक्य अनेकांच्या मनात कळत-नकळत "म्हणजे यात काहीतरी असेल" असा अर्थ निर्माण करू शकतं. विज्ञान शिकवणाऱ्या संस्थांनी ही बारकाई लक्षात घ्यायला नको का?

ही गोष्ट शेंगदाण्यांची नाही. मोहिमांच्या आधी इस्रो फोडते त्या नारळांचीही नाही.

काही वर्षांपूर्वी इस्रोचे प्रमुख JPL ला आले होते. त्यांच्या परंपरेप्रमाणे प्रक्षेपणापूर्वी नारळ फोडला जातो, हे समजल्यावर JPL च्या संचालकांनीही तो अनुभव घेण्याचा उत्साह दाखवला. तो प्रसंगही तितकाच मनमोकळा होता. यात थेट चूक किंवा बरोबर असं काही मला म्हणायचं नाही. कारण माणसं परंपरा जपतात. संस्था जपतात. त्यातून आपलेपणा वाढतो, ताण हलका होतो, इतिहास जिवंत राहतो. प्रश्न परंपरांचा नाहीच.

माझा प्रश्न आहे तो परंपरा आपण कुठे आणि कशा जपतो, याबद्दल.

खरं तर JPL कडे सांगण्यासारख्या गोष्टींची काहीच कमतरता नाही. व्हॉएजरची आहे, कॅसिनीची आहे, मंगळावर हेलिकॉप्टर उडवणाऱ्या इनजेन्युइटीची आहे. कधीतरी रात्री-अपरात्री कोणीतरी एक बग शोधून तो वेळेत दुरुस्त केला, त्या गोष्टीचीही आहे. आणि लँडिंगच्या त्या 'सात मिनिटांच्या थरारा'ची आहे. मंगळावर सिग्नल पोहोचायला इतका वेळ लागतो, की यान प्रत्यक्षात उतरलेलं असतं किंवा कोसळलेलं असतं, तेव्हा कुठे मिशन कंट्रोलला त्याची बातमी कळते. त्या काही मिनिटांत उष्णतारोधक कवच वेगळं होणं, पॅराशूट उघडणं, रॉकेट्स प्रज्वलित होणं, हे सगळं यानाला स्वतःच स्वतःच्या प्रोग्राम केलेल्या तर्कावर करावं लागतं, कारण मदत करायला वेळच नसतो. या सगळ्या गोष्टी विज्ञानाची विचारपद्धत शिकवतात. त्या गोष्टी सांगितल्याही जातात. मग शेंगदाण्यांच्या बरणीची गोष्ट एवढी ठळक का व्हावी, हा प्रश्न मला पडतो. कदाचित उत्तर अगदी साधं आहे: त्या मोठ्या गोष्टींचा फोटो काढून घरी घेऊन जाता येत नाही; बरणीशेजारी उभं राहून काढलेला फोटो मात्र नेता येतो.

विज्ञानाने आपल्याला दिलेले सर्वांत मोठे वरदान कोणते?

रॉकेट? संगणक? औषधं?

माझ्या मते नाही.

विज्ञानाने आपल्याला दिलेले सर्वांत मोठे वरदान आहे विचार करण्याची पद्धत. ज्याला वैज्ञानिक पद्धत असे संबोधले जाते. योगायोग आणि कारण यात फरक करायचा. फारकत करायची. दोहोतील दरी दाखवायची.

"असं झालं म्हणून तसं झालं" असे विनापुरावा म्हणण्याचा मोह टाळायचा. पुरावा शोधायचा, मागायचा. स्वतःची चूक सापडली तर ती मान्य करायची. आणि गरज पडली तर स्वतःचंच मत बदलायचं.

रॉकेट बनवणं ही विज्ञानाची मोठी उपलब्धी आहेच. पण त्याहून मोठी उपलब्धी म्हणजे रॉकेट बनवताना आपण कसा विचार करतो, हे मानवजातीला शिकवणं. अवकाशयुगाची खरी ओळख शक्तीमान इंजिनांत नाही; ती प्रश्न विचारण्याच्या सवयीत आहे.

त्याच शाळकरी मुलांचा विचार करा जे आज माझ्या इंटर्नसबरोबर JPL मध्ये फिरत होते. त्यांच्यापैकी काहीजण उद्या डॉक्टर होतील, काही इंजिनियर, बहुतेक जण दोन्हीही नाही. पण आज ते जे पाहतात उदा. गृहीतकं तपासली जाताना, चुका मान्य केल्या जाताना, पुरावा मागितला जाताना, तेच उद्या प्रतिबंधक लशींबद्दल, हवामान बदलाबद्दल, कुठल्याही नव्या दाव्याबद्दल विचार करताना त्यांच्या मनात राहील. फक्त रॉकेट झेपावतानाच विज्ञान दिसतं असं नाही, तर चुकीला चूक म्हणण्याच्या क्षणीही ते तितकंच दिसतं. मुलं केवळ गोष्टी लक्षात ठेवत नाहीत; ती कोण सांगतंय हेही लक्षात ठेवतात. आई-वडील, शिक्षक किंवा वैज्ञानिक संस्था यांच्याकडून सांगितलेल्या गोष्टींना एक वेगळंच वजन असतं. त्यामुळे वैज्ञानिक संस्थांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट ही फक्त माहिती राहत नाही; ती मूल्यही बनते.

म्हणून वैज्ञानिक संस्थांची जबाबदारी फक्त संशोधनापुरती नाही. मुलं, विद्यार्थी, पालक, जे कोणी तिथे येतात, ते फक्त रॉकेट पाहायला येत नाहीत. ते विज्ञानाचा स्वभाव पाहायला येतात. रीत जाणायला येतात.

JPL ही कॅलटेकतर्फे NASA साठी चालवली जाणारी संस्था आहे. जगभरातील वैज्ञानिकांसाठी ती प्रेरणास्थान आहे. त्यामुळे तिच्या सार्वजनिक चेहऱ्यावर दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीला अतिरिक्त वजन प्राप्त होतं. ते फक्त प्रदर्शन नसतं; ते विज्ञानाची प्रतिमा घडवत असतं.

आजच्या काळात विज्ञानाला स्वतःचं समर्थन करावं लागतं, हीच मोठी शोकांतिका आहे. लसींपासून हवामान बदलापर्यंत, पुराव्यापेक्षा कथा अधिक वेगाने पसरतात. अशा वेळी विज्ञानाची विश्वासार्हता केवळ संशोधनावर नाही, तर स्वतःची प्रतिमा कशी

घडवते यावरही अवलंबून असते. विज्ञानावरचा हल्ला नेहमी विज्ञानाच्या बाहेरूनच होतो असं नाही. कधी कधी विज्ञानाची प्रतिमा नकळत धूसर झाली तरी त्याचा तोटाच होतो. विज्ञान म्हणजे काही गूढ, काही शुभ-अशुभ, काही निवडक लोकांची जादू, अशी भावना जर नकळत तयार झाली, तर विज्ञानाची खरी ताकदच झाकोळली जाते.

माझं JPL वर प्रेम आहे. कॅलटेक आणि JPL मध्येच मी काम करत असल्यामुळेच हा प्रश्न मला जास्त प्रकर्षाने पडतो.

विज्ञानाचं एक मोठं वैशिष्ट्य म्हणजे स्वतःलाच प्रश्न विचारणं. नवीन मोजमाप आलं तर गरज असल्यास जुना निष्कर्ष बदलणं. नवीन पुरावा आला तर मतप्रवाह बदलणं, दुरुस्त करणं. चूक जाणवली असल्यास ती न लपवणं. याच स्वभावामुळे विज्ञान इतर ज्ञानपद्धतींपेक्षा वेगळं ठरतं. स्वतःची चिकित्सा करण्याची तयारी ही कमजोरी नसून विज्ञानाची सर्वांत मोठी ताकद आहे. मग आपण स्वतःबद्दल सांगत असलेल्या कथांकडेही त्याच नजरेने पाहायला हरकत काय?

योगायोगाला कारण समजण्याची आपली सवय फार जुनी आहे. पाऊस पडला म्हणून पूजा यशस्वी झाली, की पूजा झाली म्हणून पाऊस पडला? अशा निष्कर्षांपासूनच अंधश्रद्धा जन्माला येतात. विज्ञानाने आपल्याला प्रथम शिकवलं ते म्हणजे या दोन गोष्टी वेगळ्या ठेवायला.

कदाचित त्या शेंगदाण्यांच्या बरणीशेजारी एक छोटासा संदेश असावा.

"ही आमच्या संस्थेची एक जिव्हाळ्याची परंपरा आहे. पण आमच्या मोहिमा यशस्वी होतात त्या हजारो वैज्ञानिक, अभियंते, तंत्रज्ञ आणि काटेकोर चाचण्यांमुळे. आणि प्रत्येक गृहीतकावर पुन्हा पुन्हा प्रश्न विचारण्याच्या संस्कृतीमुळे."

बरणी तिथेच राहू द्या. परंपराही राहू द्यात. पण त्याहून मोठी असलेली गोष्ट जास्त स्पष्ट करा. कारण विज्ञानाची खरी ओळख परंपरेत नाही; ती आहे स्वतःलाच प्रश्न विचारण्याच्या धैर्यात.

आणि पुढच्या वेळी माझे इंटर्न भारतात परत जाताना JPL बद्दल सांगतील, तेव्हा त्यांच्या आठवणीत शेंगदाण्यांची बरणीही असावी, पण त्याहून जास्त, विज्ञान कसं विचार करतं याची गोष्ट असावी.

रॉकेट अवकाशात झेपावतं ते इंधनावर; समाज पुढे जातो तो विचारपद्धतीवर. आणि विज्ञान पुढे जातं ते स्वतःलाच प्रश्न विचारत.

- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## Ekalavya Foundation

महाराष्ट्रात मानसिक आरोग्यासाठी राबवला जाणारा एक पथदर्शी उपक्रम

इतर शारीरिक आजारांप्रमाणेच मानसिक आजार हे देखील सर्वसामान्य असे आजार आहेत. भारतातील कोणत्याही राज्याप्रमाणे महाराष्ट्रात देखील सुमारे दहा टक्के लोकांना म्हणजे एक कोटी तीस लाख लोक संख्येला मानसिक समस्येसाठी तज्ञांच्या मदतीची आवश्यकता आहे. समस्या एवढी मोठी असून देखील मानसिक आरोग्य तज्ञांचा म्हणजे प्रामुख्याने मानसोपचार तज्ञ, समुपदेशक यांचा महाराष्ट्रात तीव्र तुटवडा आहे. जगात अनेक ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. साधनसंपत्तीतील हा तीव्र तुटवडा जर दूर करायचा असेल तर समाजामध्ये उपलब्ध असणारी साधनसंपत्ती किंवा रिसोर्सेस हे प्रशिक्षित करून वापरायला हवेत. याच दृष्टिकोनातून जगभर सर्वसामान्य कार्यकर्त्यांना (Lay health workers) प्रशिक्षण देऊन तज्ञांच्या उपचारांना पूरक म्हणून त्याची जोड दिल्यास खूप मोठी मदत होऊ शकते. जागतिक आरोग्य संघटनेने आणि अन्य तज्ञांच्या संस्थेने देखील याचे महत्व अधोरेखित केलेले आहे.

मग प्रश्न असा राहतो की अशी साधनसंपत्ती कुठे मिळेल, ती ओळखायचे कशी , ती आकर्षित करून रिटेन करता येईल अशी बांधणी करायची, तिला प्रशिक्षण द्यायचे आणि मग याच प्रशिक्षित साधन संपत्तीचा तज्ञांच्या सेवेला पूरक म्हणून आरोग्यवस्थेत वापर करायचा. ही सर्व गोष्ट दिसते तेवढी सोपी नाही. त्या त्या देशाच्या किंवा राज्याच्या भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीनुसार एक स्वतंत्र असे प्रारूप तयार करणे आणि ते राबवणे हे आवश्यक आहे. तसे प्रारूप यशस्वीपणे राबवले तर मानसिक आरोग्य व्यवस्था सुदृढ करण्याचे ते एक क्रांतिकारक असे पाऊल होऊ शकते. नेमक्या याच दिशेने एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ,पुणे संस्थेची वाटचाल चालू आहे.

साधारणपणे २७-२८ वर्षांपूर्वी पुण्यामध्ये मानसिक आजारी व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी स्वमदत गटाला सुरुवात झाली. त्याकाळी पुण्यामधील वातावरण लक्षात घेता असा स्वमदत गट चालवणे आणि त्याच्यात लोकांनी भाग घेणे ही देखील एक आव्हानात्मक गोष्ट होती. परंतु या सर्व खाचखळग्यातून जात एकलव्य स्वमदत गटाने असा गट चालवण्याची फिलॉसॉफी ,पद्धती, नियम अशा गोष्टी विकसित केल्या. स्वमदत गट चालवण्याचे अनुभव, रुग्ण आणि कुटुंबीयांचे प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांना समर्थ करणारे इतर साहित्य अशा गोष्टी विकसित केल्या. एकलव्यच्या वार्तापत्रातून आणि अन्य साहित्यातून त्यांची मांडणी केली.

या सर्व प्रवासातून आता एकलव्य स्वमदत गट हा गट चालवण्यासंबंधीचे विचार, पद्धती ,नियम मर्यादा इत्यादींच्या खंबीर पायावर उभा आहे. एकलव्य संस्था हे प्रारूप महाराष्ट्रातल्या विविध ठिकाणी राबवण्यासाठी प्रयत्नशील आहे. नुकताच एकलव्य फाउंडेशन चा महाराष्ट्र शासनाबरोबर जो सहकार्याचा करार झाला या अन्वये शासनाच्या जिल्हा मानसिक आरोग्य उपक्रमाद्वारे विविध जिल्ह्यांमध्ये मानसिक आजारी व्यक्तींच्या कुटुंबीयांसाठी स्वमदत गट, मानसिक आजारांविषयी जनजागृती व कलंक निर्मूलन आणि अन्य शैक्षणिक आणि प्रबोधनपर साहित्य वितरित करण्याची जबाबदारी एकलव्यने घेतली आहे. सरकारी क्षेत्राबरोबरच खाजगी मानसिक आरोग्य क्षेत्रात देखील काम चालू करण्याचा मानस आहे. मानसिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी एकलव्य फाउंडेशनचे चालवलेले हे प्रयत्न हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्रात एका ठिकाणी यशस्वी झालेले अनेक प्रयत्न उदाहरणार्थ डॉक्टर अभय बंग यांचे अर्भक मृत्यू कमी करण्यासाठी केलेले प्रयत्न, ग्रामीण भागातील शिक्षणासाठी, अपंगांच्या विकासासाठी, दुर्लक्षित वेश्या व्यवसायातील महिलांच्या विकासासाठी चालवल्या जाणाऱ्या चळवळींप्रमाणेच ही चळवळही महाराष्ट्रात फोफावेल आणि पुढे संपूर्ण भारतामध्ये तो एक पथदर्शी उपक्रम होईल असा मला विश्वास वाटतो.

eklavyamh.org

- **अनिल वर्तक,** संस्थापक अध्यक्ष , एकलव्य फाऊंडेशन फॉर मेंटल हेल्थ पुणे.

## स्नेहसंमेलनाची महती...

अमेरिकेतील BMM म्हणजेच अमेरिकेतील मराठी मंडळींचे स्नेहसंमेलन याबद्दल भारतात असतांना अनेक वेळा ऐकले होते. आणि त्याबद्दल खूप उत्सुकताही होती.

२ वर्षांपूर्वी सॅनहोजे इथे झालेल्या “काय बे” ह्या स्नेहसंमेलनाला जायचा योग आला , आणि हे भव्य स्नेहसंमेलन याची देहा, याची डोळा पाहून धन्य झाल्यासारखे वाटले . अतिशय सुंदर रित्या ह्या मोठ्या संमेलनाचे आयोजन केले होते, करमणुकींच्या अनेक कार्यक्रमाची मजा होती, मराठी खाद्यपदार्थांची रेलचेल होती, आप्तेष्टाच्या, मित्र मैत्रिणींच्या, गाठी भेटींची सुवर्ण संधी होती. तिथे अपेक्षेपेक्षा जास्तच चांगला कार्यक्रम पहायला मिळाला आणि म्हणूनच सियाटलच्या स्नेहसंमेलनालाही आम्ही हजेरी लावणार आहोत.

काहींना वाटतं , भारतात आपण इतके कार्यक्रम पहातो, इतके सर्व मराठी पदार्थ खातो, मग इथे येऊन इतका खर्च का करावा ? भारतीय रूपयांत पाहिलं तर ३ दिवसांचे तिकीट, थोडे महागच वाटते, सर्वांना परवडेल असे नाही वाटत. तरी इथे रहाणाऱ्यांनी, एक चांगला अनुभव म्हणून, आपल्या मराठीसाठी एकदा तरी या स्नेहसंमेलनाला यायला पाहिजे असे मला तरी वाटते.

आपल्या घरात एखादे लग्न कार्य असले, किंवा सोसायटीतले गॅदरींग असले तर किती धावपळ असते, किती आयोजन करावे लागते. मग इथे तर अमेरिकेतली ६० मराठी मंडळं एकत्र येऊन हा कार्यक्रम करतात. बरं ही मंडळं आहेत कुठे? एव्हढी मोठी अमेरिका..कितीतरी लांबची अंतर, वेळ वेगवेगळी .. सर्वजण ५ दिवस भरपूर ऑफिसचे काम करणारी .. सगळ्यांनी एकमेकांना प्रत्यक्ष पाहिलेलं सुध्दा नाही .. तरी एकत्र येऊन, फोनवर, व्हिडिओवर बोलून सर्व ठरविणे, ही सोपी गोष्ट नाहीये.. आणि हा कार्यक्रम फक्त एका दिवसासाठी नाही तर तब्बल ४ दिवस..जवळ जवळ पाच हजार लोकांसाठी करायचा.. इथले कडक नियम, वेगळेपण, अवाढव्य खर्च सर्व सांभाळून .. फक्त स्वयंसेवकाच्या भूमिकेतून करायच.. !

किती मोठं आव्हान आहे हे! २ वर्ष त्यासाठी शेकडो जण आपले रोजचे व्यवसाय सांभाळून झपाटल्यासारखे काम करतात, तेव्हा कुठे सर्व कार्यक्रम छान पार पाडले जातात.

मागच्यावर्षी मी फक्त प्रेक्षक म्हणून आनंद घेतला . यावेळी स्वयंसेवक म्हणून नांव नोंदवल्यामुळे, आणि यथाशक्ती थोडा सहभाग असल्यामुळे ,हे स्नेहसंमेलनाचे शिवधनुष्य उचलणे किती कठिण आहे ह्याची जास्त जाणिव झाली. इथे अमेरिकेत , आपल्या मराठी माणसाच्या , मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचे कौतुक व्हावे म्हणून किती वेगवेगळे कार्यक्रम असतात,तज्ञांचे मार्गदर्शन असते , ते पाहिले कि या संमेलनाचे महत्व जास्त वाटते.भारतातून प्रसिध्द कलाकारांना बोलावणे एकवेळ सोपे असेल पण इथे नाटक, नाच, गाणी बसविणे, स्पर्धा घेणे, या सर्वांचे वर्षभर मागे लागून आयोजन करणे कठिण असते.

इतकी नाना प्रकारची, नाना ठिकाणची मराठी माणसं एकत्र येतात , तेही परदेशात .. हे च खूप कौतुकास्पद आहे. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. होत असेल कधी काही चूक, गैरसमज ... पण आपण आपली माणसं समजून माफ करायचं... आणि शक्य असेल तितकी मदत करायची अशी एकदा भावना असली कि हा कार्यक्रम कसा यशस्वी होईल, चांगला होईल याकडे लक्ष दिले जाते . आणि अशी अनेक माणसं जोडल्यामुळेच इतकी वर्षे हे स्नेहसंमेलन चालू आहे.

आता लवकरच सुरू होणार आहे त्यांचे वेध लागले आहेत . त्यासाठी खूप शुभेच्छा सर्वांना!

- **चित्रा मेहेंदळे**

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue.
The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Local Egyptian Guy***

**Artist: Usha Om Agate**

Dimensions: 14″x10.5″
Medium:Water Colors
Price:
Mandal: Marathi Kala Mandal



***Parrot***

**Artist: Chitra Mehendale**

Dimensions:6″ x 8″
Medium: watercolor
Price:Not for Sale
Mandal: DFWMM



***Vibrant Zinnias***

**Artist: Neelima Gole**

Dimensions:12″x9″ Medium: watercolora Price:$ 350
Mandal: Maharashtra Mandal of Jacksonville



***Tibetan Monk***

**Artist: Pratima Lele**

Dimensions: 9″x12″
Medium:Watercolor
Price:$ 100



***Saxophone blues***

**Artist: Medha Atre-Kulkarni**

Dimensions:12″x 16″
Medium:Watercolor
Price:Not for Sale
Mandal:Marathi Vishwa, NJ



***Still life - Lemons***

**Artist: Manasi Kelkar**

Dimensions:9" x 8" canvas
Medium:Oil Paint
Price:Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.

## BMM Uttarrang Senior Living Communities Database




११ एप्रिल २०२६ रोजी उत्तररंगचा ‘Downsizing & CCRC’ वर परिसंवाद झाला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतरच्या चर्चेतून असा एक विचार मांडला गेला की आपल्या ह्या पिढीतील लोक हळूहळू 55 Plus Independent living, Assisted Living, Memory Care किंवा CCRC (Continuing Care Retirement Community) मध्ये जाऊ लागले आहेत. पुढल्या ५-१० वर्षात हे प्रमाण वाढेल हे नक्की. आपण कुठल्या facility मध्ये जावं हा निर्णय खूप कठीण असतो. काही वेळेस मुलं तो निर्णय घेतात किंवा आपला आपल्यालाच तो निर्णय घ्यावा लागतो. अशा वेळेस जर आपल्याकडे आपली मराठी माणसं अमेरिकेतल्या कुठल्या राज्यात, कुठल्या facilities मध्ये गेली आहेत ह्याचा तपशील असेल, तर नवीन येणाऱ्या लोकांना त्याचा खूप फायदा होईल आणि म्हणून त्या दृष्टीने आम्ही हे आवाहन करत आहोत. आपल्यापैकी जे सध्या अश्या facilities मध्ये राहत आहेत, किंवा तुमचे आई वडील राहत असतील, किंवा तुमचे ओळखीचे कोणी राहत असतील तर त्यांच्या संमतीने हा form भरून आम्हाला पाठवावा. ह्या माहितीचा एक database उत्तरंग या उपक्रमाद्वारे उपलब्ध राहील व त्याचा लाभ जसा, जेंव्हा, ज्यांना, लागेल तसा घेता येईल.

उद्देश एकच की आपली मराठी माणसं उतारवयातही एकमेकांना सोबत म्हणून राहू शकतील. तुमचं नाव व facility चे नाव हे आवश्यक असेल, पण तुम्हाला नवीन येणाऱ्या कुटुंबाने तुमच्याशी अधिक माहितीसाठी किंवा तुमचा अनुभव जाणण्यासाठी संपर्क साधलेला चालणार असेल तर तसे नमूद करावे.

Form: https://forms.gle/eVL5N6QqsSQhuB4Y6

## सेवेचा प्रवास... संस्कारांची शिदोरी...

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ॥"

\- संत तुकाराम महाराज



काही प्रवास नियती ठरवते, काही आपण निवडतो, तर काही प्रवास आपल्याला आयुष्यभरासाठी समृद्ध करून जातात. BMM च्या कार्यकारिणी सदस्य म्हणून गेली दोन वर्षे केलेला हा प्रवास माझ्यासाठी असाच अविस्मरणीय ठरला.

या दोन वर्षांत मला अनेक जबाबदाऱ्या सांभाळण्याची संधी मिळाली; पण त्याहूनही मोठी गोष्ट मिळाली ती म्हणजे जगभरातील मराठी कुटुंबांशी जुळलेले नाते. आज मागे वळून पाहताना मनात एकच भावना दाटून येते—आपण सर्वांनी मिळून काहीतरी असे घडवले, जे पुढील अनेक वर्षे मराठी भाषेच्या आणि संस्कारांच्या सेवेत उभे राहील.

BMM मध्ये काम करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—संस्था मोठी होते ती इमारतींमुळे किंवा पदांमुळे नव्हे; तर स्वयंसेवकांच्या निःस्वार्थ सेवेमुळे. प्रत्येक शिक्षक, प्रत्येक समन्वयक, प्रत्येक पालक आणि प्रत्येक स्वयंसेवकाने आपल्या वेळेचा, ज्ञानाचा आणि मनाचा अंश या कार्यात अर्पण केला. त्या सर्वांना माझा मनापासून प्रणाम.

मराठी शाळा विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर माझ्यासमोर एक स्पष्ट ध्येय होते—मराठी भाषा ही केवळ घरात बोलली जाणारी भाषा न राहता, अभिमानाने शिकली जाणारी, आधुनिक शिक्षणाशी जोडली जाणारी आणि पुढच्या पिढीसाठी उपयुक्त ठरणारी भाषा बनावी.

या प्रवासात अनेक स्वप्ने साकार झाली. बालभारती यांच्या सहकार्याने महाराष्ट्राबाहेर प्रथमच अशा प्रकारे मराठी शिक्षणासाठी अधिकृत शैक्षणिक सहकार्य उभे राहिले. हा केवळ एक करार नव्हता; तर महाराष्ट्र आणि जगभरातील मराठी विद्यार्थ्यांना जोडणारा ज्ञानाचा सेतू होता.

त्यानंतर AVANT STAMP आणि Seal of Biliteracy च्या दिशेने केलेले प्रयत्न मराठी भाषेला जागतिक शैक्षणिक मान्यता मिळवून देणारे ठरले. आपल्या विद्यार्थ्यांनी मराठी शिकावीच, पण त्या ज्ञानाला त्यांच्या शैक्षणिक प्रवासातही सन्मानाचे स्थान मिळावे, ही अनेक वर्षांची इच्छा प्रत्यक्षात येताना पाहण्याचे भाग्य लाभले.



गेल्या काही महिन्यांत जगभरातील २० पेक्षा अधिक मराठी शाळांमधील ३५ हून अधिक स्वयंसेवकांनी एकत्र येऊन सात पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन, संपादन आणि शिक्षक मार्गदर्शिका तयार केल्या. हे कार्य कोणत्याही मानधनासाठी नव्हते; ते पुढील पिढीसाठी होते. या स्वयंसेवकांनी दिलेला वेळ आणि परिश्रम हीच BMM ची खरी संपत्ती आहे.

यावर्षी २,९४० विद्यार्थ्यांनी BMM मराठी परीक्षेत सहभाग नोंदवून इतिहास घडवला. पण या आकड्यामागे हजारो पालकांचा विश्वास, शेकडो शिक्षकांचे समर्पण आणि प्रत्येक विद्यार्थ्याची मराठीबद्दलची ओढ दडलेली आहे.

मराठी शाळांना एक समान सांस्कृतिक ओळख मिळावी या उद्देशाने "मराठी शाळा गीत" साकारले. जगभरातील विविध शहरांमध्ये, वेगवेगळ्या उच्चारांत, पण एकाच भावनेने हे गीत गाताना मुलांना पाहणे हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक अनुभव होता.

या कार्यकाळात तंत्रज्ञानाचा उपयोग करून संस्कारांचा प्रसार करण्याचा एक अभिनव प्रयोगही करता आला. Streaming Marathi Cinema for Marathi Shalas ही संकल्पना प्रथमच राबवण्यात आली. त्याअंतर्गत 'अभंग तुकाराम' हा चित्रपट जगभरातील ४० मराठी शाळांमध्ये, तर 'स्वारी आग्रा' हा चित्रपट २२ मराठी शाळांमध्ये एकाच स्ट्रीमिंग व्यासपीठाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. हा केवळ चित्रपट प्रदर्शनाचा उपक्रम नव्हता; तर संतपरंपरा, इतिहास आणि मराठी संस्कृती नव्या पिढीपर्यंत आधुनिक माध्यमातून पोहोचवण्याचा एक अभिनव प्रयत्न होता.

मराठी शाळांचे कार्य अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचावे, यासाठी विविध माध्यमांतून सातत्याने प्रयत्न केले. आकाशवाणी, पुणे वर मराठी शाळा चळवळीची माहिती मांडण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातील श्रोत्यांपर्यंत परदेशातील मराठी शाळांचे कार्य पोहोचले आणि अनेकांनी या उपक्रमाबद्दल अभिमान व्यक्त केला. महाराष्ट्र आणि जगभरातील मराठी समाज यांच्यातील भावनिक नाते अधिक दृढ करण्याची ती सुंदर संधी होती.

माझ्या मनाच्या अत्यंत जवळचा आणखी एक उपक्रम म्हणजे शिवचरित्र पारायण. गेली पाच वर्षे शेकडो स्वयंसेवकांच्या सहकार्याने हा उपक्रम हजारो कुटुंबांपर्यंत पोहोचत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचे चारित्र्य आणि त्यांच्याकडून मिळणारे राष्ट्रप्रेम व स्वाभिमानाचे संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, हा त्यामागचा एकमेव हेतू. आज जेव्हा एखादे मूल शिवचरित्राविषयी उत्साहाने बोलताना दिसते, तेव्हा त्या सर्व स्वयंसेवकांच्या परिश्रमांचे सार्थक झाल्यासारखे वाटते.



संस्थेची आर्थिक शिस्तही तितकीच महत्त्वाची असते. त्यामुळे परीक्षेच्या प्रक्रियेत सुधारणा करून झालेली बचत थेट मराठी शाळांना परत देण्याचा निर्णय घेतला. जवळपास $29,400 जगभरातील शाळांना प्रोत्साहन म्हणून वितरित करण्यात आले. संस्थेची बचत पुन्हा समाजात गुंतवली गेली, याचे विशेष समाधान वाटते.

या दोन वर्षांत अनेक आव्हाने आली. वेळेतील फरक, विविध देशांतील समन्वय, स्वयंसेवकांवर आधारित कार्यपद्धती आणि कधी कधी मतभेदही. पण प्रत्येक वेळी एक गोष्ट जाणवली—ध्येय मोठे असेल तर अहंकार आपोआप लहान होतो. संवाद, विश्वास आणि सामूहिक प्रयत्न यांच्या बळावर प्रत्येक आव्हानावर मात करता आली.

या प्रवासात माझे सहकारी कार्यकारिणी सदस्य, BOT सदस्य, सर्व समित्या, शिक्षक, समन्वयक आणि जगभरातील प्रत्येक स्वयंसेवक यांचे मनःपूर्वक आभार. माझ्या कुटुंबाचे ऋण तर शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. समाजकार्यासाठी दिलेला प्रत्येक तास हा त्यांनी मला दिलेला वेळ होता.

कार्यकाळ संपतो आहे; पण सेवाभाव कधीच संपत नाही. आज पद बदलू शकते, जबाबदाऱ्या बदलू शकतात; पण मराठी भाषा, संस्कृती आणि पुढील पिढीसाठी काम करण्याची प्रेरणा कायम राहील.

शेवटी ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील प्रार्थनेनेच माझे मनोगत पूर्ण करावेसे वाटते—

"दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो ।प्राणिजात ॥"

हीच प्रार्थना—BMM ची वाटचाल अशीच ज्ञान, संस्कार, तंत्रज्ञान आणि सेवाभाव यांच्या प्रकाशाने उजळत राहो, आणि जगभरातील प्रत्येक मराठी कुटुंबाला जोडत राहो.

रामकृष्ण हरी!

धन्यवाद आणि नम्र अभिवादन,

- **श्री. राहुल देशमुख,**
संचालक – बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) २०२४-२६
मराठी शाळा, पॉडकास्ट, युवा विभाग,
उत्तर अमेरिका (अमेरिका + कॅनडा)

## मनोगत



२०२४–२०२६ या कालावधीत BMM चा खजिनदार (Treasurer) म्हणून कार्य करत असताना आता माझ्या कार्यकाळाची सांगता जवळ येत आहे. या निमित्ताने गेल्या दोन वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेण्याची आणि आपल्या संस्थेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याची ही योग्य वेळ आहे.

जेव्हा मी ही जबाबदारी स्वीकारली, तेव्हा BMM च्या आर्थिक व्यवस्थापन प्रक्रियेत सुधारणा करणे आणि आर्थिक पारदर्शकता वाढवणे हे माझे प्रमुख ध्येय होते. एक स्वयंसेवी (Nonprofit) संस्था म्हणून, आपल्या निधीचा वापर कसा होतो याची स्पष्ट माहिती उपलब्ध असणे, अचूक आर्थिक नोंदी ठेवणे आणि संस्थेच्या उद्दिष्टांसाठी उपलब्ध संसाधनांचे जबाबदारीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

माझ्या प्रमुख वचनांपैकी एक म्हणजे Excel-आधारित लेखाव्यवस्थेची जागा आधुनिक अकाउंटिंग प्रणालीने घेणे. यापूर्वी आर्थिक व्यवहार Excel फाइल्समध्ये नोंदविले जात आणि वर्षातून एकदा ते सर्व डेटा अकाउंटंटकडे पाठविला जाई. त्यानंतर लेखांकन, आर्थिक अहवाल तयार करणे आणि कर (Tax) भरण्याची प्रक्रिया केली जात असे. ही पद्धत कार्यक्षम असली तरी वर्षभरातील आर्थिक स्थितीचे अचूक आणि वेळोवेळी विश्लेषण करणे कठीण होते.

या आव्हानावर मात करण्यासाठी आम्ही QuickBooks ही लेखा प्रणाली स्वीकारली, नवीन अकाउंटंटची नियुक्ती केली आणि जानेवारी २०२४ पासूनचे बँक खाते, PayPal आणि इतर पेमेंट प्लॅटफॉर्मवरील सर्व व्यवहार प्रणालीमध्ये नोंदविले. या प्रक्रियेत जुने व्यवहार तपासणे, त्यांची सांगड घालणे आणि नवीन आर्थिक नियंत्रण व्यवस्था निर्माण करणे यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम घ्यावे लागले. सुरुवातीचे काही महिने अत्यंत आव्हानात्मक होते; परंतु एकदा मजबूत पाया तयार झाल्यानंतर आमच्या आर्थिक माहितीची गुणवत्ता, अचूकता आणि उपलब्धता यामध्ये लक्षणीय सुधारणा झाली.

आज BMM कडे अधिक शिस्तबद्ध आणि संरचित आर्थिक व्यवस्थापन प्रणाली आहे. यामुळे नियतकालिक आर्थिक अहवाल, विविध उपक्रमांचे आर्थिक विश्लेषण, Profit & Loss Statements आणि Balance Sheets सहज उपलब्ध होऊ लागले. याशिवाय, “वृत्त” माध्यमातून नियमित आर्थिक अहवाल प्रकाशित करण्याची परंपरा सुरू केली, ज्यामुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीबाबत अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण झाले.

स्वयंसेवी संस्थेच्या खजिनदाराची सर्वात महत्त्वाची जबाबदारी म्हणजे प्रत्येक खर्चाची योग्य नोंद आणि आवश्यक कागदपत्रांसह पडताळणी सुनिश्चित करणे. काही वेळा पुरेशा पुराव्यांशिवाय आलेल्या खर्च परतफेडीच्या किंवा देयकांच्या विनंत्या नाकाराव्या लागल्या. त्यामुळे कदाचित मी काहींना कठोर वाटलो असेन. परंतु संस्थेच्या निधीचे संरक्षण करणे आणि भविष्यातील पदाधिकाऱ्यांसाठी स्पष्ट, पारदर्शक आणि विश्वासार्ह आर्थिक नोंदी ठेवणे ही माझी जबाबदारी होती. माझे एकच तत्त्व होते – प्रत्येक आर्थिक व्यवहार हा कागदोपत्री, पारदर्शक आणि योग्यरीत्या समर्थित असला पाहिजे.

खजिनदार म्हणून काम करण्याबरोबरच मला BMM च्या अनेक उपक्रमांमध्ये योगदान देण्याची संधी मिळाली. युवा कार्यक्रम, निधी संकलन, मिनी कन्व्हेन्शन्स, विश्व मराठी कन्व्हेन्शन्स आणि इतर अनेक धोरणात्मक प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याचा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा ठरला. या माध्यमातून संस्थेच्या व्यापक उद्दिष्टांना

हातभार लावता आला आणि आर्थिक निर्णय दीर्घकालीन शाश्वततेच्या दृष्टीने घेण्यास मदत झाली.

गेल्या वर्षभरातील माझ्या वेळेचा मोठा भाग Seattle 2026 Convention साठी BCC सदस्य म्हणून काम करण्यात गेला. आर्थिक अनिश्चितता, महागाई, जागतिक स्तरावरील युद्धसंबंधित अनिश्चितता,  टॅरिफ्स आणि इतर अनेक गुंतागुंतीच्या बाबी या प्रवासात समोर आल्या. प्रारंभीच्या “Go / No-Go” चर्चांपासून पर्यायांचा अभ्यास, कायदेशीर सल्लामसलत आणि अखेरीस आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा निर्णय – हा संपूर्ण प्रवास आव्हानात्मक आणि तितकाच प्रेरणादायी होता. आज Seattle 2026 योग्य दिशेने वाटचाल करत आहे, याचा मला अभिमान आहे. उत्कृष्ट कार्यक्रम, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि समर्पित स्वयंसेवकांच्या योगदानामुळे हे अधिवेशन सर्वांसाठी अविस्मरणीय ठरेल, याची मला खात्री आहे.

या प्रवासात मला पूर्ण विश्वास आणि पाठिंबा दिल्याबद्दल अध्यक्ष प्रसाद पानवलकर यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. आर्थिक व्यवहारांच्या व्यवस्थापनात स्वतंत्रपणे कार्य करण्याची संधी त्यांनी दिली आणि त्यामुळे अनेक सकारात्मक सुधारणा राबविणे शक्य झाले. तसेच माझ्या सहकारी कार्यकारिणी सदस्यांचे, स्वयंसेवकांचे, उपक्रम प्रमुखांचे आणि सर्व मंडळांचे सहकार्याबद्दलही मी मनःपूर्वक ऋणी आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळेच आर्थिक शिस्त आणि सुयोग्य प्रशासन अधिक बळकट झाले.

ही जबाबदारी पुढील खजिनदाराकडे सुपूर्द करताना मला विश्वास वाटतो की आपण एक मजबूत आर्थिक पाया निर्माण केला आहे. पुढील खजिनदाराने या कार्याला अधिक पुढे नेऊन सविस्तर वर्गीकरण, विश्लेषणात्मक डॅशबोर्ड्स आणि प्रगत आर्थिक अहवाल प्रणाली विकसित कराव्यात, ज्यामुळे अध्यक्ष आणि कार्यकारिणी समितीला अधिक माहितीपूर्ण आणि परिणामकारक निर्णय घेता येतील.

खजिनदार म्हणून सेवा करणे हा माझ्या स्वयंसेवी जीवनातील सर्वात अर्थपूर्ण अनुभवांपैकी एक राहिला आहे. या भूमिकेमुळे मला माझ्या जिव्हाळ्याच्या संस्थेसाठी योगदान देता आले, अनेक समर्पित स्वयंसेवकांसोबत काम करता आले, असंख्य मित्र जोडता आले आणि BMM च्या भविष्यासाठी एक सक्षम आर्थिक व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न करता आला.

या अद्भुत समुदायाची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल BMM चे मनःपूर्वक आभार.

- **संतोष साळवी,** खजिनदार, BMM (२०२४–२०२६)

## Balancesheet as on 23.07.2026

**BMM NORTH AMERICA INC** — 4:32 PM

**Profit & Loss** — 07/23/2026

**August 1, 2024 through June 30, 2026** — Accrual Basis

| | Aug 1, '24 - Jul 23, 26 |
|---|---|
| Ordinary Income/Expense | |
| Income | |
| ADVERTISEMENT INCOME | 1,919.00 |
| BConnect | 0.00 |
| BMM CONVENTION SURPLUS | 1,500.00 |
| BMM Courses & Initiatives | |
| Kirtan | 2,025.00 |
| Marathi Bolibhasha | 1,975.00 |
| PAUROHITYA | 29,643.50 |
| Sanskrit Class | 150.00 |
| Shastriya Sangeet | 2,400.00 |
| ShivChhatrapati Study Program | 70.00 |
| Sugam Sangeet | 3,840.00 |
| BMM Courses & Initiatives - Other | 2,965.00 |
| Total BMM Courses & Initiatives | 43,068.50 |
| BMM Samajrang | |
| Marathawada Flood Relief | 38,425.00 |
| BMM Samajrang - Other | 0.00 |
| Total BMM Samajrang | 38,425.00 |
| BMM Summer Mentorship | |
| Baal Summer Magic Math | 975.00 |
| BMM Marathi Yuwa | 19,425.00 |
| Total BMM Summer Mentorship | 20,400.00 |
| BVG | 250.00 |
| DONATION | 11,716.63 |
| INDIA PROGRAMMING | |
| Dhanashree Lele Program | 18,250.00 |
| Dharohar | 45,162.51 |
| Indradhanu | 5,740.00 |
| Jar Tar Chi Gosta | 23,045.27 |
| Shikayala Gelo Ek | 172,473.00 |
| INDIA PROGRAMMING - Other | 22,425.80 |
| Total INDIA PROGRAMMING | 287,096.58 |
| INTEREST INCOME | 1,768.65 |
| MANA | |
| Membership | 1,890.00 |
| Workshop | 285.00 |
| Total MANA | 2,175.00 |
| MARATHI MOVIE | |
| Abhanga Tukaram | 8,300.00 |
| Asambhav | 1,050.00 |
| ASHA | 600.00 |
| Bin Lagnachi Goshta | 1,100.00 |

## BMM NORTH AMERICA INC
## Profit & Loss
### August 1, 2024 through June 30, 2026

4:32 PM
07/23/2026
Accrual Basis

| | Aug 1, '24 - Jul 23, 26 |
|---|---|
| Deul Band 2 | 5,075.00 |
| Fussclass Dabhade | 2,025.00 |
| Mukkampost Bombilwadi | 3,850.00 |
| Phullwanti | 3,975.00 |
| Swargandharva Sudhir Phadke | 908.98 |
| Swari Agra | 6,060.00 |
| MARATHI MOVIE - Other | 925.00 |
| Total MARATHI MOVIE | 33,868.98 |
| MARATHI SHALA EXAM FEES & BOOKS | 178,569.75 |
| Marathi Shala Online course | 5,530.00 |
| Membership | 15,430.00 |
| Reshimgathee | |
| Meetup Atlanta | 8,433.00 |
| Meetup Boston | 3,090.00 |
| Meetup NJ | 20,565.00 |
| Meetup Portland | 101.00 |
| Membership | 34,998.32 |
| Reshimgathee - Other | 4,870.00 |
| Total Reshimgathee | 72,057.32 |
| RETURNS & ALLOWANCES | 81.77 |
| SUSPENSES - INCOME | 0.00 |
| VRUTTA | |
| DONATION | 450.00 |
| NEWS LETTER-ADV | 1,620.00 |
| VRUTTA MEMBERSHIP | 3,300.00 |
| Total VRUTTA | 5,370.00 |
| Total Income | 719,227.18 |
| Expense | |
| BANK SERVICE CHARGES | 2,094.05 |
| BMM Courses & Initiatives Exp | |
| Jyotish Abhyas | 2,800.00 |
| Kirtan | 2,100.00 |
| Marathi Bolibhasha | 1,650.00 |
| PAUROHITYA EXP | 17,300.00 |
| Shastriya Sangeet | 210.00 |
| Sugam Sangeet | 3,510.00 |
| Total BMM Courses & Initiatives Exp | 27,570.00 |
| BMM Samajrang Donation | |
| Marathawada Flood | 39,270.00 |
| Total BMM Samajrang Donation | 39,270.00 |
| COMPUTER EXPENSES | 204.95 |
| CONVENTION RELATED | 25.00 |
| Donation Exp | 0.00 |


## BMM NORTH AMERICA INC
## Profit & Loss
### August 1, 2024 through June 30, 2026

4:32 PM
07/23/2026
Accrual Basis


| | Aug 1, '24 - Jul 23, 26 |
|---|---|
| DUES AND SUBSCRIPTION | 5,976.69 |
| EDUCATION ENDOWMENT | 12,000.00 |
| INDIA PROGRAMMING EXPS | |
| Dhanashree Lele Program | 13,491.24 |
| Dharohar | 46,006.15 |
| Indradhanu | 5,740.00 |
| Jar Tar Chi Goshta | 37,414.26 |
| Shikayala Gelo Ek | 139,823.84 |
| INDIA PROGRAMMING EXPS - Other | 2,500.00 |
| Total INDIA PROGRAMMING EXPS | 244,975.49 |
| INSURANCE | 2,418.62 |
| MAITRI MELAWA EXPENSE | |
| DALLAS FORT | 23,789.22 |
| Total MAITRI MELAWA EXPENSE | 23,789.22 |
| MANA Exp | 649.00 |
| MARATHI MOVIE EXPENSE | |
| Abhanga Tukaram | 8,000.00 |
| Asambhav | 1,575.00 |
| Bin Lagnachi Goshta | 1,050.00 |
| Deul Band 2 | 1,371.00 |
| Fussclass Dabhade | 2,050.00 |
| Mukkampost Bombilwadi | 3,825.00 |
| Swargandharva Sudhir Phadke | 100.00 |
| Swari Agra | 5,535.00 |
| MARATHI MOVIE EXPENSE - Other | 5,184.95 |
| Total MARATHI MOVIE EXPENSE | 28,690.95 |
| MARATHI SHALA EXPS | 51,239.87 |
| MISC. EXPS | 550.02 |
| NEWS LETTER PRINTING | 1,045.35 |
| NORTH AMERICA PROGRAMMING | 3,500.00 |
| PROFESSIONAL FEES | |
| Accounting | 1,099.00 |
| Total PROFESSIONAL FEES | 1,099.00 |
| Reshimgathee Exp | |
| Meetup NJ | 16,824.42 |
| Reshimgathee Exp - Other | 3,771.00 |
| Total Reshimgathee Exp | 20,595.42 |
| WEBSITE EXPENSE | 880.00 |
| Total Expense | 466,573.63 |
| Net Ordinary Income | 252,653.55 |
| Other Income/Expense | |
| Other Income | |
| Other Income | 2,140.60 |


## BMM NORTH AMERICA INC
## Profit & Loss
### August 1, 2024 through June 30, 2026

4:32 PM
07/23/2026
Accrual Basis


| | Aug 1, '24 - Jul 23, 26 |
|---|---|
| Total Other Income | 2,140.60 |
| Other Expense | |
| OTHER EXPENSE | 77.67 |
| Total Other Expense | 77.67 |
| Net Other Income | 2,062.93 |
| Net Income | **254,716.48** |

Notes - This financial report is only till 30th of June 2026
We are expecting around $55,000 payments in July 2026
We will provide financial picture upto 31st of July 2026 during Augst 8 , 2026 AGM

## दिवाळी अंक आवाहन २०२६

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्तातर्फे प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकाचे हे गौरवशाली ४३ वे वर्ष आम्ही पुन्हा एकदा दिमाखात साजरे करत आहोत. या निमित्ताने, उत्तर अमेरिका तसेच भारतातील सर्व मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकार आणि साहित्यप्रेमींना 'बीएमएम वृत्त दिवाळी अंक २०२६' साठी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आपले लेख, कथा, कविता, लघुनिबंध, नर्म विनोद, चुटके, प्रवासवर्णन, पाककृती तसेच कलात्मक रेखाचित्रे आम्हाला अवश्य पाठवावीत. या अंकाला अधिक समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि बहुरंगी बनविण्यासाठी आपले मौलिक योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे आपली सर्जनशील अभिव्यक्ती व कल्पकता जगभरातील वाचकांसमोर सादर करण्याची ही एक अनमोल संधी आम्ही आपणांस उपलब्ध करून देत आहोत.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: ३० ऑगस्ट २०२६**

**अपेक्षित साहित्य व मर्यादा:**

- कथा / लेख / निबंध: १००० शब्द (फोटोशिवाय)
- कथा / लेख / निबंध: ८०० शब्द (फोटोसह)
- चुटके: १५० शब्द
- पाककृती / संकीर्ण माहिती: ३०० शब्द
- कविता: २० ओळी
- चित्रे / व्यंगचित्रे: उच्च प्रतीची डिजिटल प्रत

**मार्गदर्शक सूचना:**

- साहित्य स्वतःचे, मूळ मराठी भाषेत असावे आणि पूर्वप्रकाशित नसावे.
- अनुवादित किंवा रूपांतरित साहित्य असल्यास मूळ लेखकाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
- निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
- आवश्यकतेनुसार संपादकीय बदल करण्याचा अधिकार संपादकांकडे राखीव आहे.
- निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.
- लेखकांनी नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

**साहित्य पाठवण्याची ई-मेल:** vrutta@bmmonline.org

**ई-मेल विषय:** "Diwali Ank 2026"

**सूचना:**

1. मराठीत टायपिंग करण्यासाठी www.google.com/transliterate वापरता येईल व नंतर ते Word मध्ये सेव्ह करून ई-मेलद्वारे पाठवावे.

2. जर कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने वापरली जात असतील, तर ती अत्यंत सावधगिरीने वापरली जावीत; जेणेकरून मजकुराचा ओघ, मौलिकता आणि अस्सलपणा अबाधित राहील आणि त्यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही.

3. बहुतांश लेख हे लेखकाच्या स्वतःच्याच आवाजात रेकॉर्ड केले जातात. तुमचा लेख निवडल्यास, तुम्हाला एक रोमांचक संधी - 'व्हॉईस-ओव्हर आर्टिस्ट'प्रमाणे तुमचा स्वतःचा ऑडिओ रेकॉर्ड करा. यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती तुम्हाला पुरवली जाईल.

आपल्या उत्तम आणि वैविध्यपूर्ण साहित्याच्या प्रतीक्षेत,
आभारी आहोत,

**- बीएमएम वृत्त टीम**




AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com

# स्वप्न ते सत्य : बीएमएम २०२६ आता प्रत्यक्ष भेटीची वेळ!

अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपलेल्या बीएमएम२०२६ अधिवेशन उंबरठ्यावर उभे असताना, उत्साह, अभिमान आणि कृतज्ञता या सर्व भावना मनात एकाच वेळी दाटून येत आहेत. सिॲटल महाराष्ट्र मंडळ आणि बीएमएम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होत असलेले हे अधिवेशन केवळ एक सांस्कृतिक सोहळा नाही, तर जगभरातील मराठी बांधवांना एकत्र आणणारा आपल्या अस्मितेचा, परंपरेचा आणि अस्तित्वाचा भव्य उत्सव आहे. अनेक महिन्यांच्या नियोजनानंतर, हजारो तासांच्या अथक परिश्रमानंतर आणि शेकडो स्वयंसेवकांच्या समर्पित योगदानामुळे हे स्वप्न आता साकार होण्याच्या अगदी जवळ आले आहे.

या अधिवेशनामध्ये कला, साहित्य, संगीत, नाट्य, उद्योजकता, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि युवकांची ऊर्जा यांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळणार आहे. विविध पिढ्यांना जोडणारे, नव्या मैत्री निर्माण करणारे आणि मराठी संस्कृतीबद्दलचा अभिमान अधिक दृढ करणारे हे अधिवेशन प्रत्येक सहभागीच्या मनात कायमची आठवण निर्माण करेल, याचा मला विश्वास आहे.

या संपूर्ण प्रवासातील एक विशेष आणि प्रेरणादायी आठवण म्हणजे सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर (SCC) मिळविण्याचा संघर्ष. २०२४ मध्ये जेव्हा आम्ही सिॲटल येथे बीएमएम अधिवेशन आयोजित करण्याच्या शक्यतेवर गंभीरपणे चर्चा सुरू केली, तेव्हा सर्वात मोठा प्रश्न होता तो योग्य स्थळाच्या उपलब्धतेचा. अधिवेशनासाठी सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर आम्ही बघत होतो. मात्र सुरुवातीच्या संवादांमध्ये SCC कडून आम्हाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. त्यांचे स्पष्ट मत होते की कार्यक्रमाच्या फक्त १२ महिन्यांपूर्वीच ते अशा प्रकारच्या बुकिंगवर चर्चा करू शकतील. पण आमच्यासमोर एक वेगळेच आव्हान होते. बीएमएमला आम्हाला आधीच कळवायचे होते की सिॲटल महाराष्ट्र मंडळ हे अधिवेशन आयोजित करण्यास सक्षम आहे की नाही. त्यासाठी SCC कडून किमान उपलब्धतेची खात्री आवश्यक होती. आम्ही वारंवार संवाद साधत होतो, पण त्यावेळी कोणतीही बांधिलकी मिळत नव्हती. याच काळात आम्ही Visit Seattle सोबत चर्चा सुरू केली. त्यांच्या माध्यमातून SCC सोबतचा संवाद पुढे सरकू लागला. मात्र त्याबदल्यात एक मोठी अट समोर आली. हॉटेल रूम्सची ठोस बांधिलकी मिळाल्याशिवाय SCC ची उपलब्धता निश्चित होऊ शकणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले. त्या काळात असंख्य चर्चा, अनेक बैठका, सादरीकरणे, हॉटेल भागीदारांसोबतचे संवाद आणि बरीच संयमाची परीक्षा झाली. अनेकदा प्रश्न पडायचा, "हे खरंच शक्य होईल का?" पण आमच्या टीमने चिकाटी सोडली नाही. सातत्यपूर्ण पाठपुरावा, विश्वास आणि दृढ निश्चय यांच्या जोरावर अखेर SCC कडून उपलब्धतेची सकारात्मक पुष्टी मिळाली आणि सिॲटलमध्ये बीएमएम अधिवेशन करण्याचे स्वप्न वास्तवात उतरू लागले.

गेल्या काही महिन्यांत बीएमएम अधिवेशनाच्या तयारी दरम्यान अनेक अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळाले. त्यातला एक मजेशीर प्रसंग म्हणजे अतिथींसाठी लागणाऱ्या सोफा निवडीचा! काही स्वयंसेवकांसोबत आम्ही प्रत्यक्ष विक्रेत्याच्या गोदामात जाऊन विविध सोफे पाहिले. सुरुवातीला फक्त "सोफा फायनल करायचा" एवढाच विचार होता, पण पुढची काही तासं रंग, आकार, आरामदायकपणा आणि अर्थातच किंमत यावर चर्चा आणि घासाघीस करण्यात गेली. प्रत्येक जण स्वतःला तज्ज्ञ समजून मतं देत होता. कुणाला रंग महत्त्वाचा, कुणाला आराम, तर कुणाला बजेट! शेवटी विक्रेत्याशी इतक्या मेहनतीने वाटाघाटी केल्या की काही वेळाने त्यालाच वाटले असेल की बीएमएम अधिवेशनापेक्षा यांना सोफाच अधिक महत्त्वाचा आहे! 😄

अशाच अनेक छोट्या-मोठ्या किस्स्यांनी, असंख्य कॉफीच्या कपांनी, उशिरापर्यंत चाललेल्या मिटिंग्सनी आणि स्वयंसेवकांच्या उत्साहाने ही तयारी अधिक संस्मरणीय बनली आहे. आज मागे वळून पाहताना जाणवते की अधिवेशनाइतकाच सुंदर हा प्रवासदेखील राहिला आहे.

या यशस्वी वाटचालीत योगदान देणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाचे, समिती सदस्यांचे, प्रायोजकांचे, देणगीदारांचे आणि हितचिंतकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तुमच्या सहकार्याशिवाय हा प्रवास शक्य झाला नसता. विशेषतः सिॲटल परिसरातील मराठी समाजाने दाखविलेली एकजूट, उत्साह आणि बांधिलकी ही खरोखर प्रेरणादायी आहे. आज आपण सर्वजण एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याच्या उंबरठ्यावर आहोत. चला, एकत्र येऊया, आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अभिमानाने उत्सव साजरा करूया आणि बीएमएम अधिवेशन २०२६ ला एक अविस्मरणीय यशोगाथा बनवूया.

आपल्या सर्वांच्या स्वागतासाठी आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत.

जय महाराष्ट्र! आपला,

**- अपूर्व चिंचवडकर**, अध्यक्ष, सिॲटल महाराष्ट्र मंडळ (SMM)
आयोजक समिती, बीएमएम अधिवेशन २०२६ सिॲटल

## बीएमएम २०२६: संवाद: संयोजक (Convener) श्री. मोहित चिटणीस

**नमस्कार, बीएमएम २०२६ चे संयोजकपद स्वीकारण्याची प्रेरणा तुम्हाला कशातून मिळाली?**



बीएमएमसाठी मी २०१३ ते २०२४ बीएमएमच्या कार्यकारी समितीवर (EC) आणि विश्वस्त समितीवर (Board Of Trustees) मी काम केलं. २०१३ ते २०१७ मी बीएमएमचा कोषाध्यक्ष (Treasurer) होतो आणि २०१७ ते २०२४ मी बीएमएम विश्वस्त समितीचा सदस्य होतो. आणि त्यातले २०१९ ते २०२४ हे जवळजवळ साडेचार वर्ष मी विश्वस्त समितीचा प्रमुख (Chairperson) होतो. ह्या पाच टर्म्समधल्या चार टर्म्समध्ये मला बीएमएमकडून अधिवेशन समितीवर काम करायला मिळालं. त्यावेळी मला बीएमएमची अधिवेशनं खूप जवळून बघायला मिळाली . संयोजकाची (Convenor) भूमिका आणि जबाबदाऱ्या काय असतात , त्यांना काय काम करायला लागतं, हे मला खूप चांगलं समजलं. आणि त्यामुळे जेव्हा सिॲटलला बीएमएम अधिवेशन आलं, तेव्हा मी सिॲटल महाराष्ट्र मंडळाकडे माझा ह्या कामातला रस व्यक्त केला आणि सांगितलं की मला ह्या आपल्याकडच्या २२ व्या बीएमएमअधिवेशनाचं संयोजक म्हणून काम करायला खूप आवडेल.

**याआधीच्या संमेलनांच्या तुलनेत बीएमएम २०२६ वेगळे कशामुळे ठरणार आहे?**

ह्या अधिवेशनामध्ये आपल्याला उत्तर अमेरिकेचे भरपूर कार्यक्रम बघायला मिळतील. सर्वसाधारणपणे बीएमएमच्या अधिवेशनामध्ये भारतातील कर्यक्रमांवर खूप जोर असतो. ह्यावेळेस भारतातले दर्जेदार चार-पाच कार्यक्रम येत आहेत, बाकी सगळे उत्तर अमेरिकेचे कार्यक्रम आहेत. स्थानिक कलाकारांचे तोडीस तोड कार्यक्रम असणं हे एक नावीन्य राहील. उत्तर अमेरिकेच्या कार्यक्रमासाठी सुद्धा आम्हाला १४० प्रवेशिका (proposals) आल्या होत्या. त्यामुळे आम्ही खूप चांगले उत्कृष्ट कार्यक्रम निवडून, ते आम्ही बीएमएम २०२६ मध्ये सादर करणार आहोत. हा खूप वेगळा उपक्रम आहे की, भारतातल्या कार्यक्रमापेक्षा जवळजवळ पाच-सहा पट जास्त उत्तर अमेरिकेतले कार्यक्रम होतील. उत्तर अमेरिकेतील स्थानिक कलाकारांना प्राधान्य हा त्यातील मुख्य हेतू.

अजून एक वेगळेपण सांगायचं तर ह्या अधिवेशनामध्ये आम्ही भारतातल्या सहा आणि उत्तर अमेरिकेतल्या सहा स्त्रियांचा त्यांच्या असामान्य कारकिर्दीसाठी, त्यांनी केलेल्या विशेष समाजसेवेसाठी सत्कार करत आहोत. यातील भारतातील स्त्रियांचा आम्ही भारतात त्यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार करून आलो. उत्तर अमेरिकेतील ६ निवड झालेल्या स्त्रियांचा सत्कार आम्ही अधिवेशनामध्ये करू. याद्वारे आपल्या मराठी समाजालाही कळेल की अमेरिकेत रहात असताना आपल्याकडच्या या मराठी स्त्रियांनी त्यांच्या क्षेत्रात कशी भरारी घेतली आहे आणि कशी छान समाजसेवा अमेरिकेत राहून केलेली आहे.

**संमेलन संपल्यानंतर उपस्थितांच्या मनात कोणती भावना घेऊन ते परतावेत, अशी तुमची इच्छा आहे?**

बीएमएमला आलेल्या सर्व मराठी बांधवांनी घरी परतताना आनंददायी अनुभव आणि सुंदर स्मृती घेऊन जाव्यात, अशी आमची मनापासून इच्छा आहे. या अधिवेशनात दर्जेदार कार्यक्रम सादर केले जात आहेत. भारतातून आलेले निवडक, उच्च दर्जाचे कार्यक्रम तसेच उत्तर अमेरिकेतील नावीन्यपूर्ण आणि वेगळेपण जपणारे कार्यक्रम यांना आम्ही प्राधान्य दिलं आहे. सगळ्यांनी येथे छान अनुभव घ्यावा, हसत-खेळत परत जावं आणि आपल्या गावात जाऊन सिॲटलमधील उत्तम व्यवस्थापन, स्वयंसेवकांची मदत आणि आदरातिथ्य याबद्दल आवर्जून सांगावं, जेणेकरून जे यावेळी येऊ शकले नाहीत ते पुढच्या वेळी नक्की सहभागी होतील.

तसेच या अधिवेशनाच्या निमित्ताने पुढच्या पिढीला मराठी संस्कृती आणि भाषेची अधिक जवळून ओळख व्हावी, ती त्यांच्यात रुजावी आणि फुलावी, ही आमची अपेक्षा आहे.

**तुमच्या नेतृत्वशैलीत परंपरा आणि नावीन्य यांचा समतोल तुम्ही कसा साधता?**

"द फोक आख्यान" हा सुमारे ३३ कलाकारांचा भव्य कार्यक्रम आम्ही सादर करत आहोत. परंपरा आणि नावीन्य यांचा सुंदर संगम साधणारा हा कार्यक्रम मराठी लोकसंगीतावर आधारित असून यात तरुण कलाकारांचाही सक्रिय सहभाग आहे. तसेच भारतातून येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये पहिल्यांदाच युवा कलाकाराचा सहभाग असलेली स्वतंत्र कॉन्सर्ट संकल्पना राबवली जात आहे.

अधिवेशनाच्या नियोजनात आम्ही तंत्रज्ञानाचा, विशेषतः AI चा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. अधिवेशनाची वेबसाइटही अत्यंत व्यावसायिक आणि प्रभावीपणे विकसित करण्यात आली असून ती संपूर्ण नियोजनाचा आधुनिक दृष्टिकोन दर्शवते. तसेच B-Connect हा एक महत्त्वाचा व्यावसायिक उपक्रम आहे, ज्याद्वारे मराठी उद्योजक, व्यावसायिक आणि युवा पिढीला नेटवर्किंग, ज्ञानवाटप आणि सहकार्याची संधी मिळते.

आर्थिक नियोजनासाठी आम्ही पहिल्या दिवसापासूनच प्रोजेक्टेड P&L तयार केला, ज्यामुळे प्रत्येक टप्प्यावर आर्थिक स्थितीचा स्पष्ट अंदाज घेता आला आणि योग्य निर्णय घेणे सुलभ झाले. नोंदणीच्या आकडेवारीतूनही एक महत्त्वाचा बदल दिसून येतो, पूर्वीच्या अधिवेशनांमध्ये साठीच्या पुढील लोकांचा सहभाग अधिक दिसत असे, मात्र यंदा ३५ ते ५५ वयोगटातील सहभागींचे प्रमाण लक्षणीय वाढलेले दिसत आहे.

या सर्व उपक्रमांमधून आम्ही परंपरा जपत असताना बदल स्वीकारण्याची आणि नवीन पिढीला जोडण्याची आमची भूमिका स्पष्टपणे अधोरेखित केली आहे.

**या संपूर्ण प्रवासात तुम्हाला सर्वात जास्त समाधान कशातून मिळालं?**

दहा वर्षे सिॲटल महाराष्ट्र मंडळासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. आता सिॲटलमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (BMM) अधिवेशन आयोजित करण्याची संधी मिळणं, ही माझ्या मंडळातील प्रवासातली सर्वात मोठी समाधानाची गोष्ट आहे. त्याहूनही मोठा सन्मान म्हणजे सिॲटल महाराष्ट्र मंडळ (SMM) ने माझ्यावर विश्वास ठेवून या अधिवेशनाच्या संयोजकपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. SMM ही माझ्यासाठी केवळ एक संस्था नाही, तर माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. १९९३ मध्ये SMM ची स्थापना करणाऱ्या १४–१५ जणांमध्ये मीही एक होतो. त्यामुळे या संस्थेशी माझं अतूट नातं आहे आणि ही जबाबदारी स्वीकारताना मला प्रचंड अभिमान आणि समाधान वाटतं.

**अधिवेशनाला उपस्थित राहणाऱ्यांनी सिॲटल शहराचा कोणता विशेष अनुभव आवर्जून घ्यावा असे तुम्हाला वाटते?**

अधिवेशनाचा अनुभव तर सर्वजण नक्कीच घेणार आहेतच, पण सिॲटलचा अनुभवही तेवढाच खास आहे. ऑगस्ट महिन्यात सिॲटलचं हवामान अतिशय आल्हाददायक असतं, त्यामुळे बाहेर फिरण्यासाठी आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी हा सर्वोत्तम काळ आहे. सिॲटल हे अलास्का क्रूझचं प्रवेशद्वार मानलं जातं. त्यामुळे वेळ असेल तर एक आठवड्याचा अलास्का क्रूझ नक्की अनुभवावा. अधिवेशनानंतर संध्याकाळीही अनेक क्रूझ उपलब्ध असतात, त्यामुळे ही एक उत्तम संधी आहे. सिॲटलचं वैशिष्ट्य म्हणजे चारही दिशांना दिसणाऱ्या बर्फाच्छादित पर्वतरांगा. दक्षिणेला माउंट रेनिअर आणि माउंट सेंट हेलन्स, उत्तरेला माउंट बेकर, पूर्वेला कॅस्केड रेंज आणि पश्चिमेला ऑलिम्पिक रेंज. हे निसर्गसौंदर्य खरोखरच अद्वितीय आहे. अमेरिकेमध्ये काही कोलोरॅडो आणि अलास्का अशी काही राज्ये सोडली तर इतर ठिकाणी हिमाच्छादित डोंगर वर्षभर पाहायला मिळत नाहीत. याशिवाय रॉस लेक, डायब्लो लेक, सुंदर ट्रेक्स, सिॲटल डाउनटाउन, चिहुली ग्लास गार्डन अशी अनेक ठिकाणं अनुभवण्यासारखी आहेत.

अधिवेशनाचा आनंद तर तुम्ही घेणारच आहात, पण सिॲटलच्या निसर्गाचा आणि आसपासच्या अनुभवांचा आस्वाद घेण्यासाठी थोडा अधिक वेळ नक्की ठेवा.

**तुमच्या नजरेत बीएमएम २०२६ म्हणजे नेमके काय? एका वाक्यात सांगाल का?**

बीएमएम2026 हे सिॲटलला होणारे बीएमएमचे दुसरे अधिवेशन. त्या दृष्टीने मी म्हणेन बीएमएम २०२६ म्हणजे २००७ च्या यशस्वी अधिवेशानानंतर पुन्हा एकदा सिॲटलमध्ये मराठी समाजाला एकत्र आणून, संस्कृती, नाती आणि आनंदाचा अविस्मरणीय उत्सव साकारण्याची आमच्यासाठी लाभलेली मोठी संधी.

**जपूया संस्कृती विणूया नाती!!**

वेबसाईट: bmmseattle2026.org/

मुलाखतकार आणि शब्दांकन: **अश्विनी क्षीरसागर,**
बीएमएम २०२६ समिती



## आमचा डिजिटल प्रवास

या प्रवासाची गोष्ट थोडी वेगळी आहे... 🙂

हा आहे आमचा डिजिटल प्रवास जुलै २०२४ मध्ये सुरू झालेला.

"बीएमएम २०२६चं अधिकृत संकेतस्थळ तयार करायचं आहे!" या अपेक्षेपासून सुरू झालेला हा प्रवास आज येणाऱ्या उपस्थितांना, देणगीदारांना, जाहिरातदारांना, प्रयोजकांना आणि जगातील सगळ्याच मराठी बांधवांना माहिती, नोंदणी, कार्यक्रम, अपडेट्स देण्यापर्यंत आणि अधिवेशनाशी जोडणारे अधिकृत डिजिटल व्यासपीठ बनण्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. प्रत्येक टप्प्यावर संकेतस्थळ बदलत गेलं, विकसित होत गेलं.

प्रत्येक संकेतस्थळाची एक गोष्ट असते. तिचा काही भाग code मध्ये लिहिला जातो, तर उरलेली ती घडवणारी माणसं आपल्या अनुभवांनी लिहितात. बीएमएम २०२६च्या संकेतस्थळाचा प्रवासही असाच काहीसा आहे.

**सुरुवात Inhouse:** सुरुवातीला सगळं आमचंच होत. छोटीशी टीम, पण मोठी स्वप्नं!

वेबसाईटची संकल्पना, Design, Development, Testing, Deployment सगळं आम्ही स्वतः केलं. अनेक रात्री जागून बग्ज फिक्स केले, नवीन फिचर्स तयार केली, प्रत्येक छोट्या तपशीलावर काम केलं. तेव्हा वेबसाईट हा आमच्यासाठी फक्त एक प्रोजेक्ट नव्हता, तर आमचं स्वतःचं स्वप्न होतं.

बीएमएमचे अध्यक्ष **श्री. प्रसाद पानवळकर** यांच्या शुभहस्ते एप्रिल २०२५ मध्ये बीएमएम २०२६च्या अधिकृत संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. त्या दिवशी सर्वांनी वेबसाईट पाहिली; पण तिच्या मागे किती चहाचे / कॉफीचे कप्स किती code आणि किती बग्ज फिक्स दडले होते, हे मात्र आमच्या टीमलाच माहीत! 😄

**मधला काळ - ती दीड वर्षे :** ती दीड वर्षे... शिकण्याचा, समस्या सोडवण्याचा, अनुभव घेण्याचा काळ होता! वेबसाईट म्हणजे फक्त code नसून ती एक जबाबदारी असते. प्रत्येक गोष्ट आम्ही स्वतःच हॅन्डल केली. प्रत्येक अपडेट, प्रत्येक बदलाची विनंती (Change Request), प्रत्येक अडचण आणि प्रत्येक छोट्या-मोठ्या समस्येला आम्ही स्वतः सामोरे गेलो. "फक्त दोन मिनिटांचं काम आहे..." अशी सुरुवात होणारी विनंती... आणि मग त्यामागची दोन तासांची चर्चा किंवा कोडींगचे काम 😄! हळूहळू ही वेबसाइट आमच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग बनली. प्रत्येक सुधारणा आणि प्रत्येक आव्हानाने आम्हाला अधिक सक्षम, अधिक आत्मविश्वासू आणि अधिक अनुभवी बनवलं

**आत्ताचा टप्पा - VSS बरोबर:** आणि आता तिचा मेन्टेनन्स एप्रिल २०२६ पासून, VSS करत आहे. हे सोडून देणं नाही, हे पुढे सोपवणं आहे. जसे आपल्या लहान बाळांना आपण चांगल्या शाळेत टाकतो, तसेच! हा प्रवास संपला नाही, फक्त त्याचा पुढचा टप्पा सुरू झाला आहे. कारण चांगल्या गोष्टी टिकवण्यासाठी कधी कधी हात बदलावे लागतात, पण विचार तोच राहतो! बीएमएम २०२६ची अधिकृत वेबसाइट आता अधिक सुधारित, सुलभ आणि आकर्षक स्वरूपात उपलब्ध आहे. 'शिका आणि कमवा (Learn and Earn)' या तत्त्वावर कार्य करणाऱ्या पुण्यातील विद्यार्थी सहाय्यक समितीने (VSS) पुढील डेव्हलमेंट आणि मेंटेनन्सची जबाबदारी उचलली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पावर काम करण्याची संधी, कौशल्य विकास आणि आर्थिक आधार मिळाला. बीएमएमच्या माध्यमातून तरुणांना सक्षम करण्याचा हा एक छोटासा पण अर्थपूर्ण प्रयत्न आहे.

VSS टीमने अत्यंत व्यावसायिक आणि समर्पित पद्धतीने वेबसाईटला नवं रूप दिलं आहे. त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार!

आज या संकेतस्थळाच्या माध्यमातून अधिवेशनाची प्रत्येक महत्त्वाची माहिती तुमच्यापर्यंत वेळेवर आणि व्यवस्थित पोहोचते आहे, हेच आमच्या या डिजिटल प्रवासाचं खरं यश आहे आणि आमची हीच खरी कमाई आहे. बीएमएम २०२६ सांकेतस्थळाला नक्की भेट द्या. bmmseattle2026.org/

- **अंबर रसाळ,** वेबटीम प्रमुख, बीएमएम२०२६ समिती

बीएमएम२०२६ सिॲटल वेब टीम



VSS टीम - ओंकार, शुभम, हेमंत, जय



## बीएमएम २०२६: संवाद: मान्यवर वक्ते डॉ. संजय उपाध्ये

**डॉ. संजय उपाध्ये यांची थोडक्यात ओळख:**

**डॉ. संजय गोविंद उपाध्ये** हे लेखक, कवी, जादूगार, वक्ते, विचारवंत आणि शैक्षणिक मार्गदर्शक म्हणून परिचित आहेत. सध्या ते एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथे मार्गदर्शक आणि मुख्य सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. साहित्य, कविता, नाट्य, पटकथा लेखन आणि रंगभूमी या क्षेत्रांत त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. त्यांनी पीएचडीसाठी प्रबंध म्हणून 'विनायक विजय' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ५००० ओळींचे काव्य चरित्र रचले. 'गप्पाष्टक' आणि 'मन करा रे प्रसन्न' हे त्यांचे विशेष गाजलेले कार्यक्रम आहेत. गप्पाष्टक कार्यक्रमाचे १५ देशांमध्ये १,५०० हून अधिक प्रयोग झाले आहेत.



यंदाच्या बीएमएम २०२६ सिॲटल अधिवेशनात ते दोन वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर करणार आहेत.

🎭 **उत्तररंग - ६ ऑगस्ट, २०२६**

**मस्त बिनधास्त चोवीस तास -** ताणतणाव विसरून आनंदी आणि बिनधास्त आयुष्य जगण्याचा हलकाफुलका प्रवास.

🏠 **मुख्य अधिवेशन- घर करा रे प्रसन्न** – संवाद, समजूतदारपणा आणि प्रेमातून घर अधिक आनंदी व प्रसन्न कसे बनवावे, याचा हृदयस्पर्शी वेध.

विनोद, विचार आणि जीवनानुभवांचा सुंदर संगम असलेले हे दोन्ही कार्यक्रम रसिकांसाठी नक्कीच अविस्मरणीय ठरतील.

### डॉ. संजय उपाध्येंशी संवाद

**बँकर ते प्रवचनकार हा प्रवास कसा घडला?"**

हा प्रवास मी ठरवून केलेला नव्हता; तो हळूहळू घडत गेला. १९७९ मध्ये कॅनरा बँकेत नोकरीला सुरुवात केली आणि तब्बल १६ वर्षे बँकेत काम केलं. पण त्याचबरोबर जादूचे प्रयोग, चित्रकला, वाचन, क्रिकेट, नाटक अशा अनेक आवडी जोपासत राहिलो. जादूच्या प्रयोगांमुळे स्टेजची भीती गेली आणि निवेदनाची संधी मिळाली.

एका कार्यक्रमात ऐनवेळी निवेदक अनुपस्थित होता. मी सहज निवेदन केलं आणि ते लोकांना इतकं आवडलं की पुढे अनेक कार्यक्रम मिळू लागले. त्यातूनच 'गप्पाष्टक'चा जन्म झाला. १९९५ मध्ये कार्यक्रमांची संख्या इतकी वाढली की बँकेची नोकरी सोडून पूर्णवेळ या क्षेत्रात आलो. पुढे लक्षात आलं की बदलत्या पिढीशी जोडणारा, सर्वांना सहज समजणारा कार्यक्रम हवा. त्यातून 'मन करा रे प्रसन्न' हा कार्यक्रम जन्माला आला. आजही माझं बोलणं स्क्रिप्टवर नाही, तर त्या क्षणी श्रोत्यांशी होणाऱ्या संवादावर उभं असतं. हा प्रवास माझ्या नियोजनापेक्षा परमेश्वराच्या कृपेने आणि लोकांच्या प्रेमाने घडत गेला, असंच मी मानतो.

**तुमच्या आयुष्यातले विविध टप्पे तुम्हाला घडवत गेले. यापैकी कोणता टप्पा तुम्हाला सर्वाधिक घडवणारा ठरला?**

माझ्या आयुष्यात अनेक टप्पे आले, पण वक्ता म्हणून मला घडवलं ते 'गप्पाष्टक' या कार्यक्रमाने.

आजही मिनियापोलिसमधला एक प्रसंग विसरता येत नाही. कार्यक्रम संपल्यानंतर प्रेक्षकांनी आयोजकांना विचारलं,"हे पुन्हा बोलतील का?" त्यांनी हॉलची वेळ वाढवली. मी आणखी दोन तास पूर्णपणे नवीन विषयांवर बोललो. एखाद्या दोन तासांच्या कार्यक्रमाला "वन्स मोअर" मिळणं हा माझ्यासाठी अविस्मरणीय क्षण होता.

माझ्या प्रवासात एक गोष्ट कायम राहिली—मी कधीच नवीन संधीला "नाही" म्हटलं नाही. जादू, निवेदन, लेखन, गाणी, प्रवचनं, नाटकं किंवा मंगलाष्टक,जे काही समोर आलं, ते मनापासून स्वीकारलं. प्रत्येक अनुभवाने मला समृद्ध केलं. ई-टीव्हीवर भगवद्गीतेवरील हजाराहून अधिक भाग सादर केले, गीतेवर २५ गाणी लिहिली, स्वातंत्र्यवीर सावरकरांवर पीएच.डी. केली. या सगळ्याचा परिणाम माझ्या विचारांवर आणि बोलण्यावर झाला. पण या सगळ्याचं श्रेय मी स्वतःला देत नाही. माझा एकच विश्वास आहे - "I am a trustee of my ability, not the owner of my ability." माझी क्षमता ही माझी मालमत्ता नसून माझ्यावर सोपवलेली जबाबदारी आहे. म्हणूनच स्टेजवर मी कलाकार असतो; स्टेजच्या बाहेर मात्र तुमच्यासारखाच एक कार्यकर्ता आणि स्वयंसेवक. कदाचित यामुळेच आजही लोकांशी जोडले जाण्याचा आणि काम करण्याचा आनंद तितकाच ताजा आहे.

**तुमच्या कार्यक्रमांमध्ये विनोद, जादू, अध्यात्म आणि संवाद यांचा सुंदर मिलाफ दिसतो. हा समतोल तुम्ही कसा साधता?**

माझ्यासाठी जादू ही फक्त करमणूक नाही; ती संवादाचं माध्यम आहे. जादूतील illusion वापरून मी अध्यात्मातील अनेक संकल्पना सहज समजावून सांगू शकतो. दिवस-रात्र, सुख-दुःख, जीवनातील समतोल हे सगळं एखाद्या छोट्या प्रयोगातूनही सांगता येतं.

माझा नेहमी प्रयत्न असतो की, समोरच्या श्रोत्यांच्या भाषेत आणि त्यांच्या पातळीवर जाऊन संवाद साधावा. कोणता शब्द वापरायचा, कोणतं उदाहरण द्यायचं, हे श्रोत्यांनुसार ठरतं. लहान मुलं असतील तर गाणी आणि जादू, तरुण असतील तर विनोद आणि मिमिक्री, ज्येष्ठ असतील तर ज्ञानेश्वरी, भगवद्गीता किंवा अध्यात्म प्रत्येकाला आपलंसं वाटेल असा संवाद घडवण्याचा प्रयत्न असतो.

यामागे एकच भूमिका आहे मी लोकांना प्रभावित करण्यासाठी बोलत नाही; त्यांच्याशी जोडण्यासाठी बोलतो. मी स्वतःला मोठा कलाकार समजून कधीच वागत नाही. आजही कुठेही गेलो की आधी माणूस म्हणून जातो, कलाकार नंतर. मला प्रसिद्धीपेक्षा आपलेपणा महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे जाहिरातीत किंवा वागण्यात स्वतःचं मोठेपण मिरवण्याची गरज मला कधी वाटली नाही. लोकांनी कार्यक्रम संपल्यावर, "आज खूप छान संवाद झाला," असं म्हटलं, तर तेच माझ्यासाठी सर्वात मोठं यश आहे.

**तुमच्या प्रवासात असा एखादा अनुभव आहे का, ज्याने आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला?**

असे अनेक अनुभव आहेत, त्यातील दोन प्रसंगांचा मी नक्की उल्लेख करेन.

पहिला म्हणजे अहिल्यानगरमधील 'सावली' या अनाथाश्रमाचा. निधी संकलनासाठी मी विनामूल्य कार्यक्रम केला होता. कार्यक्रमादरम्यान कळलं की, ज्या जागेत अनाथाश्रम चालत होता ती विकली जाणार होती आणि २३ मुलांच्या डोक्यावरचं छप्पर जाण्याची वेळ आली होती. त्या क्षणी फक्त कार्यक्रम करून निघून जाण्यापेक्षा काहीतरी करावं असं वाटलं. मित्रांची मदत, ओळखी आणि योग्य वेळी घेतलेले निर्णय यामुळे ती जागा वाचवता आली. आज त्या ठिकाणी अनेक मुलांचं आयुष्य घडत आहे. त्या दिवशी जाणवलं, ओळखी असण्यापेक्षा त्या योग्य कारणासाठी वापरणं अधिक महत्त्वाचं असतं.

दुसरा प्रसंग एका दिव्यांग मुलीचा. ती माझे रेडिओ कार्यक्रम नियमित ऐकायची आणि मला "बाबा" म्हणायची. एक दिवस तिची भेट घेतली. तिची परिस्थिती पाहिल्यावर वाटलं, आपण फक्त बोलून उपयोग नाही; शक्य असेल तेवढी मदतही केली पाहिजे. त्या भेटीने मला पुन्हा जाणवलं की, समाजात आपल्यापेक्षा खूप मोठी आव्हानं झेलणारी माणसं आहेत. आजपर्यंत सामाजिक कार्यासाठी काही आर्थिक योगदान देता आलं, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे या अनुभवांनी मला कायम जमिनीवर ठेवले. कितीही यश मिळालं तरी माणुसकी आणि संवेदनशीलता जपणं हेच खरं यश आहे.

**गप्पाष्टक हा तुमच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा, त्याचा जन्म कसा झाला?**

हा कार्यक्रम पूर्णपणे नियोजित नव्हता, तो घडत गेला. मी त्यावेळी कॅनरा बँकेत नोकरी करत होतो आणि सोबतच स्टेजवर लहान-मोठ्या गोष्टी करत होतो- जादूचे प्रयोग, निवेदन, आणि काही सांस्कृतिक कार्यक्रम. रोह्यात एक कार्यक्रम झाला, तो माझ्या आयुष्यात टर्निंग पॉईंट ठरला. माझा मित्र श्री. विजय मागीकर याच्यामुळे खरंतर गप्पाष्टक सुरु झाला. तो मला मुंबईहून रोह्याला घेऊन गेला नसता तर मी कदाचित आज बँकेतील निवृत्त अधिकारी असतो. रोह्याच्या कार्यक्रमात मी कोणत्याही स्क्रिप्टशिवाय, सहज बोलत गेलो. काव्य, विनोद, अनुभव, समाजभान सगळं एकत्र आलं. लोकांचा प्रतिसाद खूप प्रचंड होता. त्या एका अनुभवातून मला जाणवलं की "मनमोकळ्या गप्पा" हा एक स्वतंत्र फॉरमॅट होऊ शकतो. मग मी त्याचं नाव ठेवलं 'गप्पाष्टक'. "खडाष्टक" म्हणजे दोघांमधील तीव्र मतभेद किंवा हाडवैर, पण मी त्याला सकारात्मक वळण देऊन गप्पाष्टक केलं, म्हणजे आठ विषयांवर मनमोकळ्या गप्पा. त्या आठ विषयांत साहित्य, काव्य, समाज, धर्म, विनोद, संगीत. असं ते गप्पांचं अष्टक.

त्याच दिवसापासून हेच माझं ओळखपत्र बनलं आणि मग हळूहळू बँकेची नोकरी मागे पडत गेली आणि गप्पाष्टक पुढे येत गेलं. 'गप्पाष्टक' या कार्यक्रमाचे १५ देशांमध्ये १,५०० हून अधिक प्रयोग सादर झाले आहेत.

**'मन करा रे प्रसन्न' हा तुमचा अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम आहे. मग 'घर करा रे प्रसन्न' हा नवा कार्यक्रम करण्यामागची प्रेरणा काय होती? या दोन्ही कार्यक्रमांमध्ये नेमका काय फरक आहे?**

खरं सांगायचं तर हे दोन्ही कार्यक्रम एकाच विचाराची दोन रूपं आहेत. 'मन करा रे प्रसन्न' हा व्यक्तीच्या मनाशी संवाद साधणारा कार्यक्रम आहे. पण एकदा एका कार्यक्रमासाठी बिल्डर प्रायोजक होता. तेव्हा सहज विचार आला मन प्रसन्न असणं जितकं महत्त्वाचं, तितकंच घर

प्रसन्न असणंही महत्त्वाचं.,आणि बिल्डरचा धंदा जर घर बांधायचा आहे. तर मला वाटलं की, हे सोयीचं जाईल तिथून 'घर करा रे प्रसन्न' या कार्यक्रमाचा जन्म झाला. 'घर' म्हटलं की फक्त चार भिंती नव्हेत; त्यात पती-पत्नीचं नातं, पालक आणि मुलं, भावंडं, संवाद, मतभेद आणि समजूत हे सगळं आलं. आजच्या धावपळीच्या जीवनात मतभेद होणं स्वाभाविक आहे; पण मतभेदांचं मनभेदात रूपांतर होता कामा नये. विसंवादाचं विघटनात रूपांतर होऊ नये, हा या कार्यक्रमाचा मुख्य संदेश आहे. मी समुपदेशन करताना एक गोष्ट नेहमी सांगतो असा कोणताही प्रश्न नसतो ज्यावर मार्ग सापडू शकत नाही. फक्त तो योग्य पद्धतीने समजून घ्यावा लागतो. हेच मी विनोद, किस्से आणि दैनंदिन आयुष्यातील उदाहरणांमधून मांडतो. उदाहरणार्थ, मी गंमतीने म्हणतो "पूर्वी घरांना उंबरठे असायचे. बेडरूममधला प्रश्न बेडरूममध्येच राहायचा. आता उंबरठे नाहीत, त्यामुळे तोच प्रश्न हॉलमध्ये, किचनमध्ये आणि शेवटी शेजाऱ्यांपर्यंत पोहोचतो!"

लोक हसतात, पण त्यामागचा संदेश लगेच पोहोचतो. माझा विश्वास आहे की प्रत्येक नात्याचा पाया संवाद आहे. म्हणूनच श्रीकृष्णाने भगवद्गीतेत उपदेश केला नाही, तर संवाद केला. नाती टिकवायची असतील तर संवाद, समजूत आणि कधी कधी 'लेट इट गो' करण्याची कला शिकावी लागते. हाच 'घर करा रे प्रसन्न'चा गाभा आहे.

**आज सोशल मीडियाच्या युगात माणसं अधिक जोडली गेली आहेत की अधिक एकटी पडली आहेत?**

माझ्या मते प्रश्न सोशल मीडियाचा नाही; प्रश्न संवादाचा आहे. आपण मोबाईलवर बोलतो की समोरासमोर, यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे आपण काय बोलतो आणि कसं बोलतो. तंत्रज्ञान हे फक्त माध्यम आहे; नाती जोडायची की तोडायची, हे आपल्या संवादावर अवलंबून असतं. ज्ञानेश्वर माउली पसायदानात म्हणतात, " बोलते जे अर्णव पीयूषाचे." म्हणजे आपल्या शब्दांत अमृतासारखा गोडवा असावा. तो असेल, तर मोबाईलवरचा संवादही मनापर्यंत पोहोचतो.

आजचं तंत्रज्ञान टाळणं शक्य नाही. प्रश्न एवढाच आहे की, आपण त्यांचा उपयोग करतो की त्यांचे गुलाम होतो. मला "उपयोग"पेक्षा "विनियोग" हा शब्द अधिक आवडतो. योग्य गोष्टीसाठी योग्य साधन वापरणं, हीच खरी कला आहे.

पण एक गोष्ट मात्र चिंतेची वाटते, ऐकण्याची सवय कमी होत चालली आहे. आपण सगळे बोलतो; पण ऐकणारे कमी झालो आहोत. ऐकणं म्हणजे फक्त शब्द कानावर पडणं नव्हे; तर समोरच्याला समजून घेणं. संवाद तेव्हाच घडतो, जेव्हा दोघेही एकमेकांना मनापासून ऐकतात. म्हणूनच तंत्रज्ञान बदलत राहील, सोशल मीडिया बदलत राहील; पण संवादातला आपुलकीचा सूर आणि ऐकण्याची वृत्ती जपली, तर नातीही टिकतील आणि माणुसकीही. माझ्या मते नाती तुटण्याचं मुख्य कारण म्हणजे प्रत्येक जण म्हणतो, "ही तुझी चूक" किंवा "हा तुझा प्रश्न." पण लग्नानंतर किंवा कुटुंबात ‘तुझा प्रश्न’आणि ‘माझा प्रश्न’ असं काही नसतं; तो "आपला प्रश्न" असतो. ही भावना आली की नातं बदलायला सुरुवात होते. विश्वासही तितकाच महत्त्वाचा. नातं म्हणजे मालकी हक्क नव्हे; तर एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर. समोरच्याचं स्वातंत्र्य, गुण आणि स्वप्नं जपणं, हेही प्रेमाचंच रूप आहे. आणि मी नेहमी एक गंमत सांगतो 'Adjust' चं स्पेलिंग माझ्यासाठी थोडं वेगळं आहे. Adjust is ADD JUST

जे न्याय्य आहे ते नात्यात वाढवत राहा. समजूत, संवाद, विश्वास आणि थोडंसं सोडून देण्याची तयारी असेल, तर नाती सहज फुलतात. शेवटी, घर भिंतींनी नाही, तर माणसांनी आणि त्यांच्या नात्यांनी प्रसन्न होतं. मतभेद असू द्या, पण मनभेद होऊ देऊ नका.

**बीएमएम २०२६ साठी घर करा रे प्रसन्न हा विषय निवडण्यामागे काय विचार होते?**

सुरुवातीला विषय ठरलेला नव्हता. मी आयोजकांना म्हटलं होतं, "तुम्ही विषय सुचवा; मी कोणत्याही विषयावर बोलू शकतो." पण जेव्हा या कार्यक्रमाला कोटीभास्कर यांची प्रायोजक म्हणून साथ मिळाली, तेव्हा त्यांच्या कामाशी घर या संकल्पनेशी जुळणारा विषय मनात आला.

त्यात मला आणखी एक गोष्ट जाणवली. BMM असो, महाराष्ट्र मंडळ असो किंवा सिॲटलची अधिवेशनाची आयोजक समिती, हे सगळं एका मोठ्या कुटुंबासारखंच आहे. घर हा शब्द केवळ चार भिंतींचा नाही; तो नाती, आपुलकी, सहकार्य आणि मनःशांती यांचा आहे. म्हणून हा विषय अनेक स्तरांवर जोडता आला.

**घर प्रसन्न ठेवणं हे अनेकांना कठीण का वाटतं? हा विषय मंचावरून सादर करण्याची गरज का भासते? खरंच परिस्थिती इतकी बदलली आहे का की घरातलं समाधान टिकवणं अवघड झालं आहे?**

हो, आज घर प्रसन्न ठेवणं कठीण वाटतं कारण माणसं स्वतःच्या ‘व्हर्च्युअल इमेज’ मध्ये जगतात. घरी आल्यानंतरही ती आपली व्यावसायिक ओळख (CA, executive, etc.) सोडत नाहीत आणि नवरा, वडील, भाऊ अशा भूमिका बदलत नाहीत. त्यामुळे घरात अपेक्षित असलेली लवचिकता आणि कम्पॅटिबिलिटी कमी होते.

प्रत्येकजण एकच मुखवटा घेऊन वागतो, त्यामुळे नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. याशिवाय परदेशात किंवा विविध पार्श्वभूमीत वाढलेल्या कुटुंबांमध्ये सवयी, संस्कृती आणि अपेक्षा वेगळ्या असल्याने गैरसमज वाढतात. म्हणून 'घर प्रसन्न ठेवणं' हा संवाद, समजूतदारपणा आणि भूमिका बदलण्याच्या क्षमतेचा विषय आहे आणि म्हणूनच तो आज स्टेजवर मांडणं आवश्यक झालं आहे.

Art of Living इतकीच जास्त गरज आहे 'Art of Leaving' ची. Ego सोडणं, भूमिका घरी आल्यावर सोडणं, आणि अपेक्षा कमी करणं. घरी आल्यानंतर "मी कोण आहे" हे विसरून "मी कोणासाठी आहे" हे लक्षात ठेवायचं. मुलं, कुटुंब यांच्यासोबत title नाही तर warmth घेऊन यायचं. लोकांना हे कठीण वाटतं कारण आपण role सोडत नाही, office मधला ego, control, vocabulary घरीही चालू राहतो. त्यामुळे moment miss होतो. मोबाईलप्रमाणे प्रत्येकाचं कॉन्फिगरेशन वेगळं असतं. आयफोनमध्ये अँड्रॉइड चालत नाही, तसं माणसांमध्येही होतं. पण नात्यांमध्ये "मी बदलणार नाही" अशी भूमिका चालत नाही. Leaving मध्ये सर्वात मोठं काय सोडायचं? तुलना, ego आणि unnecessary seriousness. कधी कधी छोट्या गोष्टींसाठी "right असणं" सोडणं जास्त महत्त्वाचं असतं. आयुष्य जगण्यापेक्षा ते हलकं करणं महत्त्वाचं आहे, जे अडथळे आहेत ते सोडले की खरं living आपोआप सुरू होतं.

**परदेशात राहणाऱ्या मराठी कुटुंबांसाठी हा विषय अधिक महत्त्वाचा वाटतो का?**

निश्चितच. दोन पिढ्यांचं राहणीमान, विचार, सवयी वेगळ्या असतात. भारतातून आलेल्या आई-वडिलांच्या सवयी आणि अमेरिकेत वाढलेल्या मुलांची जीवनशैली यात फरक असतो. अशा वेळी प्रश्न "कोण बरोबर?" हा नसतो. प्रश्न असतो "आपण एकमेकांना किती समजून घेतो?" संवाद आणि परस्परांना समजून घेण्याची तयारी असेल तर घर प्रसन्न राहतं.

**तुमच्या भाषणातून लोकांनी काय घेऊन जावं, अशी अपेक्षा आहे?**

मी उपदेश करणार नाही. मी गोष्टी, उदाहरणं आणि विनोद यांच्या माध्यमातून विचार मांडणार आहे. माझा विश्वास असा आहे की माणूस हसत असताना त्याचं मन सर्वात जास्त खुलं असतं. म्हणून आधी हसवायचं आणि मग विचार करायला लावायचं.

**बीएमएम २०२६ ला येणाऱ्या रसिकांसाठी काही संदेश?**

संदेश देण्यापेक्षा मी त्यांच्याकडून शिकायला येतोय. परदेशात राहूनही मराठी भाषा, संस्कृती आणि नाती जपण्याचं जे काम बीएमएम (बृहन्महाराष्ट्र मंडळ) आणि स्थानिक महाराष्ट्र मंडळं करत आहेत, ते प्रेरणादायी आहे. एकच सांगेन "अवघे लोक मेळवावे." एकत्र राहूया, एकमेकांना जोडूया आणि ही आपुलकी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवूया.

## RAPID FIRE

**'आनंद' या शब्दाची एका शब्दात काय व्याख्या तुम्ही सांगू शकाल?** निर्माण करायची गोष्ट. किंवा मला मिळणारा यापेक्षा माझ्याकडनं बाहेर जाणारा

**यश?** क्षणापुरतं समाधान आणि मग पुढच्या प्रवासाची सुरुवात.

**'कुटुंब' म्हटलं की तुमच्या मनात पहिला कोणता शब्द येतो?** आई.

**तुमचं सगळ्यात आवडतं पुस्तक कोणतं?** ज्ञानेश्वरी. आणि अर्थातच भगवद्गीता, तुकारामांची गाथा.

**आवडते संत?** संत तुकाराम. त्यांच्या अभंगांमधून दैनंदिन आयुष्यासाठी मार्गदर्शन मिळतं. संत ज्ञानेश्वर तर आवडते आहेतच.

**आवडते विनोदकार?** पु. ल. देशपांडे. छोट्या प्रसंगातून मोठं तत्त्वज्ञान मांडण्याची त्यांची शैली मला खूप आवडते. अगदी कॉमन टॉपिक घ्यायचा आणि त्यातून मोठं तत्त्वज्ञान मांडायचं.

**तुमचं व्यक्तिमत्त्व इतकं बहुआयामी आहे, तरी असं कुठलं क्षेत्र आहे का जे तुम्हाला अजूनही खुणावतंय?** गाणं!

मी पोवाडा म्हणतो, कोळीगीत, लोकसंगीत म्हणतो, पण शास्त्रीय किंवा भावगीताचं शिक्षण घ्यायची इच्छा अजूनही आहे.

मुलाखतकार आणि शब्दांकन: **अश्विनी क्षीरसागर**
बीएमएम २०२६ समिती



## बीएमएम २०२६: संवाद: मान्यवर वक्ते - इतिहास संशोधक आणि अभ्यासक श्री. निलेश ओक

**त्यांची थोडक्यात ओळख:** **श्री. निलेश नीळकंठ ओक** हे भारतीय लेखक, संशोधक आणि व्याख्याते असून रामायण व महाभारताच्या कालनिर्णयावरील संशोधनासाठी विशेष ओळखले जातात. प्राचीन भारतीय इतिहासाचा अभ्यास करताना त्यांनी खगोलशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, भूगर्भशास्त्र आणि अनुवंशशास्त्र यांसारख्या आधुनिक विज्ञानांचा उपयोग केला आहे. प्राचीन ग्रंथांमधील खगोलशास्त्रीय संदर्भांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विश्लेषण करून त्यांनी घटनांचा काल निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या संशोधनानुसार महाभारत युद्ध इ.स.पूर्व ५५६१ मध्ये, तर रामायणकालीन घटना इ.स.पूर्व १२२०९ च्या सुमारास घडल्या. त्यांची प्रमुख पुस्तके When Did the Mahabharata War Happen?, The Historic Rama, Bhishma Nirvana तसेच मराठीतील प्राचीन भारतीय खगोलविज्ञान आणि ऐतिहासिक राम ही आहेत. देश-विदेशात व्याख्याने देणारे निलेश ओक TEDx, एबीपी माझा – माझा कट्टा आणि विविध मराठी-इंग्रजी माध्यमांवरील चर्चांमधूनही परिचित आहेत. बीएमएम २०२६ अधिवेशनात ते “फक्त भारतालाच इतिहास का आहे?” या वैशिष्ट्यपूर्ण विषयावर आपले विचार मांडणार आहेत.




**आपण अभियंता म्हणून कारकीर्द सुरू केली. केमिकल इंजिनिअरिंग, मग एमबीए आणि नंतर कॉर्पोरेट करिअर यामधून प्राचीन भारतीय इतिहास संशोधनाकडे वळण्याचा प्रवास नेमका कसा घडला? त्यामागची प्रेरणा काय होती? कॉर्पोरेटमध्ये काम करत असतानाच भारतीय इतिहास संशोधन सुरू केलं होतं का?**

लहानपणापासूनच माझा भगवद्गीतेशी आणि विनोबा भावे यांच्या गीताईशी परिचय झाला. त्यातून महाभारताविषयी अधिक जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. पुढे अभियांत्रिकी शिक्षण घेत असताना पुन्हा भगवद्गीतेचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. त्याच काळात लोकमान्य टिळकांचे Orion आणि The Arctic Home in the Vedas हे ग्रंथ वाचले. भारतीय प्राचीन ग्रंथांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास कसा करता येतो, याची प्रेरणा मला त्यांच्या संशोधनातून मिळाली. त्यानंतर अनेक भारतीय आणि पाश्चात्त्य संशोधकांचे साहित्यही मी अभ्यासले. १९९४ मध्ये, कॅनडामध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर, भारतीय ग्रंथांचे पुन्हा वाचन सुरू केले आणि महाभारताच्या अभ्यासाला गंभीरपणे सुरुवात झाली. पुढील पंधरा वर्षे मी महाभारतातील एका श्लोकावर संशोधन करत होतो. अखेर ८ मे २००९ रोजी, अटलांटामध्ये असताना, त्या श्लोकामागील रहस्याचा उलगडा झाला. हा शोध अत्यंत महत्त्वाचा ठरला. त्या एका श्लोकातून मिळालेल्या निष्कर्षाची पडताळणी महाभारतातील इतर ३०० हून अधिक खगोलशास्त्रीय निरीक्षणांशी केली. आश्चर्य म्हणजे, मुख्य धागा सापडल्यानंतर अवघ्या काही महिन्यांत या सर्व पुराव्यांचा परस्परसंबंध स्पष्ट झाला आणि महाभारत युद्ध इ.स.पूर्व ५५६१ (सुमारे ७५०० वर्षांपूर्वी) झाले असावे, असा विशिष्ट कालनिर्णय मांडता आला. या संशोधनानंतर माझा प्रवास रामायण, ऋग्वेद, आयुर्वेद, स्थापत्यशास्त्र, पुराणे, दर्शनशास्त्र, ब्राह्मण ग्रंथ आणि भारतीय धर्मशास्त्राच्या इतिहासापर्यंत विस्तारला. एका विषयातून दुसऱ्या विषयाशी नवे संबंध उलगडत गेले आणि संशोधनाचा हा प्रवास आजही अखंड सुरू आहे.

**तुमच्या संशोधनाचा पहिला विषय कोणता होता? रामायण-महाभारताच्या कालखंडाच्या अभ्यासाकडे तुम्ही कसे वळलात?**

सुरुवातीला मी भागवत पुराण, भगवद्गीता आणि इतर अनेक भारतीय ग्रंथांचा अभ्यास करत होतो. मात्र, माझे पहिले यशस्वी संशोधन महाभारतातील एका खगोलशास्त्रीय निरीक्षणावर आधारित होते. महाभारतात युद्ध सुरू होण्यापूर्वीच्या आकाशातील अनेक घटनांचे वर्णन आहे. त्यापैकी एक महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे सप्तर्षीमधील अरुंधती तारा वसिष्ठाच्या पुढे दिसत होता. या उल्लेखाचा वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध पद्धतीने शोध घेण्यास मी सुरुवात केली. या एका निरीक्षणाचा उलगडा करण्यासाठी मला तब्बल पंधरा वर्षे लागली. अखेरीस असा एक कालखंड निश्चित करता आला, ज्यामध्ये अरुंधती वसिष्ठाच्या पुढे दिसत होती. या पुराव्याच्या आधारे महाभारत युद्धाच्या

कालखंडाविषयी महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडता आला आणि हे माझे पहिले यशस्वी संशोधन ठरले. याच काळात मी रामायणावरही समांतर संशोधन करत होतो आणि त्यालाही यश मिळाले. या यशामुळे माझा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला. लोकमान्य टिळक, शंकर बाळकृष्ण दीक्षित, विसाजी रघुनाथ लेले, भारताचार्य सी. व्ही. वैद्य, भारतरत्न पांडुरंग वामन काणे, ब्रह्मर्षी डॉ. पद्माकर विष्णु वर्तक तसेच भारतीय विज्ञान संस्थेचे प्रा. आर. एन. अयंगार यांसारख्या अनेक विद्वानांनी या विषयावर संशोधन केले होते. त्यांच्या प्रयत्नांनंतरही अनुत्तरित राहिलेल्या या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य मानतो. याच संशोधनामुळे रामायण आणि महाभारताच्या कालनिर्णयाच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली आणि माझ्या संशोधन प्रवासाचा भक्कम पाया रचला गेला.

**एखाद्या संशोधनासाठी अनेक वर्षे सातत्याने काम करावे लागते. तुमच्या पहिल्या पुस्तकापर्यंत पोहोचण्यासाठी किती वर्षांचा अभ्यास आणि मेहनत लागली?**

मी १९९४ मध्ये संशोधनाला सुरुवात केली आणि महाभारतातील अरुंधती-वसिष्ठ या एका पुराव्याचा उलगडा व्हायलाच १५ वर्षे लागली. या काळात महाभारतातील इतर ३०० हून अधिक खगोलशास्त्रीय पुराव्यांचाही अभ्यास सुरू होता. मुख्य पुरावा स्पष्ट झाल्यानंतर पुढील पाच-सहा महिन्यांत इतर अनेक गणिते सुटली. त्यानंतर पहिले पुस्तक लिहिण्यास सुमारे दोन वर्षे लागली आणि ते २०११ मध्ये पूर्ण झाले. याच काळात रामायणावरील संशोधनही पूर्ण झाले; मात्र कॉर्पोरेट कारकीर्द आणि इतर जबाबदाऱ्यांमुळे ते पुस्तक २०१४ मध्ये प्रकाशित करता आले. सर्व संशोधन पूर्ण असूनही लेखनासाठी वेळ मिळत नव्हता. त्यामुळे मी जनरल इलेक्ट्रिकमधील पूर्णवेळ नोकरी सोडली आणि संशोधन व लेखनाला पूर्णवेळ वाहून घेतले. त्यानंतर पुढील दहा वर्षे कन्सल्टिंग करत संशोधन सुरू ठेवले, ज्यामुळे वेळेचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. या काळात भीष्म निर्वाण (२०१८) हे पुस्तक प्रकाशित झाले. तसेच सूर्यसिद्धान्त, सुश्रुत संहिता, आर्यभटीय, वेदांग, दर्शनशास्त्र, पुराणे अशा अनेक विषयांवर संशोधन करता आले. २०१७ पासून मी जगभर व्याख्याने देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला हे सर्व स्वतःच्या खर्चाने करत होतो. आज अनेक संस्था आणि अभ्यासकांचे सहकार्य लाभत असल्याने व्याख्याने, पॉडकास्ट आणि शाळा-महाविद्यालयांमधील संवाद यांच्या माध्यमातून हे संशोधन अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य होत आहे.

**इतिहासासारख्या संवेदनशील विषयावर संशोधन करताना सर्वात मोठं आव्हान कोणतं असतं?**

इतिहास हा संवेदनशील विषय आहे. जॉर्ज ऑरवेल यांच्या विचारानुसार, एखाद्या संस्कृतीला नियंत्रित करायचे असेल तर सर्वप्रथम त्या समाजाची स्वतःच्या इतिहासाबद्दलची समज बदलणे किंवा विकृत करणे आवश्यक असते. माझ्या मते, ब्रिटिशांनी साधारण १७८५ पासून हे बौद्धिक पातळीवर केले. त्यांनी केवळ राजकीय नियंत्रणच केले नाही, तर भारतीयांच्या इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही परिणाम केला. आजही अनेक वेळा आपल्या विचारांमागे वसाहतवादी इतिहासलेखनाची पार्श्वभूमी दिसून येते. माझा संशोधनाचा दृष्टिकोन मात्र वेगळा होता. मॅक्स म्युलर किंवा ब्रिटिश इतिहासलेखनाच्या वादांमध्ये न अडकता मी थेट रामायण आणि महाभारत या मूळ ग्रंथांकडे वळलो. या ग्रंथांमध्ये काय सांगितले आहे आणि त्यामागचे पुरावे काय आहेत, हे विज्ञान, तर्कशास्त्र आणि तंत्रयुक्तीच्या आधारे समजून घेण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासातून मला जाणवले की अनेक वेळा मोठ्या पदव्या, पुरस्कार किंवा प्रतिष्ठित पदे असली तरी प्रत्यक्ष संशोधनाचा दर्जा वेगळा असू शकतो. हे कोणत्याही एका विचारसरणीपुरते मर्यादित नाही. कोणाच्याही अधिकारावर नव्हे, तर पुरावे, तर्क आणि अभ्यासाच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. संशोधन करताना मोठे आव्हान वाटले नाही; पण ते लोकांसमोर मांडताना जाणवले की अनेकांना विज्ञानाची पद्धत, तर्कशुद्ध विचार आणि पुराव्यांचे मूल्यमापन याबाबत स्पष्टता नाही. उत्तर अमेरिकेतील अनेक STEM क्षेत्रातील उच्चशिक्षित लोक माझ्या संशोधनावर विश्वास ठेवतात, पण जेव्हा विचारतो की "तुम्ही ही पद्धत समजावून सांगू शकाल का?" तेव्हा अनेक जण सांगतात की त्यांनी त्याचा सखोल अभ्यास केलेला नाही. माझ्या मते, कोणत्याही संशोधनाची खरी ताकद ही स्वतंत्र चिकित्सक परीक्षण आणि सत्यापनातून सिद्ध होते. अधिक लोकांनी पुढे येऊन अशा विषयांचा अभ्यास, विश्लेषण आणि परीक्षण केले, तरच या क्षेत्राची खरी प्रगती होईल.

**रामायण, महाभारत हे आपले धर्मग्रंथ आहेत. त्याकडे श्रद्धेने पहिले जातं. त्याविषयी संशोधन करताना श्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यातला समतोल तुम्ही कसा साधला?**

माझ्या मते, श्रद्धा आणि विज्ञान यांच्यात संघर्ष नाही. उलट वैज्ञानिक दृष्टिकोनामध्येही श्रद्धेची एक भूमिका आहे. भगवद्गीतेतील "श्रद्धावान् लभते ज्ञानम्" या विचारानुसार, ज्ञान मिळवण्यासाठी श्रद्धा आवश्यक आहे; तर "अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति" याचा अर्थ ज्ञान आणि श्रद्धा दोन्ही नसतील तर मनुष्य सतत संशयात अडकतो. मात्र श्रद्धा म्हणजे अंधविश्वास नव्हे. ज्ञान म्हणजे एखादी गोष्ट समजून

स्वीकारणे; आणि जिथे पूर्ण समज शक्य नाही, तिथे योग्य श्रद्धेने पुढे जाणे. भगवद्गीतेतील "तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया" हा विचार सांगतो की ज्ञानासाठी नम्रता, योग्य प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि सत्य जाणून घेण्याची प्रामाणिक इच्छा आवश्यक आहे. नम्रता म्हणजे आंधळेपणाने मानणे नव्हे, तर कुठे विश्वास ठेवायचा, कुठे शंका घ्यायची आणि कुठे "मला माहीत नाही" हे स्वीकारायचे, हे समजणे. संशोधनाच्या प्रवासात मला जाणवले की मोठ्या पदव्या, पुरस्कार किंवा प्रतिष्ठित पदांपेक्षा पुरावे, तर्क आणि अभ्यास यांना अधिक महत्त्व आहे. कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारावर नव्हे, तर त्यांच्या विचारांच्या गुणवत्तेवर आणि पुराव्यांवर विश्वास ठेवला पाहिजे. आधुनिक विज्ञानात सर कार्ल पॉपर यांनी मांडलेली पद्धत समस्या मांडणे, संकल्पना तयार करणे, तिची तपासणी करणे, पुराव्यांशी तुलना करून चुका दूर करणे आणि पुढील प्रश्नांकडे जाणे—ही ज्ञानाच्या प्रगतीची प्रक्रिया आहे. विशेष म्हणजे, भारतीय ज्ञानपरंपरेतही याच प्रकारची विचारपद्धती दिसते. न्याय दर्शनातील प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय आणि निगमन हे वैज्ञानिक प्रक्रियेशी साम्य दाखवतात. तसेच तैत्तिरीय उपनिषदातील भृगू-वरुण संवादातून ज्ञान सतत परिष्कृत होत जाते, हे दिसते. म्हणूनच माझ्या मते, आधुनिक विज्ञान आणि भारतीय दर्शनशास्त्र हे परस्परविरोधी नाहीत. पाश्चात्त्य विज्ञान आणि तंत्रज्ञानाने गेल्या काही शतकांत मोठी प्रगती केली आहे, हे मान्य केले पाहिजे; पण ज्ञान कसे मिळते, सत्याचा शोध कसा घ्यायचा आणि विचार कसा करायचा, यावर भारतीय परंपरेत हजारो वर्षांपूर्वी सखोल चिंतन झाले आहे. भारत नंतरच्या काळात मागे का पडला, हा स्वतंत्र आणि मोठा विषय आहे.

**इतिहास संशोधन करताना असा कोणता शोध लागला का किंवा अशी कुठली गोष्ट आढळली का ज्याने तुमची एखादी पूर्व-समजूत बदलली?**

इतिहास संशोधन करताना माझ्या अनेक पूर्वसमजुती बदलल्या. त्यातील एक महत्त्वाचा अनुभव म्हणजे अरुंधती-वसिष्ठ संदर्भाचा. यातून मला एक मोठा धडा मिळाला एखादी गोष्ट अशक्य वाटते म्हणून ती लगेच अतिशयोक्ती म्हणून नाकारू नये. व्यासांसारखे ऋषी अशी नोंद का करतील, या प्रश्नातून मी ती सत्य मानून वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला आणि त्यातून महत्त्वाचे निष्कर्ष मिळाले. मात्र, हा केवळ एका श्लोकाचा योगायोग असू शकतो का, हा प्रश्न पुढे आला. म्हणून महाभारतातील इतर संदर्भांचा अभ्यास केला असता, त्याच कालखंडाकडे निर्देश करणारे अनेक खगोलशास्त्रीय पुरावे मिळाले. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. रामायण, सुश्रुत संहिता आणि इतर भारतीय ग्रंथांच्या अभ्यासातही असेच अनुभव आले. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या ग्रंथांमध्ये अशा प्रकारच्या नोंदी कशा केल्या गेल्या, हे खरोखर आश्चर्यकारक आहे. प्रत्येक वेळी अचूक वर्ष निश्चित करता येईलच असे नाही; पण अनेकदा एखादा विशिष्ट कालखंड निश्चित करता येतो. या नोंदींमुळे गेल्या २०० वर्षांतील भारतीय इतिहास आणि इंडॉलॉजीमधील अनेक मतांचे पुनर्मूल्यांकन करण्याची क्षमता निर्माण होते. हे केवळ खगोलशास्त्रापुरते मर्यादित नाही. भूगर्भशास्त्र, समुद्रशास्त्र, हवामानशास्त्र, नद्यांचा अभ्यास, मानववंशशास्त्र, आनुवंशशास्त्र आणि वंशावळी यांसारख्या अनेक क्षेत्रांशी संबंधित संदर्भ भारतीय ग्रंथांमध्ये आढळतात. तसेच Indica, हेरोडोटसचे लेखन आणि इजिप्शियन नोंदी यांसारख्या बाह्य स्रोतांमध्येही भारताशी संबंधित उल्लेख सापडतात. या सर्व पुराव्यांचा योग्य पद्धतीने अभ्यास केल्यास महाभारत, रामायण, ऋग्वेद, सुश्रुत संहिता आणि चाणक्याचा काळ यांसारख्या विषयांवर नवे दृष्टिकोन समोर येतात. ही केवळ अभिमानाची गोष्ट नाही, तर हजारो वर्षांपूर्वीच्या आपल्या ज्ञानपरंपरेच्या सखोलतेचे आश्चर्यकारक उदाहरण आहे.

**बीएमएम २०२६ अधिवेशनात तुम्ही 'फक्त भारतालाच इतिहास का आहे?' यावर बोलणार आहात. हे शीर्षकच खूप वेगळं आणि उत्सुकता वाढवणारं आहे. या विषयामागचा नेमका विचार काय आहे?**

२०१८ मध्ये कोविडपूर्व काळात मी ऑक्सफर्डमधील कॉफी टेबल कॉन्फरन्समध्ये सहभागी झालो होतो. तिथे दोन संशोधन पेपर सादर केल्यानंतर एका चर्चासत्रात शिकागो विद्यापीठातील एका प्राध्यापकांनी विचारले, “तुम्ही भारतीय १२,००० BCE सारख्या हजारो वर्षांपूर्वीच्या घटनांबद्दल कसे बोलू शकता? Indians don’t have history.” त्यावर मी उत्तर दिले, “Yes, you are right. We don’t have history, we have इतिहास.” कारण इतिहास आणि history यामध्ये मूलभूत फरक आहे. या विचारातून मला जाणवले की उपलब्ध प्राचीन ग्रंथसंपदेमध्ये भारताची ऐतिहासिक परंपरा अद्वितीय आहे. यामागे तीन महत्त्वाची कारणे आहेत. पहिले म्हणजे संस्कृत भाषा. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेले ग्रंथ आजही समजण्यासाठी आवश्यक असलेली भाषिक सातत्यता संस्कृतमध्ये दिसते. तिच्यातील भाषिक बदल (linguistic drift) तुलनेने अत्यंत कमी आहेत. दुसरे म्हणजे काळ निश्चित करण्याची पद्धत. भारतीय ग्रंथांमध्ये खगोलशास्त्रीय संदर्भ जाणीवपूर्वक समाविष्ट केले गेले आहेत. रामायणात वाल्मिकींनी आणि महाभारतात व्यासांनी

शेकडो खगोलीय निरीक्षणे नोंदवली आहेत. Astronomy is time खगोलशास्त्राच्या आधारे काळ निश्चित करता येतो, हे त्या काळातील विद्वानांना माहीत होते. व्यास, वाल्मिकी आणि कालिदास यांसारख्या लेखकांनी हे संदर्भ इतक्या कुशलतेने ग्रंथांमध्ये गुंफले की ते आजही संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. तिसरे म्हणजे गुरु-शिष्य परंपरा आणि हस्तलिखित परंपरा. हे ग्रंथ पिढ्यान्पिढ्या जतन केले गेले, प्रती तयार झाल्या आणि ज्ञानपरंपरा आजपर्यंत पोहोचली. याचमुळे आपण त्यांचा अभ्यास करू शकतो. काही जण म्हणतात की प्राचीन ग्रंथांमध्ये बदल झाले आहेत, त्यामुळे आधी ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. माझ्या मते, हा वैज्ञानिक दृष्टिकोन नाही. विज्ञान, तर्क आणि पुराव्यांच्या आधारे कोणती माहिती विश्वसनीय आहे आणि कोणती नाही, हे तपासता येते. BMM २०२६ अधिवेशनातील “फक्त भारतालाच इतिहास का आहे?” या विषयातून मला हाच विचार मांडायचा आहे आपल्या प्राचीन ग्रंथांकडे केवळ श्रद्धेने नव्हे, तर विज्ञान, तर्क आणि चिकित्सक दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यातील ज्ञानाची व्याप्ती किती मोठी आहे हे समोर येते.

**उत्तर अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांनी आपल्या इतिहासाकडे आणि संस्कृतीकडे कोणत्या नजरेने पाहायला हवं, असं तुम्हाला वाटतं?**

माझ्या मते, संस्कृतीची जपणूक ही प्रत्येकाची जबाबदारी आहे; पण त्यासाठी उपलब्ध परिस्थितीचाही विचार करायला हवा. जे लोक रोजच्या उदरनिर्वाहासाठी संघर्ष करत असतात, त्यांच्याकडून संस्कृतीसाठी वेळ देण्याची अपेक्षा करणे कठीण आहे. त्याचप्रमाणे अतिशय श्रीमंतीमुळेही कधी कधी माणूस आपल्या संस्कृतीपासून दूर जाऊ शकतो. उत्तर अमेरिकेतील भारतीय आणि विशेषतः मराठी समाजाकडे मात्र एक वेगळे भाग्य आणि जबाबदारी आहे. आपल्याला इथे येण्याची संधी मिळाली आहे. आपलेही संघर्ष आहेत, पण तुलनेने आपल्याकडे आर्थिक स्थैर्य, वेळ आणि संसाधने उपलब्ध आहेत. अगदी व्यावसायिक क्षेत्रात व्यस्त असतानाही, योग्य नियोजन केले तर संस्कृती, इतिहास आणि ज्ञानपरंपरेसाठी वेळ देता येतो—हा माझा ३५ वर्षांचा अनुभव आहे. म्हणूनच केवळ कार्यक्रमांना उपस्थित राहणे किंवा टाळ्या वाजवणे पुरेसे नाही. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार आपल्या इतिहासाकडे आणि संस्कृतीकडे समजून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. भारतीय परंपरेत इतिहासाची व्याख्या अशी आहे:

"धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम्।

पूर्ववृत्तंकथायुक्तमितिहासंप्रचक्षते॥"

म्हणजे पूर्वी घडलेल्या घटनांच्या माध्यमातून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचे मार्गदर्शन करणारे ज्ञान म्हणजे इतिहास. इतिहास आपल्याला जीवनासाठी मार्गदर्शन करणारा समान संदर्भ देतो. रामायण आणि महाभारतातील कृष्ण, कर्ण, भीष्म, पांडव किंवा कंस यांसारखी व्यक्तिमत्त्वे आपल्याला निर्णय, नीती आणि जीवनमूल्ये समजून घेण्यास मदत करतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे जीवनातील संतुलन शिकवतात. अर्थ आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी संसाधने आवश्यक आहेत; पण ती धर्माच्या म्हणजेच नीतीच्या मार्गाने मिळवणे आणि योग्य वेळी थांबणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. उत्तर अमेरिकेतील भारतीय समाजाकडे हे ज्ञान समजून घेण्यासाठी वेळ आणि साधने तुलनेने अधिक आहेत. विशेषतः पहिल्या पिढीतील स्थलांतरितांची दोन जबाबदाऱ्या आहेत पुढच्या पिढीपर्यंत हा वारसा पोहोचवणे आणि आपल्या अनुभवातून इतरांशी हे ज्ञान शेअर करणे. माझा अनुभव असा आहे की, प्रामाणिकपणे आणि निस्वार्थ भावनेने काम केले तर लोकांकडून प्रेम, आदर आणि सहकार्य मिळते. मात्र केवळ प्रसिद्धीसाठी केलेले काम टिकत नाही; सत्यनिष्ठा आणि सातत्य यांनाच दीर्घकालीन मूल्य असते. मी तरुण पिढीला नेहमी सांगतो की, स्वतःच्या स्थैर्यासाठी मेहनत करा, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हा; पण त्यानंतर समाज, संस्कृती आणि ज्ञानपरंपरेसाठी वेळ द्या. कारण समाजासाठी आणि ज्ञानासाठी काम करताना मिळणारा आनंद वेगळाच असतो. ज्ञानेश्वर माउली म्हणतात: अनुभवाची जोगे। नोहे बोलायिसे॥“

काही गोष्टी शब्दांनी समजावता येत नाहीत; त्यांचा अनुभव घ्यावा लागतो. म्हणूनच उत्तर अमेरिकेतील भारतीयांनी, विशेषतः मराठी समाजाने, आपल्या क्षमतेनुसार इतिहास, संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे जतन व प्रसार करण्याची जबाबदारी स्वीकारावी.

**तुमच्या व्याख्यानानंतर प्रेक्षकांनी कोणता एक विचार किंवा प्रश्न मनात घेऊन बाहेर पडावं?**

माझ्या व्याख्यानातून प्रेक्षकांनी अनेक गोष्टी घेऊन जाव्यात, पण एक महत्त्वाचा विचार त्यांनी नक्की लक्षात ठेवावा असे मला वाटते. आज आपण सहज विचारले तर "आपली संस्कृती किती जुनी आहे?" असे विचारल्यावर बहुतेक वेळा ५,००० किंवा १०,००० वर्षे असे उत्तर दिले जाते. मात्र हे आकडे कुठून आले, याचा आपण फारसा विचार करत नाही. विज्ञानबुद्धी, तर्कशास्त्र आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पाहिले तर भारतीय संस्कृतीचा इतिहास २५,००० वर्षांपेक्षा जुना, अगदी ७५,००० वर्षांपर्यंत किंवा त्याहूनही अधिक मागे जात असल्याचे अनेक पुरावे दर्शवतात. काळ जितका मागे जातो तितके पुरावे कमी होतात, हे

खरे असले तरी इतर प्राचीन संस्कृतींच्या तुलनेत भारतीय परंपरेचे पुरावे अत्यंत समृद्ध आहेत. माझ्यासह अनेक संशोधकांनी या विषयावर अभ्यास केला आहे. माझी अपेक्षा एवढीच आहे की प्रेक्षकांनी हा विचार स्वतःपुरता न ठेवता आपल्या कुटुंबात, मित्रांमध्ये आणि समाजात पोहोचवावा. कोका-कोलाचे उदाहरण घेतले तर जगाला त्याची माहिती असूनही त्याची जाहिरात सातत्याने केली जाते, कारण एखादी गोष्ट वारंवार सांगितली तरच ती मनात रुजते. त्याचप्रमाणे आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे ज्ञानही सातत्याने पुढे नेण्याची गरज आहे.

**तुमच्या संशोधन प्रवासातून तुम्हाला भारतीय संस्कृतीबद्दल अशी कोणती गोष्ट जाणवली जी सर्वात आश्चर्यकारक होती?**

एक तर विज्ञानाची जी **फिलॉसॉफी ऑफ सायन्स (Philosophy of Science)** आहे, तिची भारतामध्ये प्राचीन काळात झालेली प्रगती हा माझ्यासाठी एक अत्यंत आश्चर्यकारक शोध होता. त्याच्याच पुढे जाऊन आयुर्वेद "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्" यामधील संशोधन असो किंवा दर्शनशास्त्रातील **एपिस्टेमॉलॉजी (Epistemology)** आणि **ऑन्टॉलॉजी (Ontology)** यासारख्या विषयांवरील विचार असोत, हे सर्व खरोखर थक्क करणारे आहे. हजारो वर्षांपूर्वी, अगदी १०,०००–२०,००० वर्षांपूर्वी इतका प्रगल्भ विचार कसा विकसित झाला असेल, हा प्रश्नच आश्चर्य वाटायला लावतो. हे कसे घडले याचे थेट उत्तर मिळणे कठीण आहे. त्या काळातील लोकांची बौद्धिक क्षमता किती होती याचा थेट पुरावा आपल्याकडे नाही; पण त्यांनी निर्माण केलेले ज्ञान आणि ग्रंथ हेच त्याचे अप्रत्यक्ष प्रमाण आहेत. याशिवाय शस्त्र-अस्त्रांसारख्या काही विषयांबाबत अजून पुरेसा वस्तुनिष्ठ आणि एम्पिरिकल (Empirical) पुरावा उपलब्ध नाही; त्यामुळे त्याबद्दल आश्चर्याबरोबरच काही प्रमाणात खंतही वाटते. पण आयुर्वेद, दर्शनशास्त्र आणि व्यापक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात झालेला अभ्यास अत्यंत प्रभावी आहे. त्याचप्रमाणे खगोलशास्त्रातील हजारो वर्षांच्या निरीक्षणांची परंपरा काही अभ्यासांनुसार ४०,००० ते ६०,००० वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळाची आपल्याला दिसून येते. ही केवळ निरीक्षणे नव्हती, तर ती पुढच्या पिढ्यांपर्यंत परंपरेने पोहोचवली गेली. याचे संदर्भ आपल्याला रामायण आणि महाभारतासारख्या ग्रंथांमध्येही आढळतात. हे सर्व माझ्यासाठी अत्यंत आश्चर्यकारक आणि अभ्यास करण्यासारखे आहे.

**भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या तरुण संशोधकांना तुम्ही कोणता सल्ला द्याल? त्यांनी कुठून सुरवात करायला हवी?**

ज्यांना संशोधनाची सुरुवात करायची आहे, विशेषतः तरुणांनी, त्यांनी अत्यंत श्रद्धेने आणि विज्ञानबुद्धीने भगवद्गीतेचा अभ्यास सुरू करावा, असे मला वाटते. मराठी माणसांसाठी मी विशेषतः सांगेन की त्यांनी विनोबांची 'गीताई' वाचून सुरुवात करावी. उत्तर अमेरिकेतील दुसऱ्या पिढीतील तरुण असोत किंवा भारतात आणि भारताबाहेर कुठल्याही वयोगटातील लोक असोत, त्यांनी भगवद्गीतेचा अभ्यास करावा. त्यानंतर विनोबांचे इतर ग्रंथ तसेच भारतीय विचारपरंपरेवर, विशेषतः मराठी विद्वानांनी लिहिलेले अनेक ग्रंथ वाचावेत. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, तुम्ही भगवद्गीतेचा अभ्यास सुरू केला की, पुढचा मार्गदर्शनाचा प्रवास भगवद्गीता स्वतःच घडवून आणते.

## RAPID FIRE QUESTIONS

**इतिहास की खगोलशास्त्र या दोघातला आवडता विषय?**

मी म्हणेन, आता दोन्ही आहेत. पण सुरुवातीला माझी आवड खगोलशास्त्राकडे होती. त्या कुतूहलातूनच मी इतिहासाकडे आलो. इतिहास आवडत नव्हता असे नाही; पण रामायण-महाभारतानंतरचा इतिहास जसे झाशीची राणी लक्ष्मीबाई किंवा छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या काही गोष्टी आवडायच्या,. मात्र खगोलशास्त्राच्या माध्यमातून रामायण-महाभारताचा अभ्यास करता आला आणि त्यातून इतिहासाची गोडी निर्माण झाली. त्यामुळे सुरुवात खगोलशास्त्रापासून झाली, पण आज इतिहासही तितकाच जवळचा आहे.

**रामायण की महाभारत संशोधक म्हणून काय अधिक आव्हानात्मक वाटले?**

आव्हानात्मक, मनोरंजक आणि अत्यंत रोमांचक असा विषय महाभारत वाटतो. रामायणही तितकेच महत्त्वाचे आहे; पण रॅपिड फायरमध्ये एकच उत्तर द्यायचे असेल तर मी महाभारत निवडेन.

**इतिहासातील एका व्यक्तीला भेटण्याची संधी मिळाली तर कोणाला भेटाल?**

हा खूप कठीण प्रश्न आहे; पण मला व्यासांना भेटायला आवडेल. कारण त्यांना विचारायचे अनेक प्रश्न माझ्या मनात आहेत.

**एक असा प्रश्न ज्याचे उत्तर तुम्ही अजून शोधत आहात?**

असे अनेक प्रश्न आहेत. पण एक सांगायचा झाला तर आयुर्वेदाचा अभ्यास करताना मला सतत आश्चर्य वाटते. माझा त्यातील अभ्यास

अजून प्राथमिक आहे; पण चरक, सुश्रुत, अत्रेय, विश्वामित्र आणि इतर ऋषींनी जी ज्ञाननिर्मिती केली, ती त्यांनी नेमकी कशी शोधून काढली हा माझ्यासाठी मोठा कुतूहलाचा विषय आहे. आज आपण फार्माकॉलॉजीसारख्या आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातून संशोधन करतो; पण हजारो वर्षांपूर्वी त्यांनी इतक्या उच्च दर्जाचे निष्कर्ष कसे प्राप्त केले, हा प्रश्न अजूनही मला रोमांचित करतो.

**भारतीय इतिहासाचा एक क्षण पुन्हा अनुभवता आला तर कोणता अनुभवायला आवडेल?**

अगदी सोपे उत्तर - महाभारत युद्ध. अर्थात, थोडे दूर उभे राहून; म्हणजे बाण लागणार नाही अशा सुरक्षित जागेवरून ते पाहायला आवडेल.

**पुस्तक की पॉडकास्ट? (तुमचे विचार/ संशोधन लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी तुमचं आवडतं माध्यम?)**

एकच निवडायचे झाले तर मी पॉडकास्ट म्हणेन, कारण ते अनेक लोकांपर्यंत सहज पोहोचते. पण खरे तर दोन्हींचे महत्त्व आहे. पॉडकास्टमध्ये सर्व तपशील सांगता येत नाहीत; सखोल मांडणीसाठी पुस्तक आवश्यक असते. त्यामुळे उत्तम माध्यम म्हणजे दोन्हींचे संयोजन.

**जर एका वाक्यात सांगायचं झालं, तर 'फक्त भारतालाच इतिहास का आहे?' या प्रश्नाचं उत्तर ऐकण्यासाठी लोकांनी तुमचं व्याख्यान का चुकवू नये?**

कारण आपल्याला आपण कोण आहोत "Who am I?"हा प्रश्न समजून घ्यायचा असेल, तर आपला इतिहास, विशेषतः रामायण आणि महाभारत समजून घ्यावा लागेल. एक मानव म्हणून आपल्याला संपूर्ण मानवजातीचा इतिहास समजून घ्यायचा असेल, तरी त्याचा पाया भारताच्या इतिहासात, विशेषतः रामायण-महाभारतामध्ये आहे. हा दृष्टिकोन समजून घेण्यासाठी माझे व्याख्यान नक्की ऐकावे.

- मुलाखतकार: **अश्विनी क्षीरसागर,** बीएमएम २०२६ समिती



## बृहन्महाराष्ट्र मंडळ Awards

सामाजिक कार्य तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान या बाबतींत मोलाचे योगदान करणाऱ्या उत्तर अमेरिकेतील मराठी माणसांचा सन्मान बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रत्येक अधिवेशनात करते. तसेच लक्ष्यवेधी कामगिरी करणाऱ्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येतात. या सन्मानाचे या वर्षीचे मानकरी खालील प्रमाणे:

**Community Service Award:**

- **Jagannath (Lalit) Mahadeshwar**
- **Dr. Madhuri Kanitkar**

**Science, Technology, Education & Research Award:**

- **Asmita Khanolkar**
- **Dr. Uday Khire**

**BMM Special Recognition Award:**

- **Bhaskar Ranade**
- **Vilas Savargaonkar**
- **Shilpa Joshi**
- **Shriram Mulgund**
- **Dr. Shantaram Talegaonkar**
- **Dr. Ramesh Gangolli**
- **Dr. Vijaya Bapat**
- **Mangesh Phadke**

**BMM Youth Scholarship 2026:**

- **Shalaka Dolas**
- **Ankita Deokule**
- **Rutuja Kelkar**

**बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या पुढील काही अंकांत त्यांच्या मुलाखतींद्वारे त्यांचा परिचय करून देण्यात येईल.**

## ध्येयवेडा : विलास सावरगावकर




**नमस्कार विलास, सर्वप्रथम बी एम एम चे स्पेशल रेकग्निशन अवॉर्ड मिळाल्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन. या पुरस्काराच्या निमित्ताने आम्हाला तुमच्या कार्याच्या वाटचालीचा मागोवा घ्यायला खूप आवडेल.**

नमस्कार दीपश्री, मुलाखतीचा कार्यक्रम ठेवल्याबद्दल धन्यवाद. बीएमएम पदाधिकाऱ्यांचे आणि वृत्त संपादकीय समितीचेही मनःपूर्वक आभार.

**सर्वप्रथम तुमचं बालपण कुठे गेले आणि तुम्हाला स्वतःला सामाजिक जाणीव कधी आणि कशी झाली?**

पुण्यात जन्म आणि मुंबईत बालपण गेलेल्या मजवर माझ्या समाजवादी वडिलांमुळे लहानपणापासूनच सामाजिक-राजकीय संस्कार झाले. नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी यांसारख्या नेत्यांच्या सहवासात आणि आणीबाणी विरोधी चळवळीच्या वातावरणात माझी जडणघडण झाली. १९७७ च्या निवडणुकीत हजारो मतदार कार्ड्स हाताने लिहून मी सामाजिक कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेतला, ज्यातून देशभक्ती आणि समाजसेवेची जडणघडण झाली. पार्ले कॉलेजमध्ये (१९८०-८५) शिकताना एनएसएसच्या (National Social Services) सरचिटणीसपदापर्यंत जबाबदारी सांभाळली; धारावीतील पोलिओ लसीकरण मोहिमेचे नेतृत्व यशस्वीपणे केले त्यासाठी मला मुंबई विद्यापीठाचा 'बेस्ट व्हॉलेंटियर ऑफ द इयर' हा पुरस्कार व्हॉईस चान्सलर तर्फे मिळाला. पार्ले कॉलेजच्या सामाजिक वातावरणाने माझा सामाजिक सेवेचा पाया रचला. पुढे लॉ कॉलेजमध्ये LLB आणि LLM करताना १९८७ मध्ये मी एनएसयुआय (National Student Union Of India) मध्ये प्रवेश केला, जेथे राजीव गांधी यांच्या हस्ते पुरस्कृत होऊन माझी मुंबई सरचिटणीसपदी निवड झाली. १९८९ मध्ये आमदार होण्याची इच्छा असतानाच, अमेरिकेत शिक्षणाची संधी मिळाल्याने आयुष्याला नवीन वळण लागले.

**तुम्हाला देश सोडून अमेरिकेला येताना आपण आपल्या आवडीच्या कामापासून दूर जाऊ अशी भीती नाही वाटली का?**

देश सोडताना भीती होती, पण नवीन अनुभवांची उत्सुकताही होती. १० सप्टेंबर १९९० रोजी मी अमेरिकेत लुझियानातील ग्रॅमलिंग स्टेट युनिव्हर्सिटीत क्रिमिनल जस्टिसमध्ये मास्टर्ससाठी दाखल झालो. प्राध्यापकांबरोबर सामाजिक आणि राजकीय विषयांवर चर्चा होत असे. दोन वर्षांचा अभ्यासक्रम मी नऊ महिन्यांत पूर्ण केला. तेथे कृष्णवर्णीय मित्रांमुळे मार्टिन ल्युथर किंग यांच्या कार्याची ओळख झाली आणि त्यावर सखोल वाचन केले. पदवीदान समारंभात सुप्रसिद्ध आफ्रिकन अमेरिकन डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते जेस्सी जॅक्सन यांची भेट झाली. या अनुभवांमुळे अमेरिकेशी माझे एक वेगळे नाते निर्माण झाले.

**तुमचा शिकागो महाराष्ट्र मंडळाशी दुवा कसा जोडला गेला त्याबद्दल काय सांगाल?**

१९९१ पासून शिकागो महाराष्ट्र मंडळाशी (CMM) गणेशोत्सवात जोडला गेलो आणि १९९३ मध्ये तिथे स्थायिक झाल्यावर मंडळाच्या सचिव, उपाध्यक्ष व अध्यक्षपदांच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. १९९४ चा रौप्य महोत्सव, महाराष्ट्राची लोकधारा सारखा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आणि १९९८ मध्ये माझ्या अध्यक्षतेखाली झालेला 'सुयोग' नाट्यसंस्थेचा (सुधीर भट यांच्या प्रेरणेने) पहिला दोन दिवसीय 'नाट्यमहोत्सव' (उद्घाटन: भक्ती बर्वे) हे माझ्या नियोजनातील महत्त्वाचे टप्पे ठरले. याच काळात शुभदाशी माझा विवाह झाला. पुढे १९९९ मध्ये 'बीएमएम' (BMM) कार्यकारिणीवर इंडिया प्रोग्रामिंगचा प्रमुख आणि प्रतिनिधी म्हणून तीन वर्षे कार्य केले. या प्रवासात बीएमएमचे संस्थापक जयश्रीताई हुपरीकर, शरद गोडबोले व विष्णू वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले आणि अनेक जिवाभावाचे मित्र जोडले गेले.

**न्यू जर्सीमध्ये तुम्ही २५ वर्षांपेक्षा अधिक काळ घालवला, त्या अनुभवाबद्दल थोडे सांगा ना!**

२००१ मध्ये शुभदाच्या नोकरी निमित्त आम्ही न्यू जर्सीमध्ये स्थायिक झालो. सुरुवातीला ब्रिजवॉटर येथील मराठी शाळेशी जोडून काम करण्यास सुरुवात केली. परिसरातील मराठी कुटुंबांना एकत्र आणत मुलांसाठी मराठी भाषा, संस्कृती आणि विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले. २००९ मध्ये माझी न्यू जर्सी मराठी विश्वच्या संचालक मंडळावर निवड झाली. २०१३ ते २०१५ या काळात अध्यक्ष म्हणून कार्य करताना अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्याची संधी मिळाली. २०१३ च्या गणेशोत्सवात प्रथमच न्यू जर्सीचे तत्कालीन गव्हर्नर ख्रिस

ख्रिस्टी यांच्या उपस्थितीत गणेशोत्सव साजरा करण्याचा मान मिळाला. २०१४ मध्ये मी दुसऱ्यांदा सुमारे २० नाट्यकर्मींसह न्यू जर्सी मराठी विश्वचा दोन दिवसीय मराठी नाट्यमहोत्सव यशस्वीरीत्या आयोजित केला. या महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते झाले. तसेच झी टीव्हीच्या प्रायोजकत्वाखाली, मराठी विश्वच्या पुढाकाराने अमेरिकेतील १४ मराठी मंडळांच्या सहभागातून २२ मराठी नाट्यप्रयोगांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याशिवाय, 'सकाळ' आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धा, दिवाळीत 'रंगदीप' दिवाळी अंकासोबत प्रथमच भारतातून 'कालनिर्णय' अमेरिकेत उपलब्ध करून देणे, तसेच दरवर्षी १ मे महाराष्ट्र दिन आणि दसरा उत्सव नियमितपणे साजरे करण्यास सुरुवात केली. याच काळात डॉ. विकास आमटे यांचा प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्याचा योग आला.

२०१५ ते २०१७ या कालावधीत मी बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) मध्ये पदाधिकारी म्हणून कार्य केले. त्यानंतर २०२२ मध्ये न्यू जर्सी येथे झालेल्या BMM अधिवेशनात फंडरेझिंग चेअरमन म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. माझ्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचा आणि अविस्मरणीय क्षण म्हणजे डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांचा आमच्या घरी सलग तीन दिवसांचा सहवास लाभला. त्यांचे मार्गदर्शन, आशीर्वाद आणि सान्निध्य ही माझ्यासाठी आयुष्यभर जपून ठेवण्यासारखी अमूल्य शिदोरी आहे.

**मला माहित आहे की तुमचे कार्य हे फक्त मराठी लोकांपुरतेच मर्यादित नाही. इतर भारतीय लोकांना पण तुम्ही तुमच्या व्यावसायिक अनुभवातून प्रचंड मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल तुमचे अनुभव ऐकायला नक्कीच आवडतील.**

२०१४ पासून मी एकल विद्यालय, २०१५ पासून जयपूर फूट, २०१७ पासून अक्षयपात्र, महाराष्ट्र फाउंडेशन तसेच इतर अनेक सामाजिक संस्थांबरोबर सक्रियपणे कार्यरत आहे. मराठी समाजाबरोबरच गुजराती, पंजाबी, बंगाली आणि दक्षिण भारतीय समुदायांनाही कायदेशीर व सामाजिक मदत केली आहे. मानवी संस्थेद्वारे कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांत कायदेशीर सल्ला दिला, तसेच २००५ पासून बालहक्क समितीसोबत विविध भारतीय भाषांतील अनुवादक म्हणून कार्य केले. कौटुंबिक हिंसाचार, घटस्फोट, अपघात, अपघाती मृत्यू, पार्थिव भारतात पाठविणे अशा अनेक संवेदनशील प्रसंगांत गरजू भारतीयांना मदतीचा हात दिला. कोविड काळात सुमारे २०० भारतीयांच्या अंत्यविधीची व्यवस्था व अस्थिकलश भारतात पाठविण्याचे कार्य केले. तसेच न्यू जर्सीतील जर्सी सिटी येथे भीषण आगीत सर्वस्व गमावलेल्या २५ भारतीय विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी विविध संस्थांशी समन्वय साधत पासपोर्ट, व्हिसा, विमा आणि इतर आवश्यक बाबींची यशस्वी व्यवस्था केली.

२०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथील ऐतिहासिक कार्यक्रमाच्या आयोजन समितीवर काम करण्याची संधी मिळाली. २०१५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या अमेरिका दौऱ्यात Friends of



Maharashtra कार्यक्रमाचे संयोजन केले. २०१६ मध्ये मुख्यमंत्री कार्यालयाच्या निमंत्रणावरून 'मेक इन महाराष्ट्र' परिषदेत सहभागी झालो आणि २०१७ पासून 'मेक इन महाराष्ट्र' व 'मेक इन इंडिया' उपक्रमांशी सक्रियपणे जोडलेलो आहे.

माझ्या सामाजिक कार्याचा आवाका आणि परिणामकारकता लक्षात घेऊन २०२२–२०२४ या काळात बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष संदीप दीक्षित ह्यांनी 'आधार' उपक्रमाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. सध्याचे अध्यक्ष प्रसाद पानवलकर यांच्या नेतृत्वाखालीही हा उपक्रम सुरू असून, गेल्या चार वर्षांत आम्ही अनेक मराठी कुटुंबांना कायदेशीर, सामाजिक आणि मानवी स्तरावर सर्वतोपरी मदत केली आहे. माझ्या सर्व सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू नेहमीच महाराष्ट्र, भारत आणि जगभरातील भारतीय समाजाचे हित हा राहिला आहे.

**या सर्व वाटचालीत शुभदाची मिळालेली मोलाची साथ आणि तुमच्या कार्याची धुरा पुढे घेऊन जाणारा ओम यांच्या बद्दल थोडे...**

माझ्या सामाजिक कार्यामागे माझी पत्नी **शुभदा** हिची नेहमीच खंबीर साथ लाभली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवाभावी संस्कारांत वाढलेल्या शुभदाने आयटी क्षेत्रातील यशस्वी कारकीर्द सांभाळतानाच

शिकागो चे त्रैमासिक 'रचना', न्यू जर्सी दिवाळी अंक 'रंगदीप', तसेच बीएमएमच्या विविध प्रकाशनांमध्ये संपादकीय योगदान दिले. ती २०२२ च्या न्यूजर्सी बीएमएम अधिवेशन स्मरणिकेची सहसंपादिका आणि २०२२–२०२४ या काळात 'बीएमएम वृत्त'ची प्रमुख संपादिका होती. आजही ती बीएमएम वृत्तच्या संपादकीय समितीवर कार्यरत आहे.

आमचा मुलगा **ओम** याच्यावरही लहानपणापासून समाजसेवेचे संस्कार झाले. मराठी विश्व, बीएमएम आणि एकल विद्यालय येथे युवा स्वयंसेवक म्हणून काम केल्यानंतर, शिक्षण पूर्ण करून आज तो अमेरिकेच्या डेमोक्रॅटिक पक्षात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत आहे. न्यू जर्सीच्या गव्हर्नर मायकी शेरिल, मिशिगनच्या सिनेटर एलिसा स्लॉटकिन, तसेच प्रेसिडेन्शिअल कॅम्पेनसाठी कमला हॅरिस यांच्या निवडणूक प्रचार मोहिमांमध्ये त्याने प्रमुख भूमिका बजावली असून, आपल्या आवडीच्या क्षेत्रात तो यशस्वी वाटचाल करत आहे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**या पुढील तुमचे भविष्यातले उपक्रम काय असतील?**

समाजसेवा ही माझ्यासाठी समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक जीवनमार्ग आहे. समाजसेवेला सुरुवात-मध्य-शेवट असे काही नसते. माझ्या हातून असेच उत्तमोत्तम समाजभावनेने काम होत राहावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**मुलाखतकार: दीपश्री गोडसे,** रॉबिन्सव्हिल, न्यू जर्सी




## सांस्कृतिक क्रांतीचा नवा 'भास्कर'- श्री. भास्कर रानडे

**श्री. भास्कर रानडे यांच्या नेतृत्वात MMBA चा अभूतपूर्व प्रवास!**

ध्यास सेवेचा मनी, ध्येय संस्कृतीचे उरी,
सामूहिक प्रयत्नांनी फुलली सातासमुद्रापारही पंढरी.



महाराष्ट्र मंडळ बे एरिया (MMBA) ही उत्तर अमेरिकेतील मराठी संस्कृतीची एक भक्कम ध्वजवाहक संस्था. या संस्थेला एका नव्या उंचीवर नेण्याचे काम ज्या नेतृत्वाने केले, ते नाव म्हणजे श्री. भास्कर रानडे. संस्कृती, सेवा आणि संघटन यांची सुरेख सांगड घालत त्यांनी MMBA ला एका राष्ट्रीय दर्जाचा ब्रँड बनवले. स्थानिक कलाकारांचा सन्मान, दर्जेदार व्यासपीठ आणि सामाजिक बांधिलकी जपणारे हे कार्यप्रवीण व्यक्तिमत्त्व व त्यांचा हाच समृद्ध प्रवास वाचकांसमोर मांडावा, म्हणून साधलेला हा विशेष संवाद...

**'अकोला ते अमेरिका'... या तुमच्या सुरुवातीच्या टप्प्याविषयी जाणून घ्यायला आवडेल.**

माझा जन्म विदर्भातील अकोला येथे झाला. माझे वडील रेल्वे प्रशासनात असल्यामुळे आमची महाराष्ट्रात बरीच भ्रमंती झाली. वेगवेगळ्या शहरांत राहिल्यामुळे मराठी संस्कृती आणि लोकजीवनाशी माझे नाते अगदी लहानपणापासूनच घट्ट विणले गेले.माझ्या आयुष्यातील नंतरची सुमारे ३५ वर्षे मुंबईत गेली. लहानपणी रेडिओवर ऐकलेले पहाटेचे अभंग, भावगीते आणि नाट्यसंगीत यांनी माझ्यावर संगीताचे खोल संस्कार केले. मी संगीताचे कोणतेही औपचारिक शिक्षण घेतले नसले, तरी एक सच्चा रसिक म्हणून संगीत माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले.

मी Computer Science घेऊन M.Sc. केले. त्या काळात हा विषय निवडणे हे एक मोठे धाडस होते. या शिक्षणामुळे मला एक शिस्तबद्ध, पद्धतशीर आणि system oriented

विचारसरणी मिळाली, ज्याचा पुढे संघटन बांधणीत मोठा फायदा झाला. गेली ३० वर्ष मी बे एरियात स्थायिक आहे.

**महाराष्ट्र मंडळ बे एरियाशी (MMBA) तुमची पहिली ओळख कशी झाली?**

उत्तर: अनेक पालकांप्रमाणेच मी सुद्धा माझ्या मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मंडळाशी जोडला गेलो. माझा मोठा मुलगा आदित्य संगीत शिकत होता. कोणत्याही कलाकाराला स्वतःच्या विकासासाठी रंगमंचाची गरज असते; सराव घरात होतो, पण आत्मविश्वास व्यासपीठावरच मिळतो. २००६-०७ च्या काळात 'चैत्रधून' आणि 'गणपती उत्सव' या कार्यक्रमांच्या माध्यमातून मंडळाने मुलांना सादरीकरणाची संधी दिली. ती व्यासपीठे मुलांचा स्टेज फियर घालवण्यासाठी खूप मोलाची ठरली.

**एका पालकापासून स्वयंसेवक बनण्याचा प्रवास कसा सुरू झाला?**

आदित्य संगीतात आणि लहान मुलगा अजिंक्य तबल्यात रस घेऊ लागला. तेव्हा मला जाणवले की, मुलांसाठी वर्षातून फक्त एक-दोन कार्यक्रम पुरेसे नाहीत. स्थानिक कलाकारांना अधिक संधी मिळायला हवी. या गरजेतूनच मी मदतीचा हात पुढे केला. एका कार्यक्रमादरम्यान तत्कालीन अध्यक्ष विराज राऊत यांनी मला मदत मागितली आणि मी लगेच होकार दिला. माझी पहिली भूमिका 'event photographer' म्हणून होती. त्या लहानशा भूमिकेने मला शिकवले की, 'योगदान देण्यासाठी मोठ्या पदाची गरज नसते; फक्त मनापासून मदत करण्याची तयारी हवी.' हेच सूत्र पुढे मी माझ्या स्वयंसेवकांना दिले.

**छायाचित्रे टिपण्यापासून, म्हणजे स्वयंसेवक ते अध्यक्ष ह्या प्रवासाबद्दल सांगाल का?**

माझ्या कामातील सातत्यामुळे २०१८-१९ मध्ये विराज राऊत यांच्या अध्यक्षतेखाली मला कार्यकारी समितीत आमंत्रित करण्यात आले. हा काळ MMBA चा 'पुनर्जन्म' मानला जातो. त्यापूर्वी मंगेश ताम्हणकर यांनी मंडळाला सावरून स्थिर केले होते. विराज यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमांना नवी गती मिळाली. मी VP(Admin) आणि नंतर Treasurer म्हणून जबाबदारी सांभाळली. या काळात मला संस्थेचे नियोजन, लोकव्यवस्थापन, वित्त आणि पायाभूत सुविधा जवळून समजून घेता आल्या. २०२२ साली माझी अध्यक्ष म्हणून निवड झाली.

**सुरुवातीच्या काळात तुम्ही कोणत्या पायाभूत सुविधांवर भर दिला?**

'उत्तम कार्यक्रम करायचे असतील तर उत्तम साहित्याची गरज असते.' आमची साऊंड सिस्टीम आणि रंगमंचाचे साहित्य खूप जुने झाले होते. म्हणून मी $२,००० निधी उभारून नवीन साहित्य खरेदी केले. त्यामुळे मंडळाचा पाया मजबूत झाला. आमची यंत्रणा इतकी सक्षम झाली की, आम्ही मध्यरात्रीसुद्धा कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करू शकत होतो. 'वारी पंढरीची' या अत्यंत यशस्वी संगीतमय कार्यक्रमाने आम्हाला हा आत्मविश्वास मिळवून दिला.

**२०२२ मध्ये अध्यक्ष झाल्यानंतर तुमचे मुख्य ध्येय काय होते?**

'महाराष्ट्र मंडळ बे एरिया हे, एक अत्यंत नामांकित आणि दर्जेदार ब्रँड बनावे,' हे माझे मुख्य ध्येय होते. स्थानिक कलाकारांना मान-सन्मान मिळणे आणि प्रेक्षकांना उत्तम दर्जाचे कार्यक्रम मिळणे गरजेचे होतेच. तसेच, 'मंडळाकडे आलेला पैसा साठवून ठेवण्यासाठी नसून तो त्याच समुदायाच्या सांस्कृतिक प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी वापरला पाहिजे,' या विचारावर माझा ठाम विश्वास होता व तो वैचारिक बदल मी घडवला.

**'महाराष्ट्र कला महोत्सव' (MKM) या प्रसिद्ध संकल्पनेचा जन्म कसा झाला?**

एका संगीत कार्यक्रमाचे तीन महिने नियोजन केल्यानंतर तो अचानक रद्द करावा लागला. तेव्हा मला जाणीव झाली की, 'एका कार्यक्रमासाठी अनेक महिने घालवण्यापेक्षा असा उत्सव करू जिथे एकाच वीकेंडला अनेक प्रकारच्या कला सादर होतील!' यातूनच 'महाराष्ट्र कला महोत्सवा'चा जन्म झाला. वर्षातून दोनदा आयोजित होणाऱ्या या तीन दिवसीय महोत्सवात चार वर्षांत आम्ही ५० कार्यक्रमातून, १०० तासांहून अधिक वेळ कला(art forms) सादर केली. १५०० हून अधिक प्रेक्षक या महोत्सवाचा आनंद घेत असत. ह्यात बाहेरगावातील कलावंतांसाठी एक राखीव स्लॉट असत. आमच्या सोबत इतर मंडळांचाही विकास व्हावा ह्या BMM च्या धोरणाशी आम्ही संलग्न आहे.

'कलेचा आणि कलाकाराचा खऱ्या अर्थाने आदर करायचा असेल, तर त्यांना योग्य मोबदला मिळायला हवा.' आपण नेहमी कलाकारांकडून मोफत सादरीकरणाची अपेक्षा करू शकत नाही. म्हणून आम्ही तिकीट असलेल्या कार्यक्रमांमध्ये सर्व कलाकारांना, अगदी इतर शहरांतून आलेल्या किंवा तरुण कलाकारांनाही रोख पारितोषिक आणि मानधन देण्याची पद्धत सुरू केली. 'हा केवळ आर्थिक निर्णय नव्हता, तर सांस्कृतिक आदराचा भाग होता.'

**तुमच्या कार्यकाळातील इतर प्रमुख निर्मिती आणि उपक्रम कोणते होते?**

'इंद्रायणी काठी' या नृत्यावर आधारित कार्यक्रमासाठी मंडळाने $३०,००० ची मोठी गुंतवणूक केली, ज्याचे चार प्रयोग तुफान यशस्वी झाले. २०२५ च्या दिवाळी उत्सवात 'अवघा रंग एकचि झाला' ह्या कार्यक्रमात तब्बल ८०० प्रेक्षक उपस्थित होते, जो एक विक्रम होता. याशिवाय चार वर्ष यशस्वीरीत्या चालणारी 'विठू माऊली वारी', तसेच मराठी चित्रपटांचे मोफत स्क्रिनिंग, ३९ वर्षांनंतर मंडळाच्या Bylaws मधे केलेले बदल, Gold Membership योजने मुळे वाढलेला सहभाग हे सर्व अत्यंत महत्त्वाचे टप्पे ठरले.

**सांस्कृतिक कामांव्यतिरिक्त तुम्ही सामाजिक जबाबदारी कशी पार पाडली?**

संस्था केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता तिने सामाजिक दायित्वही जपले पाहिजे. आम्ही महाराष्ट्रातील १२ महिला बिडी कामगारांना तंबाखूच्या विषारी कामातून बाहेर काढून बॅग बनवण्याच्या व्यवसायात मदत केली. तसेच 'सेवा' संस्थेच्या सहकार्याने पुणे आणि अमरावती जिल्ह्यात मुलींसाठी स्वच्छतागृहे बांधण्यासाठी निधी गोळा केला.

**"कामाचा पसारा, तासनतासांचे नियोजन आणि घरची जबाबदारी... हे गणित कसे सांभाळले ?**

माझी पत्नी पद्मा, आदित्य आणि अजिंक्य यांच्या पाठिंब्याशिवाय हे अजिबात शक्य नव्हते. सामाजिक कामात कुटुंबाचा वेळ आणि ऊर्जा जाते. कित्येकदा आमचे घरच मंडळाच्या साहित्याचे गोडाऊन बनायचे. त्यांनी मला प्रत्येक टप्प्यावर खंबीर साथ दिली.

**"तुमचा कार्यकाळ हा केवळ उपक्रमांपुरता नाही, तर एका वैचारिक बदलासाठी ओळखला जातो. त्याबद्दल थोडे सांगाल का?**

मी नेहमी स्वतःला आधी एक 'स्वयंसेवक' मानले आणि नंतर अध्यक्ष. जेव्हा तुम्ही पदापेक्षा सेवेला प्राधान्य देता, तेव्हा लोक तुमच्याशी जोडले जातात. "Freedom over Control: Empowering Others to Excel." मी सहकाऱ्यांवर विश्वास ठेवला आणि त्यांना मोकळीक दिली. यामुळे हा कार्यक्रम एका व्यक्तीचा न राहता संपूर्ण समुदायाचा बनला. मला नेहमी वाटते की, जर तुमच्या मनात कामाची तीव्र इच्छा आणि प्रामाणिक उद्देश असेल, तर लोक नक्कीच तुमच्या पाठीशी उभे राहतात.माझी कार्यकारिणी समिती आणि इतर स्वयंसेवक ह्यांचे योगदान कायमच मोलाचे होते.

**भाषा आणि संस्कृती संवर्धन ह्यासाठी पुढील पिढीला काय संदेश द्याल ?**

आपण मुलांवर अचानक विशिष्ट वयात संस्कृती लादू शकत नाही. लहान मुले स्पंजसारखी असतात, ती आसपासच्या गोष्टी लगेच टिपतात. त्यामुळे मुलांना अगदी लहान वयापासूनच मराठी सण, बालनाट्य, संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना घेऊन जाणे हे पालकांचे कर्तव्य आहे . हाच पाया त्यांना भविष्यात स्वतःच्या भाषेशी आणि देशाशी जोडून ठेवेल.

**तुमच्या भावी संकल्पना काय आहेत ?**

'अध्यक्षपदाची मुदत पूर्ण झाली असली, तरी सेवेचा हा वसा आणि संस्कृतीशी जोडलेली नाळ पुढेही तितक्याच निष्ठेने कायम राहील, यात शंका नाही. भविष्यात काहीतरी भव्यदिव्य आकारास येत असून ते तूर्तास गुलदस्त्यात आहे. बे एरियात मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांसोबत खांद्याला खांदा लावून पुढेही कार्य करत राहण्याचा मानस आहे.'

MMBA च्या पुढील प्रवासासाठी आणि भास्करजींच्या भावी वाटचालीस 'वृत्त'तर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!"

प्रवास हा सेवेचा असाच पुढे चालत राहील, मराठी संस्कृतीचा दिवा दूर देशी तेवत राहील!!

- मुलाखतकार: मृदुल देशपांडे






## बीएमएम २०२६: 'स्त्री'सन्मान: अंजली अंतुरकर




**त्यांची थोडक्यात ओळख:**

- उत्तर अमेरिकेतील मराठी समाजातील सेवाभावी कार्यकर्त्या.
- BMM २०१७ अधिवेशनाच्या संयोजक; ३००+ स्वयंसेवकांच्या नेतृत्वाखाली BMM च्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी आणि आर्थिकदृष्ट्या लाभदायक अधिवेशनाची यशस्वी धुरा सांभाळली.
- महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटच्या माजी अध्यक्षा व विश्वस्त; संस्थेच्या विकासासाठी आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण योगदान.
- VSS Foundationच्या अध्यक्षा; ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी निधी संकलन आणि शैक्षणिक उपक्रमांचे नेतृत्व.
- जागतिक मराठी मासिक अंक निनादच्या प्रकाशिका; मराठी साहित्य, संस्कृती आणि वैचारिक देवाणघेवाणीसाठी कार्यरत.
- University of Michigan येथे Associate Vice President for Student Affairs म्हणून नेतृत्व, प्रशासन आणि समाजसेवेचा प्रभावी समन्वय साधणाऱ्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी

**आपण उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाशी अनेक दशकांपासून जोडलेल्या आहात. समाजसेवेच्या या प्रवासाची सुरुवात कशी झाली आणि या प्रवासातून आपल्याला काय शिकायला मिळाले?**

माझ्या समाजसेवेच्या प्रवासाची सुरुवात २००० साली झाली. बारा वर्षे अमेरिकेत राहिल्यानंतर आम्ही भारतात परतलो आणि त्याच वेळी पुण्यातील **विद्यार्थी सहाय्यक समिती (VSS)** मध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या प्रवासात मला समाजसेवेतील दूरदृष्टीच्या नेत्या निर्मलाताई पुरंदरे यांचे मार्गदर्शन लाभले. मोठी स्वप्ने पाहतानाच ती प्रत्यक्षात आणण्यासाठी तळमळीने आणि संवेदनशीलतेने काम कसे करायचे, हे मी त्यांच्याकडून शिकले. कदाचित हे ऐकायला सर्वपरिचित वाटेल, पण त्या अनुभवातून मला एक महत्त्वाची गोष्ट उमगली , समाजकार्याच्या संधी सर्वत्र असतात; त्या शोधण्याची आणि त्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी मात्र आपल्यात असावी लागते. याच विचारांनी पुढे महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटमधील माझ्या कामाला, बीएमएम २०१७ अधिवेशनाच्या संयोजकपदाला आणि आज VSS Foundation च्या अध्यक्ष म्हणून करत असलेल्या कार्याला दिशा दिली. समाजसेवेचा हा प्रवास मला सातत्याने शिकवत राहिला आहे की, समाजासाठी केलेली प्रत्येक छोटी कृतीही अनेकांच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते.

**BMM २०१७ अधिवेशनाच्या संयोजक म्हणून आपण ३०० हून अधिक स्वयंसेवकांच्या टीमचे नेतृत्व केले. त्या भव्य अधिवेशनामागील नियोजन, आव्हाने आणि अविस्मरणीय अनुभवांबद्दल थोडे सांगाल का?**

बीएमएम २०१७ साठी तब्बल ३०० स्वयंसेवक पुढे आले, हीच आमच्यासाठी मोठी जमेची बाजू होती. महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटने अनेक वर्षे केलेल्या कार्यामुळे हा विश्वास निर्माण झाला होता. मात्र दोन वर्षांच्या कालावधीत एवढ्या मोठ्या स्वयंसेवकांच्या टीमचा उत्साह टिकवून ठेवणे हे खरे आव्हान होते. त्यासाठी आम्ही चार महत्त्वाच्या गोष्टींवर भर दिला. पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक स्वयंसेवकाला एकच प्रश्न विचारला – "तुम्ही BMM २०१७ साठी स्वयंसेवक का झालात?" प्रत्येकाच्या उत्तरातून आणि आमच्या सामूहिक विचारातून अधिवेशनाचा उद्देश, दृष्टी आणि प्रेरणा स्पष्ट झाली. एकदा "का?" समजला की "काय?" आणि "कसे?" याची उत्तरे आपोआप मिळू लागली. दुसरे म्हणजे, आम्ही पूर्वीच्या बीएमएम संयोजकांशी आणि उपस्थितांशी संवाद साधला. त्यांच्या अनुभवातून आम्हाला काही अपेक्षा स्पष्टपणे समजल्या, कार्यक्रम वेळेवर सुरू व्हावेत, ध्वनीव्यवस्था उत्कृष्ट असावी, मित्र-परिवारासोबत वेळ घालवण्याची संधी मिळावी, जेवणासाठी रांगा लागू नयेत, सतत संवाद असावा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे *आपलेपणाची भावना* अनुभवायला मिळावी. तिसरे म्हणजे, आमचे व्हिजन आणि मिशन प्रत्येक स्वयंसेवकापर्यंत स्पष्टपणे पोहोचवले. आमचे ब्रीद होते अतिथी देवो भव, मात्र आमच्यासाठी "अतिथी" म्हणजे कोण, हे आधी ठरवले. आमच्या दृष्टीने अधिवेशनाला आलेला प्रत्येक प्रतिनिधी हा अतिथी होता. कलाकार, प्रमुख पाहुणे आणि स्वयंसेवक हे सर्व त्या

प्रतिनिधींच्या सेवेसाठी होते. चौथी गोष्ट म्हणजे आर्थिक शिस्त. उत्कृष्ट अधिवेशन आणि आर्थिक यश या दोन गोष्टी एकत्र साध्य होऊ शकतात, असा आमचा विश्वास होता. प्रत्येक करार, प्रत्येक खर्च आणि प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळेवर आम्ही काटेकोर लक्ष ठेवले. कार्यक्रम दोन मिनिटांपेक्षा जास्त उशिरा सुरू होऊ दिला नाही. याच नियोजनामुळे BMM २०१७ हे बीएमएमच्या इतिहासातील सर्वाधिक नफा मिळवणारे आणि त्याचबरोबर सर्वाधिक समाधान मिळवून देणारे अधिवेशन ठरले.

या अधिवेशनातील सर्वात अविस्मरणीय अनुभव म्हणजे **ग्रंथदिंडी**. भारताचे तत्कालीन संरक्षणमंत्री श्री. मनोहर पर्रीकर यांच्या उपस्थितीत ग्रँड रॅपिड्स शहरातील मुख्य रस्त्यांवरून ही दिंडी निघाली. ७० ढोल-ताशा आणि १४० लेझीम कलाकारांच्या सहभागामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले. शहर प्रशासनाने आमच्यासाठी रस्ते आणि पूल बंद केले होते आणि या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण स्थानिक दूरचित्रवाणीवर झाले.

त्या दिवशी एका महिलेने मला सांगितले की, अमेरिकेत आल्यानंतर त्यांनी कधीही सार्वजनिक ठिकाणी मराठी बोलण्याचे किंवा पारंपरिक पोशाख परिधान करण्याचे धाडस केले नव्हते. पण ग्रंथदिंडीत सहभागी झाल्यानंतर त्यांना प्रथमच वाटले की, "आम्ही आता खऱ्या अर्थाने या देशाचा भाग आहोत." त्याच दिवशी एका मेक्सिकन कर्मचाऱ्यानेही मला सांगितले की, हा कार्यक्रम पाहून त्यालाही आपल्या मुलांना स्पॅनिश भाषा आणि संस्कृतीचा अभिमान बाळगायला प्रेरणा मिळाली. अशा क्षणांमुळे आमच्या अधिवेशनामागचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल झाला, असे मला आजही वाटते.

**BMM सारख्या मोठ्या अधिवेशनाचे यश हे केवळ व्यवस्थापन नसून लोकांना जोडण्याचे काम असते. या अनुभवातून पुढील पिढीतील स्वयंसेवक आणि नेतृत्व करणाऱ्यांना आपण कोणता संदेश द्याल?**

या प्रश्नाचे उत्तर संत ज्ञानेश्वर माऊलींनी अनेक शतके पूर्वीच *पसायदानात* दिले आहे"मैत्र जीवाचे." माझ्या दृष्टीने हाच खऱ्या नेतृत्वाचा गाभा आहे. पुढील पिढीतील स्वयंसेवक आणि नेतृत्व करणाऱ्यांसाठी माझा संदेश असा आहे की, सर्वप्रथम आपल्या कामाचे ध्येय, उद्दिष्ट आणि दिशा स्पष्ट ठेवा. लोकांना एखाद्या कार्यासाठी वेळ आणि मनापासून योगदान द्यायचे असेल, तर त्यांना त्या कार्यामागचा हेतू समजला पाहिजे. दुसरे म्हणजे, प्रत्येकाचे विचार मनापासून ऐका. सर्वोत्तम कल्पना नेहमी नेतृत्वाकडूनच येतात असे नाही. आणि तिसरे म्हणजे, प्रत्येकाला फक्त यश साजरे करण्यासाठी नव्हे तर प्रत्यक्ष कामात सहभागी करून घ्या. जेव्हा लोकांना जबाबदारी दिली जाते, तेव्हाच स्वयंसेवकातून नेता घडतो.

शेवटी, बीएमएमसारखे अधिवेशन केवळ नियोजन, वेळापत्रक किंवा व्यवस्थापनामुळे यशस्वी होत नाही. ते यशस्वी होते कारण प्रत्येकाला तिथे *आपलेपणाची भावना* मिळते. "मैत्र जीवाचे" हा विचार आपण जपला, तर बाकीचे व्यवस्थापन आपोआप घडत जाते.

**महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट आणि VSS फाउंडेशनच्या माध्यमातून आपण सांस्कृतिक आणि शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये काम करताना आपली प्रमुख प्रेरणा काय राहिली?**

माझ्या प्रेरणेबद्दल बोलायचे झाले तर, मी स्वतःला अत्यंत भाग्यवान समजते. मला उत्तम संस्कार देणारे आई-वडील, भावंडे, माझे पती, मुले आणि सासरचे कुटुंब यांचा नेहमीच भक्कम पाठिंबा लाभला. त्याचबरोबर अनेक गुरु, सहकारी, वरिष्ठ आणि शिक्षक यांनी माझ्यावर चांगले संस्कार केले आणि उत्तम शिक्षण दिले. समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा एखाद्या एका घटनेतून आलेली नाही. आयुष्यात भेटलेल्या या सर्व व्यक्तींनी मला जे दिले, त्याची परतफेड करण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न आहे. महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट आणि VSS Foundation च्या माध्यमातून मी जे काही करू शकले, ते या सर्वांच्या प्रेम, संस्कार आणि विश्वासामुळेच शक्य झाले.

**VSS फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपण काम करता. एका विद्यार्थ्याच्या आयुष्यात झालेला बदल पाहताना आपल्याला मिळालेला सर्वात मोठा आनंदाचा क्षण कोणता?**

एका विद्यार्थ्याची किंवा एका प्रसंगाची गोष्ट सांगणे खरोखरच कठीण आहे. गेली ७० वर्षे विद्यार्थी सहाय्यक समिती हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडवत आहे. आज जगभरात विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले अनेक माजी विद्यार्थी मला भेटतात आणि प्रत्येकाची कथा प्रेरणादायी असते.

समिती विद्यार्थ्यांना योग्य संधी, शिस्त आणि आधार देते. त्या बळावर हे विद्यार्थी किती उंच भरारी घेऊ शकतात, याची मला प्रत्येक वेळी नव्याने जाणीव होते. म्हणूनच मी शक्य तितक्या वेळा समितीला भेट देते. प्रत्येक भेटीनंतर मी नव्या प्रेरणेने परतते. माझी सर्वांना विनंती आहे की, एकदा तरी विद्यार्थी सहाय्यक समितीला भेट द्या, विद्यार्थ्यांशी संवाद साधा. त्यांची जिद्द, स्वप्ने आणि मेहनत

पाहिल्यावर तुम्हालाही माझ्यासारखाच आनंद आणि आशा वाटेल. कदाचित म्हणूनच उत्तर अमेरिकेतील VSS Foundation ने गेल्या वर्षी सुमारे **$700,000** निधी उभारला. या निधीतील प्रत्येक डॉलर विद्यार्थ्यांच्या निवास, शिक्षण आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खर्च केला जातो.

**University of Michigan सारख्या मोठ्या संस्थेत नेतृत्व करताना आणि मराठी समाजासाठी स्वयंसेवा करताना व्यावसायिक नेतृत्व आणि सामाजिक नेतृत्व यातला सर्वात मोठा फरक आपल्याला काय जाणवतो?**

माझ्या मते नेतृत्वाची मूलभूत तत्त्वे बदलत नाहीत. कॉर्पोरेट क्षेत्र असो किंवा सामाजिक संस्था—दृष्टी, मूल्ये, समर्पण, प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही नेतृत्वाची समान तत्त्वे आहेत. मात्र एक महत्त्वाचा फरक आहे. व्यावसायिक संस्थेत आपण कर्मचाऱ्यांसोबत काम करता, तर सामाजिक संस्थेत स्वयंसेवकांसोबत. कर्मचारी त्यांच्या कामासाठी मानधन घेतात; स्वयंसेवक मात्र कोणत्याही मोबदल्याशिवाय, केवळ बांधिलकी आणि आवडीपोटी काम करतात. त्यामुळे त्यांचे नेतृत्व करण्याची पद्धत पूर्णपणे वेगळी असते. कॉर्पोरेट संस्थांमध्ये ठराविक पदसोपान असते आणि गरज पडल्यास कामाची जबाबदारी आदेशाद्वारे सोपवता येते. सामाजिक संस्थांमध्ये तसे नसते. स्वयंसेवकाला कधीही काम थांबवण्याचे स्वातंत्र्य असते. त्यामुळे सामाजिक नेतृत्वात अधिकारापेक्षा विश्वास, संवाद आणि प्रेरणा अधिक महत्त्वाची ठरते. म्हणूनच सामाजिक नेतृत्व हे अनेकदा व्यावसायिक नेतृत्वापेक्षा अधिक आव्हानात्मक असते, पण त्याचबरोबर ते अधिक समाधान देणारेही असते. University of Michigan मध्ये मी शिस्त, उत्तरदायित्व आणि व्यवस्थापनाच्या आधारावर नेतृत्व करते; तर मराठी समाजात मी सामायिक ध्येय, परस्पर विश्वास आणि प्रेरणा यांच्या बळावर नेतृत्व करण्याचा प्रयत्न करते.

- मुलाखतकार:**अश्विनी क्षीरसागर**, (बीएमएम२०२६ समिती)




## बीएमएम २०२६: 'स्त्री'सन्मान: विद्या जोशी

**डॉक्टर ते बीएमएम अध्यक्ष -एका प्रेरणादायी प्रवासाची कहाणी**



**त्यांची थोडक्यात ओळख**

**डॉ. विद्या जोशी** या होमिओपॅथी डॉक्टर, लेखिका, शिक्षणतज्ज्ञ आणि उत्तर अमेरिकेतील मराठी समाजातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी २०१९ ते २०२२ या कालावधीत बृहन्महाराष्ट्र मंडळ च्या अध्यक्ष म्हणून यशस्वी नेतृत्व केले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात न्यू जर्सी येथे भरलेले २० वे बीएमएम अधिवेशन अत्यंत यशस्वी ठरले. मराठी भाषा, संस्कृती, शिक्षण, समाजसेवा आणि समुदाय विकास या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले असून, उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाला एकत्र आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

**होमिओपॅथी डॉक्टर, लेखिका, मॉडेल आणि समाजसेविका इतक्या विविध क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करण्यामागची प्रेरणा आणि प्रवास कसा होता?**

हा प्रश्न मला नेहमी विचारला जातो आणि खरं सांगायचं तर मला स्वतःलाही कधी कधी आश्चर्य वाटतं की हा प्रवास इतका विविधांगी कसा घडला! पण माझ्या दृष्टीने ही सगळी क्षेत्रं वेगवेगळी नाहीत. त्या सगळ्यांचा समान धागा एकच आहे, माणसांशी जोडून राहणं आणि त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणं.

माझ्या आयुष्याची सुरुवात एक डॉक्टर म्हणून झाली. होमिओपॅथीचं शिक्षण घेत असताना आणि नंतर स्वतःचा दवाखाना सुरू केल्यानंतर मला हजारो रुग्णांना भेटण्याची संधी मिळाली. प्रत्येक रुग्ण फक्त आजार घेऊन येत नव्हता; तो त्याच्या आयुष्याची एक कथा घेऊन यायचा. त्यांचे संघर्ष, त्यांची भीती, त्यांची आशा... हे सगळं जवळून अनुभवताना मला जाणवलं की डॉक्टरचं काम फक्त औषध देण्यापुरतं मर्यादित नसतं. एखाद्याला धीर देणं, त्याचा आत्मविश्वास वाढवणं आणि त्याच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणं, हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. याच

अनुभवातून मला लेखनाची प्रेरणा मिळाली. अनेक गैरसमज, अपुरी माहिती आणि होमिओपॅथीबद्दलची उत्सुकता पाहून मला वाटलं की माझे अनुभव पुस्तकाच्या स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. त्यातून होमिओपॅथी - एक वरदान हे पुस्तक जन्माला आलं. माझ्यासाठी ते केवळ पुस्तक नव्हतं; तर माझ्या व्यावसायिक अनुभवाचं आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीचं प्रतिबिंब होतं.

लोकांना कदाचित आश्चर्य वाटेल, पण मॉडेलिंगचाही माझ्या आयुष्यात महत्त्वाचा वाटा आहे. अनेकांना वाटतं की मॉडेलिंग म्हणजे फक्त बाह्य सौंदर्य. पण माझ्यासाठी ते आत्मविश्वास, शिस्त, व्यक्तिमत्त्व विकास आणि स्वतःला प्रभावीपणे सादर करण्याचं माध्यम होतं. समाजात काम करताना, हजारो लोकांसमोर बोलताना किंवा एखाद्या मोठ्या संस्थेचं नेतृत्व करताना याच कौशल्यांचा मला खूप उपयोग झाला.

त्यानंतर आयुष्यात एक मोठं वळण आलं -अमेरिकेत स्थलांतर. नवीन देश, नवीन संस्कृती आणि नवीन आयुष्य. पण एक गोष्ट मात्र बदलली नाही, समाजासाठी काहीतरी करण्याची ओढ. अमेरिकेत आल्यानंतर मला जाणवलं की इथे राहणाऱ्या मराठी कुटुंबांमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल प्रेम आहे, पण त्यांना एकत्र आणणारे, जोडून ठेवणारे आणि पुढच्या पिढीपर्यंत हा वारसा पोहोचवणारे अधिक उपक्रम आवश्यक आहेत. तिथून महाराष्ट्र मंडळ शिकागो, BMM, शिकागो मराठी शाळा आणि नंतर 'सहाय्य' फाउंडेशनचा आता कॅनडामध्ये, Milton Marathi Association च्या माध्यमातूनही मराठी समाजाशी जोडले जाण्याची संधी मिळत आहे. या संस्थेच्या अनेक सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये निवेदिका (Master of Ceremonies) म्हणून काम करण्याचा मला आनंद मिळतो. अशा कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करताना केवळ कार्यक्रम सादर करण्याची जबाबदारी नसते, तर उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण करणे, विविध पिढ्यांना एकत्र जोडणे आणि मराठी भाषा, संस्कृती व परंपरेचा अभिमान जपणारे वातावरण निर्माण करणे हे ही तितकेच महत्त्वाचे असते.

आज मागे वळून पाहताना मला वाटतं की या सगळ्या भूमिका डॉक्टर, लेखिका, मॉडेल, प्रशासक, समाजसेविका किंवा नेता या वेगळ्या नसून एका ध्येयाच्या विविध अभिव्यक्ती आहेत. प्रत्येक भूमिकेने मला काहीतरी शिकवलं, अधिक संवेदनशील बनवलं आणि लोकांशी जोडण्याची क्षमता वाढवली.

माझा नेहमी एकच विश्वास राहिला आहे आपण किती मोठं यश मिळवलं यापेक्षा, आपल्या कामामुळे किती लोकांच्या आयुष्यात आनंद, आशा आणि संधी निर्माण झाल्या, हेच आपल्या यशाचं खरं मोजमाप आहे. आजही मला नवीन प्रकल्प सुरू करण्याची, समाजाला काहीतरी परत देण्याची आणि पुढच्या पिढीसाठी काहीतरी शाश्वत निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. कारण सेवा ही माझ्यासाठी जबाबदारी नाही ती माझी जीवनशैली आहे.

**शिकागोमध्ये मराठी शाळेची स्थापना करून ती Illinois State Board मान्यताप्राप्त संस्थेपर्यंत नेण्याचा प्रवास कसा घडला? आजच्या पिढीमध्ये मराठी भाषा आणि संस्कृती जपताना कोणती आव्हाने आणि समाधानाचे क्षण अनुभवले?**

२०१४ साली श्री. नितीन जोशी यांच्या प्रेरणेने आणि बीएमएमच्या मार्गदर्शनाखाली शिकागो मराठी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी आमच्यासमोर एकच ध्येय होते, उत्तर अमेरिकेत वाढणाऱ्या मराठी मुलांना केवळ भाषा शिकवायची नाही, तर त्यांना त्यांच्या संस्कृतीशी, परंपरांशी आणि मराठी अस्मितेशी जोडून ठेवायचे. या प्रवासाची सुरुवात अवघ्या ५० विद्यार्थ्यांपासून झाली. आज अभिमानाने सांगता येते की हीच संस्था ३०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. हा प्रवास निश्चितच सोपा नव्हता. प्रत्येक टप्प्यावर नवनवीन आव्हाने होती, पण त्याचबरोबर प्रत्येक यशाने पुढे जाण्याची नवी ऊर्जा दिली.

सुरुवातीला वर्गांसाठी योग्य जागा मिळवणे, अभ्यासक्रम तयार करणे, विविध वयोगटांसाठी अध्यापन पद्धती विकसित करणे, स्वयंसेवी शिक्षकांचे प्रशिक्षण, पालकांचा विश्वास संपादन करणे आणि समाजाला या उपक्रमाशी जोडणे—ही सर्व मोठी आव्हाने होती. अमेरिकेत वाढणाऱ्या मुलांसाठी मराठी शिकणे हा एक आनंददायी आणि संवादात्मक अनुभव असावा, यासाठी आम्ही अभ्यासक्रमात भाषा, साहित्य, कथा, गाणी, खेळ, सण-उत्सव आणि सांस्कृतिक उपक्रम यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला.

माझ्या मते, मराठी शिकवणे म्हणजे केवळ बाराखडी किंवा व्याकरण शिकवणे नाही; तर मुलांना त्यांच्या ओळखीशी जोडणे आहे. जेव्हा एखादे मूल पहिल्यांदा मराठीत गोष्ट वाचते, आपल्या आजी-आजोबांशी मराठीत संवाद साधते किंवा मंचावर उभे राहून आत्मविश्वासाने मराठीत बोलते, तेव्हा त्या क्षणाचे समाधान शब्दांत व्यक्त करता येत नाही. त्या क्षणांमध्ये आपल्या प्रयत्नांचे खरे सार्थक झाल्याची जाणीव होते.

या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे Illinois State Board कडून मान्यता (Accreditation)

मिळवणे. त्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक निकष पूर्ण करणे, अभ्यासक्रमाचे मानकीकरण, प्रशासकीय प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि मान्यतेसाठीचा सविस्तर अर्ज तयार करणे, ही अत्यंत वेळखाऊ आणि जबाबदारीची प्रक्रिया होती. मात्र संपूर्ण टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही मान्यता मिळाली आणि मराठी भाषेला शैक्षणिक स्तरावर एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. हा केवळ मराठी शाळेचाच नव्हे, तर संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समाजासाठी अभिमानाचा क्षण होता.

आजही आव्हाने आहेत. इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व, मुलांचे व्यस्त वेळापत्रक आणि डिजिटल युगातील बदलती जीवनशैली यामुळे मातृभाषेशी सातत्याने नाते जोडून ठेवण्यासाठी अधिक नाविन्यपूर्ण प्रयत्न करावे लागतात. परंतु त्याचबरोबर पालकांचा वाढता सहभाग, स्वयंसेवी शिक्षकांचे समर्पण आणि मुलांचा उत्साह हे आमच्यासाठी मोठे प्रेरणास्थान आहे. माझा ठाम विश्वास आहे की भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसते; ती संस्कृती, मूल्ये, इतिहास आणि आपल्या ओळखीचा पाया असते. मराठी शाळा ही मुलांना भाषा शिकवण्याबरोबरच त्यांच्या मनात मराठीपणाचा अभिमान जागवणारी एक चळवळ आहे. आज जेव्हा आमचे विद्यार्थी आत्मविश्वासाने मराठीत बोलताना, लिहिताना आणि आपल्या संस्कृतीचा अभिमानाने परिचय करून देताना दिसतात, तेव्हा वाटते, प्रवासातील प्रत्येक संघर्ष खरोखरच सार्थकी लागला.

**बीएमएमच्या अध्यक्षा म्हणून Atlantic City येथील अधिवेशनाचे नेतृत्व करताना तुमच्यासाठी सर्वात मोठे आव्हान आणि सर्वात संस्मरणीय क्षण कोणता होता?**

माझ्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा कदाचित बीएमएमच्या इतिहासातील सर्वात आव्हानात्मक काळांपैकी एक होता. कारण ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर काहीच महिन्यांत संपूर्ण जग कोविड-१९च्या संकटाला सामोरं गेलं. अशा वेळी मला जाणवलं की, नेतृत्व म्हणजे केवळ कार्यक्रमांचं नियोजन किंवा संस्था चालवणं नव्हे, तर संवेदनशील, सेवाभावी आणि लोकांना आधार देणारं नेतृत्व देणं अधिक महत्त्वाचं आहे.

कोविडच्या काळात अनेक मराठी कुटुंबं भारतात किंवा इतर देशांमध्ये अडकली होती. काहींना वैद्यकीय मदतीची गरज होती, काहींना प्रवासासंदर्भात मार्गदर्शन हवं होतं, तर अनेक कुटुंबांना मानसिक आधाराची गरज होती. त्या काळात आम्ही BMM COVID Helpline सुरू केली. त्याचबरोबर Deep Stambha सारख्या उपक्रमांद्वारे प्रवासाशी संबंधित अडचणीत असलेल्या शेकडो लोकांना मदत केली. त्या काळाने आम्हाला शिकवलं की, संस्था ही फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नसते; संकटाच्या काळात समाजाचा विश्वास बनून उभी राहणं ही तिची खरी ओळख असते. या सगळ्यानंतर Atlantic City Convention आयोजित करणं हे आणखी एक मोठं आव्हान होतं. कोविडनंतर लोकांचा आत्मविश्वास परत मिळवणं, प्रायोजकांचा विश्वास संपादन करणं, स्वयंसेवकांना पुन्हा एकत्र आणणं आणि संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाला आभासी माध्यमांद्वारे (Virtual Media) सातत्याने जोडून ठेवणं, ही अत्यंत कठीण पण तितकीच महत्त्वाची जबाबदारी होती. या अधिवेशनामागे २५० हून अधिक स्वयंसेवकांची अथक मेहनत, हजारो सहभागींचा विश्वास आणि लाखो डॉलर्सच्या नियोजनाचं मोठं व्यवस्थापन होतं. विशेष आनंदाची बाब म्हणजे, इतक्या मोठ्या प्रमाणावर अधिवेशन यशस्वीपणे पार पाडतानाच आर्थिकदृष्ट्याही ते सक्षम ठरलं आणि अधिवेशनाने $50,000 पेक्षा अधिक शिल्लक (surplus) निर्माण केला. माझ्यासाठी हा केवळ आर्थिक आकडा नव्हता; तर नियोजन, पारदर्शकता, टीमवर्क आणि सर्वांच्या विश्वासाचं प्रतीक होता. पण माझ्यासाठी सर्वात संस्मरणीय क्षण कोणता असेल, तर तो अधिवेशनाच्या उद्घाटनाचा. हजारो मराठी बांधव एकाच छताखाली, उत्साहाने, अभिमानाने आणि आपुलकीने एकत्र आलेले पाहताना माझ्या डोळ्यांत अक्षरशः आनंदाश्रू आले. त्या क्षणी मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—हे माझं यश नव्हतं; हे प्रत्येक स्वयंसेवकाचं, प्रत्येक प्रायोजकाचं, प्रत्येक सहभागीचं आणि संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाचं सामूहिक यश होतं. आजही त्या क्षणाची आठवण झाली की मन अभिमानाने भरून येतं. कारण त्या अधिवेशनाने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी समाज एकत्र आला, तर कोणतंही आव्हान अशक्य राहत नाही.

**बीएमएमच्या सचिव आणि अध्यक्षा या दोन्ही भूमिकांमध्ये काम करताना उत्तर अमेरिकेतील मराठी समाजासाठी कोणते उपक्रम सर्वाधिक प्रभावी ठरले, असे तुम्हाला वाटते?**

माझ्या मते, कोणताही उपक्रम तेव्हाच यशस्वी ठरतो, जेव्हा तो लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवतो. बीएमएमच्या सचिव आणि अध्यक्षा म्हणून काम करताना हाच विचार प्रत्येक उपक्रमामागे होता, समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा. COVID हेल्पलाइन, Deep Stambha, Reshim Gathi, Uttar Rang, युवक विकास, मराठी शाळा, महिला सक्षमीकरण, तसेच Netak Mogra, "लेखक तुमच्या भेटीला" आणि लेखन

कार्यशाळांसारख्या उपक्रमांद्वारे BMM ने समाज, शिक्षण, साहित्य आणि संस्कृती या सर्व क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले. आज BMM ही केवळ सांस्कृतिक संस्था नसून सर्वसमावेशक, समाजाभिमुख आणि परिवर्तन घडवणारी संस्था म्हणून विकसित झाली आहे.

**तुमच्या मते, पुढील दशकात बीएमएमची भूमिका कशी विकसित व्हावी? विशेषतः युवा पिढी, महिला सक्षमीकरण आणि मराठी भाषा-संस्कृतीच्या जतनासाठी कोणत्या दिशा महत्त्वाच्या ठरतील?**

माझ्या मते, पुढील दशकात BMM ही केवळ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणारी संस्था न राहता उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाला दिशा देणारी, नेतृत्व घडवणारी आणि विविध पिढ्यांना जोडणारी सर्वसमावेशक संस्था बनायला हवी. संस्कृती जपत असतानाच नेतृत्व विकास, युवक सहभाग, महिला सक्षमीकरण, व्यावसायिक नेटवर्किंग, उद्योजकता आणि समाजसेवा या क्षेत्रांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. मराठी भाषा आणि संस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी AI, डिजिटल शिक्षण, पॉडकास्ट, वेबिनार आणि सोशल मीडियासारख्या आधुनिक माध्यमांचा प्रभावी वापर करायला हवा. परंपरा आणि नवोपक्रम यांचा समतोल साधला, तर BMM ही केवळ उत्तर अमेरिकेपुरती मर्यादित न राहता जागतिक मराठी समाजासाठी प्रेरणादायी संस्था ठरेल आणि पुढील पिढी अभिमानाने म्हणेल—"आम्ही जागतिक नागरिक आहोत, पण आमची मुळे मराठी आहेत.

**आज BMM Seattle 2026 चे आयोजन होत असताना, आयोजक स्वयंसेवकांना आणि अधिवेशनात सहभागी होणाऱ्या मराठी समाजाला तुम्ही कोणता संदेश द्याल?**

सिॲटल, २०२६ चे सर्व आयोजक, स्वयंसेवक आणि अधिवेशनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक मराठी बांधवाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा. असे अधिवेशन हे केवळ तीन दिवसांचा सांस्कृतिक सोहळा नसतो; तो असतो अनेक वर्षांच्या स्वप्नांचा, अथक परिश्रमांचा, निस्वार्थ सेवाभावाचा आणि शेकडो स्वयंसेवकांच्या समर्पणाचा सुंदर उत्सव. पडद्यामागे शांतपणे काम करणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकामुळेच हा सोहळा यशस्वी होतो. त्यांचे योगदान दिसत नसले, तरी प्रत्येक हसऱ्या चेहऱ्यामागे त्यांची मेहनत आणि समर्पण दडलेले असते.

एक छोटीशी ओळ आठवते -

"माणसं जोडत गेलो, तरच समाज घडतो;
संस्कृती जपत राहिलो, तरच वारसा टिकतो."

अधिवेशनात सहभागी होणाऱ्या सर्वांना माझा एकच संदेश आहे—या प्रत्येक क्षणाचा मनापासून आनंद घ्या. कार्यक्रमांचा आस्वाद घ्या, नव्या मैत्री जोडा, जुन्या नात्यांना नव्याने उजाळा द्या आणि आपल्या मुलांना या संस्कृतीचा अनुभव जगू द्या. कारण संस्कृती केवळ पुस्तकांतून शिकवली जात नाही; ती अशा भेटींमधून, संवादातून आणि सामूहिक अनुभवातून पुढच्या पिढीकडे पोहोचते. माझ्यासाठी BMM म्हणजे केवळ एक संस्था नाही, तर जगभर विखुरलेल्या मराठी मनांना जोडणारा भावनिक सेतू आहे. भौगोलिक अंतर कितीही असले, तरी भाषा, संस्कृती आणि आपुलकीची नाळ आपल्याला कायम एकत्र ठेवते.

शेवटी, कुसुमाग्रजांच्या भावनेला साजेशा काही ओळी -

"जिथे मराठी मनं एकत्र येतात, तिथे अंतरांची सारी बंधनं विरघळून जातात.

हातात हात, मनाशी मन जोडत, आपण संस्कृतीचा दीप पुढे नेत राहतो.

कारण 'आम्ही जगभर विखुरलो असलो, तरी आमची मुळे मराठी मातीतच रुजलेली आहेत.'

सिॲटल, २०२६ हे अधिवेशन केवळ आठवणी देणारे ठरू नये, तर नव्या नात्यांची, नव्या संकल्पांची आणि नव्या प्रेरणेची सुरुवात ठरो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.

मुलाखतकार: **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम२०२६ समिती)



# बीएमएम २०२६: 'स्त्री'सन्मान: प्राजक्ता (सारा) बोंगाळे

**BMM 2026: 'स्त्री'सन्मान: कोकणच्या लाल मातीतून अमेरिकन आर्मीपर्यंत: अमेरिकन सैन्यातील एका मराठी महिलेची यशोगाथा**



**प्राजक्ता (सारा) बोंगाळे,** यांचा बीएमएम २०२६ अधिवेशनात 'स्त्रीत्वाचा सन्मान' उपक्रमांर्गत विशेष सन्मान केला जाणार आहे, त्यासंदर्भात त्यांच्याशी साधलेला संवाद

**त्यांची थोडक्यात ओळख**

प्राजक्ता (सारा) बोंगाळे या दापोलीच्या कन्येने जिद्द, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर एक प्रेरणादायी प्रवास घडवला आहे. Clinical Research Professional म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी अमेरिकन सैन्यदलाचे (U.S. Army) कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून सध्या यु.एस. आर्मी मेडिकल डिपार्टमेंटमध्ये सेवा बजावत आहेत. उत्कृष्ट नेमबाजीसाठी Marksmanship Medal आणि प्रशिक्षणातील सर्वोच्च शैक्षणिक गुणवत्तेचा सन्मान मिळवणाऱ्या प्राजक्ता या USA Mrs. Midwest Universe किताबाच्या मानकरीही आहेत. विज्ञान, सौंदर्य स्पर्धा आणि सैन्य अशा तिन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत त्यांनी अनेक महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला असून, अमेरिकन सैन्यात सेवा देणाऱ्या महाराष्ट्रातील मराठी महिला म्हणून त्यांनी महाराष्ट्राचा जागतिक स्तरावर गौरव वाढवला आहे.

**दापोलीसारख्या छोट्या गावातून सुरू झालेला तुमचा प्रवास आज अमेरिकन सैन्यापर्यंत पोहोचला आहे. या प्रवासाची सुरुवात कशी झाली?**

कोकणातील दापोली ही माझी जन्मभूमी. सह्याद्री, अरबी समुद्र आणि लाल मातीने नटलेल्या या भूमीने माझ्या व्यक्तिमत्त्वाला जिद्द, साधेपणा, कष्टाची तयारी आणि संकटांवर मात करण्याची ताकद दिली. त्याला माझ्या आई-वडिलांच्या प्रामाणिकपणा, शिस्त आणि चिकाटीच्या संस्कारांची जोड मिळाली. या भूमीने लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांची प्रेरणा दिली, तर आई-वडिलांनी मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा आत्मविश्वास दिला.

दापोलीपासून अमेरिकन सैन्यापर्यंतचा माझा प्रवास हा एका दिवसाचा नव्हे; तो कोकणच्या लाल मातीतून मिळालेल्या जिद्दीचा, आई-वडिलांच्या संस्कारांचा आणि कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्याचा परिणाम आहे.

**लहानपणापासूनच सैन्यदलाबद्दल आकर्षण आणि देशसेवेची भावना होती. ही प्रेरणा कुठून मिळाली?**

मी माध्यमिक शाळेत असताना आमच्या शाळेत एन.सी.सी.चे प्रशिक्षण होते. त्या काळापासूनच लष्करी अधिकाऱ्यांबद्दल माझ्या मनात विशेष आकर्षण आणि आदर होता. एन.सी.सी.चा गणवेश परिधान करून शिस्तबद्ध पद्धतीने परेड करताना मनात एक वेगळीच ऊर्जा निर्माण व्हायची. मात्र केवळ गणवेषाचे आकर्षण नव्हते; त्या मागील शिस्त, कठोर प्रशिक्षण, नेतृत्वगुण, संघभावना आणि देशसेवेची भावना मला अधिक भावली. एन.सी.सी.मधील प्रशिक्षणामुळे सैन्य जीवनातील कठोर शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षणाबद्दल माझ्या मनात विशेष ओढ निर्माण झाली आणि एक दिवस स्वतः सैनिक बनायचे हे स्वप्न अधिक दृढ झाले. मी शालेय जीवनात खेळाडू देखील होते. त्यामुळे शिस्त, नियमित सराव, शारीरिक तंदुरुस्ती, सहनशक्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती हे गुण लहानपणापासूनच माझ्यामध्ये विकसित झाले. पुढे अमेरिकन सैन्याच्या कठोर प्रशिक्षणादरम्यान याच गुणांचा मला मोठा फायदा झाला.

**कॅन्सर संशोधनासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात काम करत असताना सैन्यात जाण्याचा निर्णय घेणे हा मोठा बदल होता. हा निर्णय कसा घेतला?**

सैन्यात भरती होण्याचे स्वप्न मी लहानपणापासून पाहिले होते. मात्र महाविद्यालयीन काळातील अपघातामुळे ते काही काळ बाजूला ठेवावे लागले. अमेरिकेत स्थायिक झाल्यानंतर Clinical Research Professional म्हणून कॅन्सर संशोधन क्षेत्रात काम केले, तसेच मॉडेलिंग आणि सौंदर्य स्पर्धांमध्ये सहभागी होऊन Mrs. Midwest Universe USA हा किताब मिळवला. पण मनातील देशसेवेचे स्वप्न कायम जिवंत राहिले. अमेरिकन सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेताना पती श्री. समीर बोंगाळे, वडील डॉ. चंद्रमोहन भांबुरे आणि कुटुंबाचा खंबीर पाठिंबा मिळाला. त्यांच्या विश्वासामुळे मी आवश्यक निकष पूर्ण करून U.S. Army मध्ये दाखल झाले. विज्ञान, संशोधन, मॉडेलिंग आणि सैन्य ही क्षेत्रे वेगवेगळी असली तरी त्यांना जोडणारी

मूल्ये समान आहेत: शिस्त, समर्पण, सातत्य आणि उत्कृष्टतेचा ध्यास. कोणतेही काम पूर्ण मनाने आणि प्रामाणिकपणे केले, तर यशाचा मार्ग नक्कीच खुला होतो, हा माझा विश्वास आहे.

**विज्ञान क्षेत्रातील शिक्षण, Clinical Research Professional म्हणून करिअर, मॉडेलिंग आणि आता U.S. Army इतक्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वाटचाल केली. हे कसे शक्य झाले?**

मला लहानपणापासून जीवशास्त्र विषयाची विशेष आवड होती. त्यामुळे मी Endocrinology या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षणानंतर Clinical research मध्ये शिक्षण घेतले. लग्नापूर्वी मी K.E.M. Hospital येथे Diabetes research तसेच पुढे NARI म्हणजेच National AIDS Research Institute येथे काम केले. विवाहानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावर Clinical Research Professional म्हणून कॅन्सर संशोधन क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. भारतात असतानाच मॉडेलिंग आणि सौंदर्य स्पर्धांमध्ये सहभागी होत असे. पुढे अमेरिकेतही त्या क्षेत्रात काम करत राहिले आणि त्यामध्येही यश मिळाले. ही सर्व क्षेत्रे वेगवेगळी असली तरी त्यामागील मूलभूत मूल्ये समान आहेत शिस्त, समर्पण, सातत्य, कठोर परिश्रम आणि उत्कृष्टतेचा ध्यास.

Clinical Research मध्ये अचूकता, जबाबदारी आणि बारकाई आवश्यक असते. मॉडेलिंगमध्ये आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व आणि सातत्य महत्त्वाचे असते. सैन्यात शिस्त, नेतृत्व, मानसिक कणखरपणा आणि संघभावना आवश्यक असते. या प्रत्येक क्षेत्राने मला वेगवेगळ्या प्रकारे घडवले आणि अधिक सक्षम बनवले. माझी एक सवय आहे, कोणतेही काम हाती घेतले की त्यामध्ये मी स्वतःला पूर्णपणे झोकून देते आणि शंभर टक्क्यांपेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न करते. माझ्या मते कोणतेही क्षेत्र निवडा, पण प्रामाणिकपणे, समर्पणाने आणि उत्कृष्टतेचा ध्यास घेऊन काम केले, तर यश नक्की मिळते.

**लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावर कुटुंब, करिअर आणि स्वतःची स्वप्ने यांचा समतोल कसा साधला?**

कुटुंब, करिअर आणि स्वतःची स्वप्ने यांचा समतोल साधणे सोपे नसते. त्यासाठी स्वतःची इच्छाशक्ती जितकी महत्त्वाची असते, तितकाच कुटुंबाचा विश्वास आणि पाठिंबाही आवश्यक असतो. या बाबतीत मी स्वतःला भाग्यवान समजते, कारण माझे पती श्री. समीर बोंगाळे यांनी माझ्या प्रत्येक स्वप्नावर माझ्याइतकाच विश्वास ठेवला. सैन्यात जाण्याच्या प्रवासात त्यांनी मला प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि आत्मविश्वास दिला. माझी मुलगी समायरा आणि मुलगा स्वराज यांनीही परिस्थिती समजून घेत माझ्या स्वप्नासाठी साथ दिली. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी माझ्या ध्येयावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकले.

माझा विश्वास आहे की, स्त्रीच्या स्वप्नांवर विश्वास ठेवणारे आणि तिच्या ध्येयाचा आदर करणारे कुटुंब तिच्या यशाची मोठी ताकद असते. माझ्या यशामध्ये माझ्या संपूर्ण कुटुंबाचा मोलाचा वाटा आहे.

**अमेरिकन सैन्यदलाचे प्रशिक्षण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक असते. त्या काळातील सर्वात मोठे आव्हान कोणते होते?**

U.S. Army मधील प्रशिक्षण हे शारीरिक, मानसिक आणि भावनिक अशा तिन्ही स्तरांवर अत्यंत खडतर असते. प्रत्येक दिवस हा स्वतःची क्षमता सिद्ध करण्याचा असतो. प्रशिक्षणामध्ये नेमबाजी (Marksmanship), रॅपलिंग (Rappelling), Tactical Combat Casualty Care, Obstacle Course, विविध Combat Trainings, तसेच पाठीवर सुमारे ३५ पाउंड वजनाची बॅग घेऊन अनेक मैल चालणे, कठीण हवामानात प्रशिक्षण घेणे, तीन दिवस जंगलामध्ये (The Forge) राहून मिशन पूर्ण करणे अशा अनेक आव्हानात्मक टप्प्यांचा समावेश असतो. यासोबतच क्लासरूममधील प्रशिक्षणासाठी सातत्याने अभ्यास करावा लागतो, कारण प्रत्येक टप्प्यावर लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जातात. त्या उत्तीर्ण झाल्यानंतरच पुढील टप्प्यात प्रवेश मिळतो. त्यामुळे प्रत्येक दिवशी स्वतःला अधिक सक्षम सिद्ध करावे लागते. मात्र माझ्यासाठी सर्वात मोठे आव्हान शारीरिक नव्हते, तर भावनिक होते. प्रशिक्षणादरम्यान अनेक आठवडे मोबाईल वापरण्याची परवानगी नसते. त्यामुळे माझ्या मुलांचा किंवा पतीचा आवाज ऐकता येत नव्हता. त्यांच्या तब्येतीची, शिक्षणाची आणि दैनंदिन आयुष्याची माहिती फक्त पत्रांमधून मिळायची.

एक आई आणि पत्नी म्हणून हा काळ माझ्यासाठी अत्यंत भावनिक होता. मुलांची खूप आठवण यायची, त्यांच्याशी बोलावे, त्यांना मिठी मारावी असे मनापासून वाटायचे. पण त्याच वेळी मला माझे ध्येयही पूर्ण करायचे होते. त्या भावनांवर नियंत्रण ठेवून प्रशिक्षणावर पूर्ण लक्ष केंद्रित करणे, हीच माझ्यासाठी खरी परीक्षा होती.

या संपूर्ण प्रवासाने मला एक महत्त्वाचा धडा दिला सैनिक होणे म्हणजे केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे नव्हे, तर परिस्थिती कितीही

कठीण असली तरी भावनांवर नियंत्रण ठेवत कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य देणे होय.

**कुटुंबापासून दूर राहून प्रशिक्षण पूर्ण करताना तुमचा अनुभव कसा होता?**

प्रशिक्षणाच्या काळात कुटुंबापासून इतका दीर्घ काळ दूर राहण्याचा अनुभव माझ्यासाठी पूर्णपणे नवीन होता. आई म्हणून मुलांची सतत आठवण यायची. त्यांचे खाणे-पिणे, शाळा, अभ्यास आणि आरोग्य याची काळजी मनात कायम असायची. मी कधीच त्यांच्यापासून इतका काळ दूर राहिले नव्हते. समीर यांनी घरातील सर्व जबाबदाऱ्या अत्यंत समर्थपणे सांभाळल्या आणि मला नेहमी निश्चिंत राहण्याचा धीर दिला. ध्येय गाठायचे असेल तर काही त्याग अपरिहार्य असतात, हे त्या काळात प्रकर्षाने जाणवले. प्रत्येक पत्रातून मला मुलांचे प्रेम, कुटुंबाचा विश्वास आणि पुढे जाण्याची नवी ऊर्जा मिळत गेली. या अनुभवामुळे मला सैनिकांबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचीही खरी जाणीव झाली. देशसेवा करणारा सैनिक जितका त्याग करतो, तितकाच त्याच्या कुटुंबालाही करावा लागतो. त्यामुळे आज सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांविषयी माझ्या मनात अधिक आदर आहे.

**प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट नेमबाजीसाठी मार्क्समनशिप पदक आणि शैक्षणिक कामगिरीबद्दल विशेष गौरव मिळाला. त्या क्षणाचा अनुभव कसा होता?**

प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट नेमबाजीसाठी मला Marksmanship Medal मिळाले, तसेच AIT मधील शैक्षणिक प्रशिक्षणात प्रथम क्रमांक मिळवण्याचा सन्मानही मिळाला. हे दोन्ही क्षण माझ्यासाठी अभिमानाचे आणि अविस्मरणीय आहेत.

हे पुरस्कार केवळ माझे वैयक्तिक यश नसून, त्यामागील मेहनत, शिस्त, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा विश्वास यांचे प्रतीक आहेत. एक चांगला सैनिक शारीरिकदृष्ट्या सक्षम असण्याबरोबरच बौद्धिकदृष्ट्याही सक्षम असावा, हा माझा विश्वास आहे.

या सन्मानांमुळे मला जाणवले की, प्रामाणिक मेहनत, सातत्य आणि स्वतःवरील विश्वास असेल तर कोणतेही ध्येय साध्य करता येते.

**तुमच्या या प्रवासात पती समीर बोंगाळे आणि कुटुंबाचा मोठा आधार राहिला. त्यांच्या पाठिंब्याबद्दल तुम्ही काय सांगाल? आई, पत्नी आणि व्यावसायिक व्यक्ती या सर्व भूमिका सांभाळताना तुम्ही स्वतःला कसे प्रेरित ठेवले?**

आज मी जे काही साध्य करू शकले आहे, त्यामागे माझे पती श्री. समीर बोंगाळे आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्यांनी माझ्या स्वप्नांवर विश्वास ठेवला आणि प्रत्येक टप्प्यावर खंबीर साथ दिली. Basic Combat Training आणि AIT च्या काळात समीर यांनी घर, मुलांचे शिक्षण आणि सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या, त्यामुळे मी प्रशिक्षणावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकले. माझी मुले समायरा आणि स्वराज तसेच माझे आई-वडील, सासू-सासरे आणि कुटुंबीयांनी दिलेला मानसिक आधार माझी मोठी ताकद ठरला. त्यामुळे हे यश केवळ माझे नसून माझ्या संपूर्ण कुटुंबाचे आहे, असे मी मानते. आई, पत्नी, व्यावसायिक आणि सैनिक या सर्व भूमिका निभावताना शिस्त, वेळेचे नियोजन, सकारात्मक दृष्टिकोन आणि ध्येयाप्रती निष्ठा यांनी मला पुढे जाण्याची प्रेरणा दिली. स्वप्ने कितीही मोठी असली, तरी मेहनत, त्याग आणि सातत्याने ती नक्की पूर्ण होतात.

**सध्या यु.एस. आर्मी मेडिकल डिपार्टमेंटमध्ये सेवा देताना तुमची पुढील उद्दिष्टे काय आहेत?**

सध्या मी U.S. Army Medical Department मध्ये सेवा देत असून, माझे पहिले उद्दिष्ट म्हणजे माझ्यावर सोपविलेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे, शिस्तीने आणि उत्कृष्टतेने पार पाडणे. सक्षम टीम सदस्य म्हणून सर्वोत्तम आरोग्यसेवा देण्याचा माझा नेहमी प्रयत्न राहील. यापुढेही नवीन कौशल्ये आत्मसात करणे, नेतृत्वगुण विकसित करणे आणि अधिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी स्वतःला तयार ठेवणे हे माझे ध्येय आहे. Clinical Research मधील अनुभव आणि सैन्यातील प्रशिक्षण यांचा उपयोग आरोग्यसेवा क्षेत्रात अधिक प्रभावी योगदान देण्यासाठी करणे, ही माझी पुढील वाटचाल असेल.

**कुटुंबात सैन्याची पार्श्वभूमी नसतानाही तुम्ही हा मार्ग निवडला. इतर महिलांना तुम्ही काय संदेश द्याल?**

माझ्या कुटुंबात सैन्याची कोणतीही पार्श्वभूमी नव्हती. तरीही मी हे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मला मनापासून वाटते की कोणत्याही स्वप्नासाठी पार्श्वभूमीपेक्षा तुमची जिद्द, मेहनत आणि स्वतःवरील विश्वास अधिक महत्त्वाचा असतो. मी सर्व महिलांना एवढेच सांगू इच्छिते की, स्वतःची इतरांशी तुलना करू नका. प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो. स्पर्धा दुसऱ्यांशी नसून स्वतःशी असावी. कालपेक्षा आज अधिक चांगले बनण्याचा प्रयत्न करा. उत्साह, उपक्रमशीलता आणि सकारात्मक दृष्टिकोन हे सुंदर आयुष्याचे आधारस्तंभ आहेत. जिद्द, चिकाटी, शिस्त, प्रामाणिक प्रयत्न आणि दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर कोणतेही ध्येय अशक्य राहत नाही. स्वप्ने नेहमी उघड्या डोळ्यांनी पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी डोळे

मिटेपर्यंत अथक प्रयत्न करा. आयुष्यात कितीही अडचणी आल्या तरी हार मानू नका. प्रत्येक अडथळा आपल्याला काहीतरी नवीन शिकवून जातो आणि अधिक मजबूत बनवतो. आज मी कोकणातील दापोलीसारख्या छोट्या गावातून अमेरिकन सैन्यापर्यंतचा प्रवास करू शकले, तर कोणतीही मुलगी तिच्या मनातले कोणतेही स्वप्न नक्कीच पूर्ण करू शकते, यावर माझा ठाम विश्वास आहे.

मुलाखतकार: **अश्विनी क्षीरसागर**, (बीएमएम२०२६ समिती)












ICICI Bank
USA
Remit money to any bank in India with Money2India
Promo Code IND40
for an enhanced rate of 40-paise*
Key Features:
Competitive exchange rates and instant transfers**
Zero fee for transfers above USD 1,000
Send USD 300,000 or more in a single transaction#
Scan the code to register now
575, 5th Avenue, Suite 2600, New York, NY 10017
+1-646-827-8450
moneytoindia@icicibank.com
www.money2india.com
T&Cs apply.
*The 40-paise better rate applies to the first transfer up to USD 1,500. Standard rates apply for additional amounts. The offer is valid for new customers for 60 days from the date of registration.
**Instant transfers are available only to express customers and credit usually takes less than 4 hours and depends on US and Indian banking hours.
#Transactions above USD 300,000 require additional documentation and approvals, as per applicable regulations.



The World.
On Your Terms.
Travel when you want.
Where you want.
With whom you want.
A family vacation to Europe. A spiritual journey in India. A scenic rail journey through Switzerland. An African safari. A self-drive holiday in New Zealand. A cultural journey through Japan or Bali. Or something completely your own.
At Veena World, we believe no two travellers are alike. That's why we create holidays designed around your time, your budget, your interests and your travel style.
You Explore.
Choose your destination, Choose your travel dates, Choose your experiences.
We Handle the Rest.
We'll take care of the planning, coordination and support. Whether you're travelling as a couple, with family, with friends, or celebrating a special milestone, we'll help create a holiday that's uniquely yours
Let's Plan Your Perfect Holiday. Connect with your nearest Veena World Travel Affiliate in the USA or get in touch with Veena World USA Inc.
Customized Holidays by Veena World
www.veenaworld.com I customizedholidays@veenaworld.com I Call: +1 903 648 5240
New York City - Swarga Travel Ready LLC +1 6318770741
New Jersey, Colonia - Travelscape +1 8483631435
North Carolina - Bliss Tours LLC +1 9842662053
Georgia, Alpharetta - Blossom Journeys +1 2035549121
Georgia, New Norcross - Madhu Patel +1 7705249717
Chicago, Palatine - Pachamama Travels +1 8473406843
Michigan, Novi - SWAMI Tours and Travels +1 2489803736
Indiana, Carmel - Saffron Holidays +1 4804695875
Missouri, St. Louis - mPath Services +1 3148823360
Veena World ←USA→ Travel Affiliates
Texas, Houston - Tripcrafters +1 8329235716
Colorado Springs - Worry Free Travels LLC +1 7193521797
California, Sacramento-Dhaval Bilimoria +1 9164718162
California, Pleasanton - Golden Setu +1 9256602522
California, San Jose-Dipali Khangaonkar +1 4083161050
Washington, Bonney Lake - Kavitha Nandy +1 4252190869
Washington, Lynnwood - Shruti Sathe +1 9726559248
Fayetteville, Arkansas - WorldWide Wander +1 4694731311
OSA Toronto, Canada-Pratibha Hukerikar +1 (416) 8786879
VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.

# *Neem*
# For Your Soil.

100% Neem Cake Organic Plant Fertilizer




+ natural pest & pathogen control

+ slow-release

+ improves soil texture

WONDERTREE™ Organics

**BETTER GARDENING THROUGH BETTER SOIL**


AN INVITATION TO NRI FAMILIES
Bungalow-Style Premium Flats in Pune
KARVENAGAR • KOTHRUD
A wonderful opportunity to own a right-sized residence in one of Pune's most pristine, peaceful and sought-after locations
DESIGNED FOR NRI FAMILIES : 2/3/4+ BHK RESIDENCES WITH SUPERIOR ARCHITECTURE
Peaceful/Green Neighborhood
Location
Karvenagar / Kothrud
• Pristine, peaceful and secure neighborhood
• Quiet, green surrounding
• Wide road frontage, fresh air, minimal traffic
Developed by
Jayant Warunkar / Sanskruti Vastuyog
An NRI from King of Prussia Pennsylvania USA – with family roots in Kolhapur/Pune and holistic personal understanding of what NRI families look for in a home in Pune.
Transparency, clarity and integrity. Healthy Relationships.
Project Status
• Structure 95% complete
• Internal finishing underway
• Expected completion Dec 26
• Architectural flexibility and finishing options available
• Possession by March 2027
• Spectacular views
Neighborhood
Harmonious, flourishing community already home to many NRI families, cultural celebrations
Connectivity
✓ Karve Road
✓ DP Road
✓ Sinhgad Road
✓ Mumbai Highway
Services
Shopping, malls, banks, restaurants, schools, colleges, hospitals, parks, temples, domestic help
Modern Facilities
➢ Automatic parking
➢ Modern lifts, solar system
➢ Rainwater harvesting
➢ Borewell supply
Rooftop Amenities
Spaces for seniors, kids, open gym, yoga, meditation and more..
2BHK 1250 sqft, 3BHK /1401 sqft
4BHK 1551 sqft, 4+ BHK / Full floor 2841 sqft
Welcoming, Warm, Friendly Community
Healthy, Caring Customer Relations
CONTACT : +1 (610) 220 1028
LIMITED UNITS AVAILABLE



BVG INDIA LTD
Humanity Ahead
India's Largest Integrated Services Company
Started in 1997 with a team of 8, Currently having 1,00,000+ Employees 205+ Cities in 29 States & UTs of India
1400+ Clients across India from all the sectors 2500+ Operating Sites – Maintaining an area of 650 Mn+ Sq. Ft.
1500+ Ambulances with skilled staff & equipment, helped 15 Mn+ patients 1000+ First Response Vehicles, helped 19 Mn+ citizens
2 Mn+ Sq. Mt. greenery maintained & 1 Mn+ trees planted Waste Management of 3500+ MT
EXCLUSIVE SERVICES FOR BMM MEMBERS
Airport & Travel Assistance
• Airport Meet & Greet
• Pickup & Drop Services
• Chauffeur-driven Vehicles
• End-to-End Travel Coordination
• Hotel & Stay Arrangements
Medical Tourism & Health Care
• Online Doctor Consultation
• Hospital Selection & Second Opinions
• Admission Assistance
• Treatment Planning
Elder & Parent Care
• 24×7 Emergency Assistance
• Ambulance Support
• Health Check-ups
• Home Nursing & Caregivers
• Senior Citizen Support Services
Spiritual & Pilgrimage Assistance
• Temple Darshan Planning
• VIP Darshan Coordination
• Religious Tours
• Accommodation & Travel Management
Property Care & Management
• Property Inspections
• CCTV Monitoring
• Property Maintenance
• Legal & Revenue Representation
• Tenant & Rental Management
Exclusive Member Benefits
• Priority Assistance
• Preferential Pricing
• Dedicated Support Team
• Access to Verified Service Partners
Hanmantrao Gaikwad
Chairman & MD, BVG Group
BVG LIFE SCIENCE LTD
Blending Traditional Knowledge with Modern Scientific Methods!
• Cancer Care
• Heart Care
• Liver Care
Contact no.: +91 7722 00 2581
Toll Free No.: 1800 268 1818
www.bvglife.com
BVG INDIA LTD
Address : Midas Tower, 4th Floor, Phase 1, Rajiv Gandhi Infotech Park, Hinjawadi, Pune, Maharashtra 411057
www.bvgindia.com www.bmmonline.org/bvg/
bmm@bvgindia.com +918055 99 2227




YOUR FAVORITE JEWELRY STORE NOW AT YOUR FINGERTIPS
Shop through live Facetime consultations and enjoy safe insured delivery anywhere in the USA.
For Virtual Shopping, Call: 650 476 3927
SHOP OUR EXCLUSIVE JEWELRY
• 22KT Handcrafted Gold Jewelry
• Certified 18KT Diamond Jewelry
PNG JEWELERS
T&C Apply.


Are you investing
in real estate,
or peace of mind?
YASHADA™
REALTY
LIVYNG, REIMAGINED
PUNE • INDIA
Homecoming Reimagined at Yashada Realty. Thoughtfully designed homes and commercial spaces, in prime locations, connectivity, facilities and thriving communities combined with international quality standards and amenities.
NRI PRIVILEGE PROGRAM
2%
STAMP DUTY WAIVER*
*Will be paid by developer
For Details & Registration
+91 89565 47323 | nri@yashadarealty.com
ONGOING PROJECTS
Ravet
Punawale
Baner
Wakad
Mamurdi


BMM2026
BMM REAL ESTATE CONFERENCE 2026
EMPOWERING GLOBAL BUSINESS LEADERS
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
We're excited to share a few positive updates from this week as momentum continues to build around our upcoming Real Estate Conference:
GROWING INTEREST
Interest in the conference remains strong, with 80 participants having registered their interest so far. Thank you for the encouraging response from the community!
GENEROUS SUPPORT
We are grateful to Mr. Balajee for his generous $10,000 donation received this week. His support significantly strengthens our efforts and vision for the conference.
NEW INDUSTRY ENGAGEMENT
We have initiated discussions with MSR Communities, a Seattle-based builder of Indian origin, to explore potential collaboration and participation opportunities.
EXPANDING COMMUNITY OUTREACH
Outreach efforts are underway to onboard additional realtors from the Marathi community, further strengthening our network and collective journey.
We look forward to sharing more updates as preparations continue. Thank you for your continued support and enthusiasm!
CONTACT:
Santosh Salvi: +1 603 438 9279
Kailas Bhoite: +1 314 397 0989
EMAIL:
santosh.salvi@bmmonline.org
kailasb@bmmseattle2026.org
FRIDAY
7th Aug 2026
START AT
12:00 PM – 5:30 PM
REGISTER / VOLUNTEER


AUGUST 6th, 2026 | SEATTLE, WA
BMM BConnect
AI SUMMIT 2026
AI for All: People | Planet | Progress
Keynote Sessions
Industry Deep Dives
Sustainability Panel
Women in AI Leadership
AI + Cybersecurity Shark Tank
Startup Pitches & Innovation Awards
Hands-On Worksnops
Hands-On Workshops
Generative AI & Agentic AI
Launching
BMM AI INNOVATION NETWORK (BAIN)
Connecting Global Minds
Join us to Shape the Future of AI!
Responsible AI & Governance
Cross-Border Innovation
The Future of Work
https://bmmonline.org/bconnect | Anand.Chouthai@bmmonline.org
732-425-7591



BMM2026
B-CONNECT 2026
EMPOWERING GLOBAL BUSINESS LEADERS
17+ DISTINGUISED SPEAKERS | ONE POWERFUL DAY
BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
Aseem Datar
Chief Product Officer & Corporate Vice President, Next Generation Computing, AI & Quantum, Microsoft
Rajashree Varma
Serial Entrepreneur | Board of Advisor | Co-Sell Strategist | Ex- Microsoft
Dr. Ashutosh Raravikar
Director at Reserve Bank of India (RBI), Mumbai
Milan Bobde
Co-Founder and CEO - Oddr.inc
Dr. Dananjay Bhide
Co-Founder & Managing Partner, My Supply Chain Group, LLC
Mahesh Keni
President, Harbinger Systems
Yashovardhan Wagh
Co-Founder & CEO, Gone Technologies Inc.
Neha Patadia
Healthcare Strategist and AI Advocate
Vijay Desai
Vice President - Engineering Persistent Systems
Nitin Karmarkar
Technical Advisor, Ex-Vice President Microsoft
Jitendra Morankar
Vice President, Power Systems, NextPower
Abhay Dharmadhikari
Founder & CEO, ChatoorAI
Milind Wagle
Cricket Commentator and Storyteller
Sunandan Lele
Cricket Journalist and Commentator
Abhay Samant
Senior Director of Engineering, Aerospace/Defense/ Government BU | NI Test & Measurement at Emerson
Jivana Aras
USA Women's National Cricket Team Player
CONNECT.
COLLABORATE.
TRANSFORM.
06 AUGUST 2026
Start At
8:30AM TO 5:30PM
Seattle Convention Center, Seattle
SHAPE THE FUTURE.
BE PART OF THE CONVERSATON.
SCAN FOR REGISTER
bmmseattle2026.org/bconnect
Persistent




BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
HIGH SCHOOL STUDENTS & PARENTS!
DID YOU KNOW?
You can earn up to 4 Language Other Than English (LOTE) Credits toward your High School graduation by demonstrating proficiency in the Marathi language!
avant
Take the
AVANT STAMP
Assessment
(STAndards-based Measurement of Proficiency)
The AVANT STAMP assessment is a nationally recognized language proficiency test that can help students receive academic credit for their Marathi language skills.
आपली भाषा,
आपला अभिमान,
आपले भविष्य!
EARN UP TO 4 LOTE CREDITS
STRENGTHEN YOUR HIGH SCHOOL TRANSCRIPT
RECEIVE RECOGNITION FOR YOUR MARATHI LANGUAGE PROFICIENCY
TURN YOUR HERITAGE LANGUAGE INTO AN ACADEMIC ADVANTAGE
Whether you learned Marathi at home, through Marathi Shala, or within your community, this is an excellent opportunity to earn credit for a language you already know.
For details about eligibility, testing, and participating school districts, please visit:
www.bmmonline.org/marathishala
मराठी शिका, मराठी जपा, मराठी अभिमान वाढवा! | BMM Marathi Shala Initiative | Preserving Our Language • Empowering Our Youth • Building Our Future

समाजरंग
Samajrang
A BMM Initiative

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती

दिव्यत्वाची जेथे प्रचिती
BMM Samajrang - US Tour 2026

## ५ प्रेरणादायी समाजसेवक

भारतमधून प्रवास करत आपल्या भेटीला येत आहेत

## ‘समाजसेवेच्या खऱ्या कथा’

    

### डॉ. विनोद शाह

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 6/12/2026 | Chatham, NJ |
| Sat | 6/13/2026 | New York & Connecticut |
| Sun | 6/14/2026 | New Jersey |
| Sat | 6/27/2026 | Washington DC / Virginia / Maryland / Baltimore |
| Sun | 6/28/2026 | Philadelphia |
| Sat | 7/11/2026 | Chicago |
| Sat | 7/18/2026 | Detroit |
| Sat | 7/25/2026 | Cleveland |
| Sun | 7/26/2026 | Pittsburg |
| Sat | 8/1/2026 | Portland |
| Sun | 8/2/2026 | Seattle |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |

### यजुर्वेंद्र महाजन

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 7/17/2026 | NY |
| Sat | 7/18/2026 | Washington DC |
| Wed | 7/22/2026 | Richmond |
| Thu | 7/23/2026 | Raleigh |
| Fri | 7/24/2026 | Charlotte |
| Sat | 7/25/2026 | Atlanta |
| Sun | 7/26/2026 | Chicago |
| Fri | 7/31/2026 | Cleveland |
| Sat | 8/1/2026 | Detroit |
| Sun | 8/2/2026 | San Francisco |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |

### अशोक देशमाने

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Sat | 8/15/2026 | San Francisco |
| Sun | 8/16/2026 | San Francisco |
| Tue | 8/18/2026 | Kansas City |
| Thu | 8/20/2026 | Austin |
| Sat | 8/20/2026 | Dallas |
| Sun | 8/23/2026 | Houston |
| Fri | 8/28/2026 | Atlanta |
| Sat | 8/29/2026 | Charlotte |
| Sun | 8/30/2026 | Raleigh |
| Fri | 9/4/2026 | Pittsburg |
| Sat | 9/5/2026 | Detroit |
| Sun | 9/6/2026 | Chicago |
| Fri | 9/11/2026 | Boston |
| Sat | 9/12/2026 | New Jersey |
| Sun | 9/13/2026 | Philadelphia |
| Fri | 9/18/2026 | Baltimore |
| Sat | 9/19/2026 | Washington DC |

### डॉ. गिरीश कुलकर्णी

| Day | Date | City |
|---|---|---|
| Sat | 7/25/2026 | New Jersey |
| Sun | 7/26/2026 | Boston |
| Sat | 8/1/2026 | Richmond, VA |
| Sun | 8/2/2026 | Richmond, VA |
| Tue | 8/4/2026 | Dallas, TX |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Sat | 8/15/2026 | SF Bay Area |
| Sun | 8/16/2026 | Los Angeles |
| Tue | 8/18/2026 | Chicago, IL |
| Wed | 8/19/2026 | Cleveland, OH |
| Thu | 8/20/2026 | Columbus, OH |
| Fri | 8/21/2026 | Indianapolis, IN |
| Sat | 8/22/2026 | Cincinnati, OH |
| Sun | 8/23/2026 | New York City |

### अनुराधा भोसले

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Tue | 8/11/2026 | Cincinnati (Tentative) |
| Wed | 8/12/2026 | Columbus (Tentative) |
| Sat | 8/15/2026 | Toronto (Tentative) |
| Sun | 8/16/2026 | Toronto (Tentative) |
| Sat | 8/22/2026 | San Antonio (Tentative) |
| Sun | 8/23/2026 | Houston (Tentative) |
| Sat | 8/29/2026 | Dallas (Tentative) |
| Sun | 8/30/2026 | Austin (Tentative) |

**समाजसेवेचा प्रेरणादायी अनुभव घ्या, आपल्या शहरात नक्की सहभागी व्हा!**

### या प्रवासाचा उद्देश

- प्रेरणादायी अनुभव
- समाजसेवेच्या खऱ्या कथा
- नवीन विचार, नवी दिशा
- एकत्र येऊया, परिवर्तन चडवूया
- चला, समाजासाठी काहीतरी करूया!

अधिक माहितीसाठी भेट द्या:
**www.bmmonline.org/samajrang**




For more details visit: https://bmmonline.org/bvg/